

REFBK-0008192

म. ग्रं. ं. ठाणे
विषय
र. नं.

# आमचीं
## उद्बोधक पुस्तकें

( किमती टपालखर्चासह आहेत )

| | किमत |
|---|---|
| आशा | २ रु. ४ आणे |
| विचक्षणा | २ रु. ४ आणे |
| काळेंपाणी | २ रु. १२ आणे |
| आधुनिक गीता | १० आणे |
| टांकांच्या फेंकी | १ रु. ४ आणे |
| उद्धार | २ रु. ४ आणे |
| दाजी | १ रु. १२ आणे |
| स्त्रीसंहारक बकासुर | ८ आणे |
| अस्पृश्यता-रुक्कुठार | १० आणे |
| यशस्वी धंद्याचा मार्ग | ८ आणे |
| व्यापाराचें व्याकरण | १० आणे |
| उत्कर्ष सोपान | ५ आणे |
| वक्तृत्व व तें कसें शिकावें ? | ८ आणे |
| विजयी व्हा | ८ आणे |
| बाइलवेडाचा प्रताप | १० आणे |
| विक्रीचीं बारा सूत्रें | १४ आणे |
| नवऱ्याला वेसण | १२ आणे |
| तडफ | १० आणे |
| कार्यक्षमता | १५ आणे |
| सावरकर-साहित्य भाग १, २, ३, ४ व ५ | प्रत्येकी १५ आणे |

व्ही. पी. खर्च प्रत्येकीं ३ आणे निराळा.

**किर्लोस्कर प्रेस : किर्लोस्करवाडी.**

लेखक

बॅ. सावरकर

अनुक्रमांक
विभाग
क्रमांक
नों. दि.

# सावरकर साहित्य

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. ८९१२

भाग ५ वा

RFFBK-0008192

किंमत १२ आणे

—मुद्रक व प्रकाशक—
किर्लोस्कर प्रेस, किर्लोस्करवाडी.

★

या पुस्तकाचे सर्व हक्क प्रकाशकांच्या स्वाधीन.

# प्रस्तावना

हिंदी राष्ट्र पारतंत्र्यांत कां पडलें आणि या मगरमिठींतून याला कसें सुटतां येईल, याचा विचार करूं लागल्यावर कोणालाहि दिसून येईल की परकीयांनी पराक्रमाच्या जोरावर हिंदुस्थान जिंकलें नसून हिंदूंच्या अेकजुटीला पडलेल्या बेकीच्या खिंडारांतून ते आंत घुसले आणि हलकेहलके त्यांनी हिंदुस्थानची मालकी आपल्या हातीं घेऊन घरच्या मालकांना गुलामांच्या पायरीवर नेऊन बसवलें. आता हिंदी राष्ट्राला आपला धनीपणा पुन्हा प्राप्त करून घ्यायचा असेल, तर आपणांस भोवलेली बेकी नाहीशी केली पाहिजे आणि अेकजुटीनेच स्वातंत्र्यसंग्राम चालविला पाहिजे.

पण हिंदी राष्ट्र अद्यापीहि एक होऊं शकत नाही. स्पृश्यास्पृश्य हीं मोठी शकलें तर आहेतच; पण जाती उपजातींच्या कपऱ्याकपऱ्या होऊन हिंदी जनता हतबल, हतप्रभ झालेली आहे. राष्ट्राची शक्ति वांया जात आहे ती आपली जात श्रेष्ठ म्हणवून घेण्यांत किंवा दुसऱ्या जातींचा पाडाव करण्यांत. सामर्थ्याच्या या अपव्ययामुळेच राष्ट्र आत्मोद्धाराला असमर्थ झालेलें आहे. ह्या वस्तुस्थितीचा बोध सावरकर साहित्याच्या या भागावरून वाचकांना उत्तम प्रकारें होईल.

जातिभेद मोडून तज्जन्य वैमनस्यहि नाहीसें कसें करतां येईल, याबद्दल दे. भ. सावरकरांसारख्या अधिकारी पुरुषांचे विचार समजावून घेण्यांत कोणासहि आनंदच वाटेल. हिंदुस्थानांतला प्रत्येक रहिवासी हा हिंदु आणि प्रत्येक हिंदु तो बंधुबंधु, ही आत्मीयता निर्माण होईल त्या वेळीं हिंदुस्थानचें नष्टचर्यहि संपेल ही जाणीव या पुस्तकाने खचित होईल व म्हणूनच याचें वाचकांकडून चांगलें स्वागत होईल असा विश्वास वाटतो.

—— शं. वा. किर्लोस्कर.

# अनुक्रमणिका


जन्मजात जातिभेद मोडायचा
म्हणजे काय करावयाचें ? (पूर्वार्ध) ... १

जन्मजात जातिभेद मोडायचा
म्हणजे काय करावयाचें ? (उत्तरार्ध) ... १७

मद्रास प्रांतांतील कांहीं अस्पृश्य जाती ... ३६

हा आनुवंश, की आचरटपणा ? की आत्मघात ? ... ४८

वज्रसूचि ! ... ६३

सहभोजनांचा धूमधडाका ! ... ८०

रत्नागिरीनें अस्पृश्यतेची आणि
रोटीबंदीची बेडी कशी तोडली ? ... ९७

# जन्मजात जातिभेद मोडायचा म्हणजे काय करावयाचें ?

## ( पूर्वार्ध )

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. ८९१२

ज्यांना जन्मजात जातिभेद—जो आज हिंदु समाजांत प्रचलित आहे तो—असणेंच अिष्ट वाटतें, त्यांना तो कसा नी किती अनिष्ट आहे हें दाखविण्यासाठीं हा लेख आम्ही लिहीत नाहीं.

ज्यांस हा 'जन्मजात' म्हणविणारा परंतु वास्तविक केवळ 'पोथीजात' असणारा जातिभेद अत्यंत अनिष्ट आहे असें वाटतें, तो मोडावा हें विधेय पटलेलें आहे, पण 'तो मोडायचा म्हणजे आज काय काय केलें पाहिजे', 'आमच्यापुरता आम्ही आरंभ कुठून नी कसा करावा' असा प्रश्न ज्यांच्यापुढें पडलेला आहे आणि 'जातिभेद मोडा म्हणतां तें ठीक; परंतु त्या हजारों वर्षांच्या रचनेस अुचटून पाडल्यास अेवढी मोठी गडबड अुडेल कीं, हिंदु राष्ट्राचें अस्तित्वहि त्या धुमाकुळींत नामशेष होअून जाअील त्याची वाट काय ?'

अशी अेक भीति वाटल्यामुळेंच जे त्या कामास हात घालण्यास वचकत आहेत, त्यांच्या त्या प्रश्नांचा नी त्या भीतीचा विचार करण्यास्तव काय तो हा लेख लिहिण्याचें आम्हीं योजिलें आहे.

जन्मजात जातिभेदाची अिष्टानिष्टता या विषयावर केसरींत आमची लेखमाला प्रसिद्ध झाल्यापासून आणि तो जातिभेद मोडण्याचा प्रत्यक्ष प्रयोग मोठ्या प्रमाणावर रत्नागिरींत सामुदायिक रीत्या घूमधडाक्यानें चालू झाल्यापासून आम्हाला लेखी नी तोंडीं शेंकडों-जणांनीं हे वरील प्रश्न आजवर विचारले आहेत. दुसरी गोष्ट ही कीं, जातिभेद मोडणें अिष्ट असें मानणारा अेक फार मोठा वर्ग उत्पन्न झाला आहे. पण त्याच्यापुढें अेक निश्चित कार्यक्रम नसल्यानें तो गोंधळलेला आहे. त्यासाठीं अेक चालचलाअू कार्यक्रमहि या लेखांत रेखाटणें आहे.

## जन्मजात जातिभेदांचें उच्चाटन म्हणजे जन्मजात म्हणून केवळ गृहीत धरलेल्या उच्चनीचतेचें उच्चाटन

प्रथम हें लक्षांत ठेवलें पाहिजे, कीं जन्मजात जातिभेदामध्यें जें काय आपणांस, राष्ट्रीय दृष्ट्या अनिष्टतम असल्यानें मुख्यत: अुच्छेदावयाचें आहे तें आजच्या जातींतील जन्मजातपणाची नुसती अुपपत्ति वा भावना ही नसून तिच्याशीं घातलेली मानीव अुच्च-नीचतेची आणि विशिष्टाधिकारांची सांगड ही होय. अमुक मनुष्य ब्राह्मणकुलांत जन्मला, म्हणूनच केवळ, त्याच्यांत तसा विशेष गुण नसूनहि, त्यास अग्रपूजेचा, वेदोक्ताचा, पूर्वीच्या निर्बंधानुसार अवध्यत्वाचा अित्यादि जे विशिष्ट जन्मजात अधिकार वा सवलती देण्यांत येतात, त्या तेवढ्या बंद करावयाच्या आहेत. अमुक मनुष्य क्षत्रिय कुलांत जन्मला म्हणूनच काय तें, त्याच्या अंगीं तसा कोणताहि विशेष गुण नसतां, त्यास सिंहासनाचा नी वेदोक्त राज्याभिषेकाचा

अधिकारी समजणें आणि शिवाजीसारख्या पराक्रमी पुरुषानें स्वतंत्र राज्य स्थापिलें तरी 'तो क्षत्रिय नाहीं म्हणून सिंहासनाचा अधिकारी होऊं शकत नाहीं, त्यास आम्ही अभिषेकिणार नाहीं ', असें म्हणणें हें निर्भेळ मूर्खपणाचेंच नव्हे तर घातक असल्यानें क्षत्रियत्वाचे ते केवळ जन्मानेंच देऊं केलेले विशिष्टाधिकार तेवढे छिनावून घेतले पाहिजेत !

कोणतीहि जात दुसरीहून मूलतःच श्रेष्ठ वा कनिष्ठ आहे ही गोष्ट केवळ पोथींत तसें सांगितलें आहे म्हणूनच गृहीत घेतां कामा नये.

जातिभेदांतील ही जन्ममूलक नी केवळ मानीव अशी अुच्चनीचतेची भावना आणि हे प्रकट गुणांवांचून मिळणारे विशिष्टाधिकार वजा घातले तर प्रस्तुतच्या जातिभेदाचीं जीं अितर अनेक लक्षणें आहेत, तीं आणखी कित्येक वर्षें तग धरून राहिलीं वा न राहिलीं तरी त्यामुळें फारशी हानि होणार नाहीं. त्या त्या जातींचे धंदे, नांवें, त्यांचे संघ, वरील व्याख्येशीं विरुद्ध न जाणारीं नी दुसऱ्यास अुपसर्ग न देणारीं त्यांचीं विशिष्ट व्रतें, कुळधर्म, कुळाचार, गोत्रपरंपरा प्रभृति शेंकडों ज्ञातिविशिष्ट बंधनें त्या त्या ज्ञातींनीं जरी आणखी कांहीं काळ तशींच चालूं ठेवलीं तरी त्यायोगें अखिल हिंदु राष्ट्राची म्हणण्यासारखी हानि होणार नाहीं.

**मानीव अुच्चनीचता नी प्रकट गुणावांचून केवळ जन्मामुळेंच मिळणारे विशिष्टाधिकार हे काढून घेतल्यानंतरहि अुरणारा जो जातिभेद तो, विषारी दांत पाडून टाकलेल्या सापासारखा, आणखी कांहीं काळ जरी वळवळत राहिला तरी फारशी चिंता नाहीं !**

अशा प्रकारच्या जातींचे गट म्हणजे आजच्या कुलासारखेच निरुपद्रवी असतील. ब्राह्मण जात म्हणून, गुण नसतांहि विशिष्ट

अधिकार असा जर समाजांत कोणताहि मिळेनासा झाला किंवा भंगीजात म्हणून योग्यता असतांहि विशिष्ट अधिकारास वंचित व्हावें लागलें नाहीं, तर कुण्या संघानें स्वतःस ब्राह्मण म्हणविलें वा मराठा, वैश्य, महार म्हणविलें तरी तेवढ्यामुळेंच आपसांत परस्परांचा मत्सर वा द्वेष करण्याचें कोणतेंहि सबळ नी न्याय्य कारण अुरणार नाहीं. आज जसें कोणाचें नांव रानडे असतें, तर दुसऱ्या कुळाचें आडनांव दिवेकर असतें. पण तेवढ्यासाठीं त्यांच्यांत भांडण लागत नाहीं. तथापि जर रानडे कुळांतील मनुष्य म्हटला कीं, त्याला गुणानें श्रेष्ठ असो वा नसो, गंधाचा अग्रमान किंवा वैद्यभूषण पदवीचा ताम्रपट दिलाच पाहिजे, नी दिवेकर कुळांतील मनुष्य म्हटला, कीं तो रानड्याहून कितीहि सच्छील वा वैद्यकतज्ज्ञ झाला तरी त्यास ते अधिकार मिळणार नाहींत अशी व्यवस्था ठरली– तर रानडे आणि दिवेकर कुळांत मत्सर नी द्वेष अुत्पन्न झाल्याविना राहाणार नाहीं. प्रत्येक व्यक्तीचें नांव नी कुळाचें अुपनांव (आडनांव) भिन्न असतांहि त्यांस त्यामुळें जन्मतः कोणतेहि विशिष्टाधिकार वा विशिष्ट हानि चिकटविली नसल्यामुळें त्यांच्यांत जसें वैषम्य केवळ नामभिन्नतेनें गाजत नाहींत तशीच स्थिति, जन्ममूलक पोथीजात अुच्चनीचता आणि विशिष्टाधिकार काढून टाकले असतां, ह्या जातीजातींच्या गटांचीहि होअील. तेव्हां जन्मजात जातिभेदाचा अुच्छेद करावयाचा म्हणजे ह्या जातींजातींतील मानीव अुच्चनीच भावनेचा नी तदनुषंगिक विशिष्टाधिकारांचा तेवढा अुच्छेद करावयाचा. प्रत्येकानें ही भावना ठेवायची कीं, जर कोण्या जातींत आणि व्यक्तींत अेखादा गुण प्रगट होअील तरच नी त्याच प्रमाणांत ती योग्य वा अयोग्य ठरून तदनुषंगिक अधिकारास पात्र होअील. मोटारहाक्या तो कीं, जो स्वतः मोटार चालविण्यांत कुशल आहे. त्याचा बाप, आजा, पणजा मोठा प्रवीण मोटारहाक्या असला तरी तेवढ्यामुळेंच त्याच्यांतहि मोटार हाकण्याचे गुण आनुवंशिकपणें असलेच पाहिजेत असें गृहीत धरून, त्याच्या मोटारींत जर कोणी शहाणा बसेल तर

कपाळमोक्षाचीच पाळी बहुधा येअील. तुला मोटार हाकण्याचें प्रमाणपत्र मिळालें आहे का ? हा मुख्य प्रश्न. जर त्याच्यांत तो गुण आनुवंशिकतः असेल तर तो प्रकट झाला पाहिजे. तो नुसता सुप्त आहे, म्हणून त्यास तें प्रमाणपत्र मिळतां कामा नये. मोटारहाक्याचा अधिकार त्यास गाजवूं देतां कामा नये ! तीच स्थिति राष्ट्रीय प्रगतीच्या मोटारीची. ह्या कामास प्रत्यक्षपणें प्रकट गुणानें जो प्रवीण ठरला तो धुरीण. मग तो जातीनें ब्राह्मण असो, क्षत्रिय असो, भंगी असो. कपडा अुत्तम शिवतो तो शिंपी. मग तो तथाकथित शिंपी जातीचा असो वा वाणी वा कुणबी असो.

प्रस्तुतच्या जातिभेदांतील कोणता अत्यंत घातक घटक आपणांस अुच्छेदिला पाहिजे, हें असें नक्की ठरविल्यानंतर, आतां आपल्या हिंदु राष्ट्राच्या संघटनास आड येण्याऱ्या अशा ज्या दुष्ट रूढी जातिभेदांतील त्या घातक घटकांत अंतर्भूत होतात किंवा ज्या त्याचे परिणाम आहेत त्या कोणत्या नी त्यांचा नायनाट कसा करावयाचा याचें दिग्दर्शन करूं.

जातिभेद हा अेक चतुष्पाद प्राणी आहे. ज्या चार पायांवर तो मुख्यतः अुभा आहे ते त्याचे चार पाय, म्हणजे व्यवसायबंदी, स्पर्शबंदी, रोटीबंदी, बेटीबंदी. हे त्याचे चार पाय हाणले कीं, हें धूड खालीं कोसळलेंच म्हणून समजावें. जातिभेदांत हिंदु राष्ट्राच्या प्रबळ संघटनास अत्यंत हानिकारक असणारा भाग म्हणजे मुख्यतः ह्याच चार रूढी आहेत. पैकीं—

## व्यवसायबंदी

ही आजला जवळजवळ तुटलेलीच आहे. चार वर्णांच्या वा जातींच्या चार हजार जाती ज्या झाल्या आणि त्यांच्या पुन्हा अनेक पोटजाती ज्या पडत चालल्या, त्या ह्या व्यवसायबंदीच्याच अवदसेपायीं होत.

अुभ्यानें विणणाऱ्यांची अेक जात, बसून विणतात म्हणून त्यांची दुसरी जात ! गवळी जात दुध-दहीं-लोण्याचा धंदा करणारी म्हणून निराळी. पण पुन्हा तिच्यांत पक्क्या दुधाचें लोणी काढतात म्हणून ती एक अेक जात पडली नी कच्च्या दुधाचें लोणी काढतात म्हणून त्यांची दुसरी अेक-जात झाली ! ही अनर्थपरंपरा यापुढें चालण्याची भीति फारशी उरलेली नाहीं. कोणताहि धंदा कोणीहि करण्यास जातीची आडकाठी आतां येअीनाशी झाली आहे. जात शिंपी – धंदा तांबटाचा. जात ब्राह्मण—धंदा लोखंडी कारखान्याचा. जात वाणी— धंदा शिक्षकाचा, अशी वस्तुस्थिति जिकडेतिकडे झाली आहे. ज्यास ज्या धंद्याची पात्रता असेल त्यास तो धंदा करण्याचें स्वातंत्र्य मिळा- लेलें आहे. आजचे वकील, मोटारहाके, डॉक्टर, आगगाडीवाले, तारवाले प्रभृति नवे धंदे करण्यास जशी जात आडवी येत नाहीं, तसेंच पूर्वीं स्मृतींतून वा रूढीने ज्या धंद्यास करण्यास जात आडवी येअी, ते धंदेंहि करण्यास ती मुळींच आडवी येत नाहीं. महार शिपाअी होतात, ब्राह्मण, क्षत्रिय गवळी होतात, फार काय, दुकानां- तून विलायती बूट—वहाणा—जोडेहि प्रकटपणें विकतात आणि तरीहि त्यांची जात जात नाहीं.

अेकाच जातींत अेक धंदा डांबून टाकण्याचें जें आपल्या जुन्या जातिभेदाचें धोरण असे त्याच्या वतीनें दोन लाभ बहुधा पुढें करण्यांत येतात. अेक हा कीं, त्या धंद्यास वा कलेस अनुरूप अशी प्रवृत्ति नी प्राविण्य पुष्कळ अंशीं पिढीमागून पिढींत अनुवंशाच्या ( हेरिडिटी ) बळें प्रत्येक पुढच्या व्यक्तींत प्रकर्ष पावतें आणि दुसरें हें कीं, लहान- पणापासून घरीं वाडवडिलांचा भिक्षुकीचा वा चांभारकीचा जो कोणता व्यवसाय असेल त्याचें शिक्षण, त्याचें भांडवल, त्याची खुबी सहजगत्या होतकरू पिढीस लाभूं शकते. पण ह्या दोन लाभांना आपल्या नव्या गुणाधिष्ठित पद्धतींतहि मुकण्याचें कोणास कारण नाहीं. जुनी जातबंद व्यवसायपद्धति जरी सुटली तरी व्यवसाय- स्वतंत्रतेच्या आपल्या नव्या पद्धतींतहि वाडवडिलांचा धंदा करूंच

नये असा कांहीं प्रतिबंध नसल्यानें, हे दोन्ही लाभ ज्या कोणच्या प्रमाणांत खरोखरीच होअूं शकतात, त्या प्रमाणांत पदरीं पडण्यास मुळींच प्रत्यवाय येणार नाहीं. अुत्कृष्ट 'संगीतरत्न' गवयाचा मुलगा जर अुपजत गवयी असेल तर त्यानें सुखेनैव गवय्याचा धंदा करावा; त्या गुणांत पारंगतता मिळाल्यास त्यासहि 'संगीतरत्न' ह्मणून पदवी मिळेलच. पण जर सात पिढ्या कुळांत गायकी असूनहि अेखादा मुलगा मडक्यासारख्या फुटक्या आवाजाचा निघाला नी गायनकलेपेक्षां गुरें वळण्याच्याच कामाचा असला, तर तरीहि त्यास 'संगीतरत्न' ही पिढीजात पदवी नी राजदरबारचें गायकाचें पिढीजात स्थान द्यावयाची घोडचूक ह्या नव्या गुणाधिष्ठित व्यवसायपद्धतींत होत नाहीं. बापाचे गुण मुलांत सुप्त तरी असतातच, ह्या म्हणण्याचा व्यवहारांत कांहीं अुपयोग नाहीं. व्यवहारांत प्रकट गुणाचें काम. वकिलाच्या मुलांत वकिलीचे आनुवंशिक सुप्त गुण असोत वा नसोत; तेवढ्यावारीं त्यास कोणी वकील म्हणून न्यायालयांत मानणार नाहीं. त्याची स्वत:ची वकिलीची परीक्षा अुतरली पाहिजे, ते गुण प्रकट स्वरूपांत दिसले पाहिजेत. ज्यांत ते वकिलीचे गुण प्रकटतील, ती परीक्षा जो अुतरेल, तो वकील. मग ते गुण आनुवंशिक असोत वा स्वोपार्जित असोत. त्याचा बाप, आजा वकील असो वा वडारी असो. जातिबद्ध व्यवसायबंदी तोडल्यानें तिच्यांतील वरील दोन्ही लाभांस न मुकतां कोणालाहि आपल्या जातिबद्ध धंद्याहून अुच्चतर धंदा करण्यास वाव मिळतो. गुणांवरच व्यवसाय नी तज्जन्य मान मिळणारा असल्यामुळें धंद्यांचा नी कलांचा, त्यांना योग्य तेच लोक त्यांत पडल्यानें नी चढाओढींत टिकतील तेच त्यांतील धनमानांचे धनी होत गेल्यानें, अुत्कर्ष होत जातो. योग्य मनुष्य योग्य कामीं लागला जाण्याचा या व्यवसायस्वतंत्रतेंत अधिक संभव असल्यानें, राष्ट्राची एकंदर क्षमता वाढत जाते. सैनिकाचाहि गुण अुरला नसतां कोण्या दाभाड्यांच्या कुळांत हिंदुपदपातशाहीचें सेनापतीपण पिढ्यान्‌पिढ्या कुजत पडत नाहीं, निरक्षर भट्टाचार्यांनाहि पहिल्या गंधाच्या अग्रपूजेचें वतन मिळत नाहीं.

# पण ! काय होओील न कळे !

जातिनिष्ठ व्यवसायबंदीची प्रथा तुटून गुणनिष्ठ व्यवसाय-स्वातंत्र्याची प्रथा सरसहा चालू केली असतां, समाजावर कोणतें तरी भयंकर संकट कोसळेल कीं काय, जिकडे तिकडे बेबंदशाही माजेल कीं काय, पापच पाप फैलावून ओश्वरी कोप होईल कीं काय ? काय होओील न कळे ! अशी भीतीहि आतां कोणास बाळगावयास नको आहे. मनुस्मृतींत केलेली धंद्यांची जातवार वांटणी आणि आजची प्रत्यक्ष व्यवहारांत झालेली त्या धंदेवारीची गल्लत समोरासमोर ठेवली असतां, जी व्यवसायबंदी हेंच ज्या जाति-पोटजातीभेदांचें मुख्य गमक होतें तीं शिपी, सोनार, लोहार, गवळी, वाणी, भट, गोंघळी, कोष्टी प्रभृति जातींची जात वास्तविक बुडाली असतां त्याची कोणास कशी जाणीवहि राहिली नाहीं हें ध्यानांत येओील. या सर्व जातींचे मूळ धंदे वाटेल तो करीत असतां आणि त्या जाती आपलीं शिपी-सोनारादि नांवें आणि जातिसंघ तसेच चालू ठेवून स्वतः ते धंदे न करतां वाटेल ते इतर धंदे करीत असतां, त्यांच्यांतील सनातनी मंडळीदेखील जातिभेद अजून जिवंतच आहे आणि सुधारक हेच आतां तो नव्याने तोडूं पाहतात अशी मनःपूर्वक कागाळी करीत आहेत ! अितकी व्यवसायबंदीची नी जातवारीची ताटातूट लोकांच्या पूर्णपणें अंगवळणीं पडली आहे. मनुमध्यें त्या काळीं छापखान्याची कलाच माहीत नसल्यामुळें, त्या धंद्यांत ब्राम्हणांनीं पडावें म्हणून सांगितलेलें नाहीं. पण मनु त्रिकालज्ञ होते, त्यांची स्मृति त्रिकालाबाधित नी अपरिवर्तनीय, असें म्हणणारें सनातनी ब्राम्हण पत्रकारहि मनुभगवानांनीं मुद्रणालयें ब्राम्हणांनीं चालवावीं असें लिहिलें नसतांहि तो धंदा अुत्तम रीतीनें चालविता आहेत; आणि पुन्हा आपण ब्राम्हणचे ब्राम्हणच आहोंत असें समजून 'जाति-भेद हाच आजच्या हिंदु राष्ट्राचा पाया आहे ! तो कधींहि बुडवितां कामा नये ! मनुस्मृतीच्या निर्बंधानुरूप धर्म हा अपरिवर्तनीय

राहिला पाहिजे ! यास्तव आम्ही ही मनुस्मृतीच चातुर्वर्ण्य नांवाच्या छापखान्यांत छापीत आहों ! असें चापून घोषीत आहेत ! व्यवसाय-बंदी तुटल्यामुळें खरा जातिभेद अर्ध्या अधिक अंशानें मुळांतच मरत आला आहे. त्याचा पायाच ढांसळला आहे, याची कोणास जाणीवहि अुरूं नये अितकी आज गुणनिष्ठ व्यवसायस्वतंत्रता ही रूढ होअून बसली आहे ! अर्थात् व्यवसायबंदी तुटल्यानें काय होअील न कळे अशी भीति बाळगण्याचें आज कारणच नाहीं. यास्तव कीं, ती तुटल्यानें समाजाचें जें काय व्हावयाचें तें आज हें असें झालेलेंच आहे! अितकेंच नव्हे, तर तें तुम्हां आम्हां सर्वांस पूर्णपणें परवडतहि आहे. कारण त्या व्यवसायबंदीची बेडी तुम्हीहि प्रतिपदीं अुजळ माथ्यानें तोडून त्यामुळें जातिधर्माचें कांहीं अुल्लंघन होतें, अशी शंकादेखील घेत नाहीं.

## सारें जग, विशेषतः यूरोप, अमेरिका पाहा !

गुणनिष्ठ व्यवसायस्वातंत्र्याच्या प्रथेचे सुपरिणाम पाहावयाचे असतील तर अेकदां आजच्या युरोप–अमेरिकेकडे पाहावें, म्हणजे जातिनिष्ठ व्यवसायबंदी तोडली तर काय होअील न कळे अशी विभीत शंका पार मावळून त्यायोगें राष्ट्रीय बळ, अुद्यम, संपत्ति, कर्तबगारी, कला, क्षमता प्रभृति सर्व अंगांनीं राष्ट्राची झाली तर भरभराटच होते, असा ठाम विश्वास वाटूं लागेल. केवळ हिंदुस्थानांतच जातिनिष्ठ व्यवसायबंदी चालू; बाकी जपान, चीन, तुर्क, सारा यूरोप, सारी अमेरिका, ह्यांत त्या प्रथेचें नांवहि कोणी घेत नाहीं. हिंदुस्थानावांचून हें सारें जग गुणनिष्ठ व्यवसायस्वतंत्रतेचें अनुयायी असतांनाहि, त्या जातीपातींवांचून त्यांचें कांहीं अडलें नाहीं, अितकेंच नव्हे तर गुणनिष्ठ व्यवसायस्वतंत्रते-मुळें– निदान यूरोप, अमेरिका तरी व्यवसायकुशलतेंत आमच्याहून अेका शंभर वर्षांत पांच हजार वर्षें पुढें निघून

गेलीं आहेत ! गुणनिष्ठ निर्वाचनाने संघटलेलें त्यांचें सैन्यबळ आमच्या नुसत्या ‘ क्षत्रिय ’ छापाच्या जातिनिष्ठ राजन्यांहून सहस्र पटीनें झुंजार; त्यांचें गुणनिष्ठ निर्वाचनाने संघटिलेलें बुद्धिबळ परवां बाष्पयुगांत, तर काल विद्युतयुगांत, तर आज रेडियमच्या युगांतील अतिदर्शन अतिश्रवणाच्या सिद्धि संपादून आमच्या स्वप्नांतहि सुचली नाहींत तीं आश्चर्यें, ते दूरध्वनि (टेलिफोन), ते दूरदर्शक (टेलिव्हिजन), ते ध्वनिक्षेप (ब्रॉडकास्ट), ते ध्वनिलेख (फोनोग्राफ्स), ती तार, ती बिनतारी, त्या बेडरी, त्या मशीनगन्स, त्या पाणबुड्या, तीं विमानें, तीं वियानें– आज सत्यसृष्टींतलीं खेळणीं करून सोडीत आहेत ! शिल्प, वाणिज्य, कृषि, कलाकुसरी सर्व व्यवसाय इकडच्याहून तिकडे शतपटीनें प्रकर्ष पावलेले आहेत. अर्थात् जातिबद्ध व्यवसायबंदी तोडल्यानें ब्राम्हण्य, राजन्य, वाणिज्यादि गुणांत, शक्तींत नी व्यवसायांत राष्ट्र अपकर्ष पावत नसून अुलट गुणनिष्ठ व्यवसायस्वतंत्रतेनेंच तें भरभराटूं शकतें, हें आतां प्रयोगसिद्ध झालेलें आहे.

## भट नी भंगी

जन्मजात जातिभेदाच्या अुच्छेदनार्थ अत्यंत अवश्य असलेल्या या व्यवसायबंदीच्या अुच्चाटनाचें काम अशा रीतीनें आज बहुतांशीं झालेलेंच असल्यामुळें आणि कोणी कोणताहि व्यवसाय केल्यास त्याची जात त्यास आडवी येत नसल्यामुळें त्याच प्रकरणीं जातिभेदाशीं आपलें फारसें भांडण अुरलें नाहीं. जर अजून कुठें व्यवसायबंदी कांहीं प्रमाणांत आडवी येत असेल, तर ती अस्पृश्यांच्या प्रकरणीं मात्र येते. पण त्याचा विचार स्पर्शबंदीच्या प्रकरणीं होणारच असल्यामुळें, अिथें त्याचा केवळ उल्लेख तेवढा करून ठेवणें पर्याप्त आहे. अस्पृश्यांतहि आतां ती चांभार-महारादिकांच्या परंपरागत व्यवसायांत तितकी बंदी राहिली नाहीं. चांभाराचे धंदे, दुसऱ्या जाती

कांहीं अंशी— जोडे, बूट विकण्याचीं दुकानें चालविण्याच्या व चामड्याचे मोठे नवीन धर्तीचे सामुदायिक कारखाने चालविण्याच्या प्रकरणीं तरी- करतातच; नी चांभार, महार गुणानुरूप शाळा-मास्तरहि होऊं शकतात. व्यवसायबंदी कडकपणेंच जर कुठें सांपडली तर ती अिकडे अस्पृश्यांत भंग्याच्या धंद्यांत मात्र सांपडते आणि तिकडे स्पृश्यांमध्यें भटांच्या ! भंग्याचें काम अितर जातींतील कुणी करूं इच्छित नाहीं. भटांचें काम इतर जातींतील कोणास करूं देत नाहींत. त्यामुळें या दोन धंद्यांचें मात्र त्या दोन जातींस अगदीं 'अेकस्व' ( मोनॉपली ) मिळाल्यासारखें झालें आहे ! दुसरें कोणीहि आपल्या जातींचें काम करीत नाहीं, ही निश्चिति असल्यानें भंगी हा कलकत्यासारख्या प्रचंड कॉर्पोरेशनलादेखील वांकवूं शकतो, मग साध्या घरवाल्याची कथा काय ! अेक वेळ नगरसंस्थेच्या अध्यक्षानें संप केला तरी तो मोडतां येअील; दहा अर्ज त्या जागे-ठीं लगेच येतील; पण भंग्यानें का संप केला कीं, त्यांच्या मागण्यास मान्य करण्यावांचून तो मोडण्याचें दुसरें साधन सांपडणें कठीण जातें ! कारण दुसरा कोणी त्याचें काम करणारच नाहीं !– तीच गोष्ट भटाची. भट म्हटला कीं, तो ठराविक जातीचा, वृत्तीचा नसेल तर धर्मसंस्कार व्हावा तसा झाला नाहीं अशी रुखरूख भटांपेक्षां यजमानालाच जास्त लागते ! व्यवसायबंदी जर कुठें मोडायची अजून बाकी असेल, तर ती ह्या दोन प्रकरणींच होय.

## पैकीं भंग्याची खोड अशी मोडली पाहिजे–

भंग्याचें काम कोणी करणार नाहीं ही जाणीवच भंग्यांच्या जातीस त्या धंद्याचें 'अेकस्व' (मोनॉपली) हातीं राखून ठेवण्यास समर्थ करते, तसा कोणाचाहि निबंध (कायदा) नाहीं. यास्तव कांहीं काल जातिभेद तोडूं इच्छिणारांनीं तत्त्वासाठीं म्हणून भंगीकाम करून दाखविलें पाहिजे. प्रथम सेनापति बापट, नंतर महात्मा गांधी,

अप्पाराव पटवर्धन प्रभृति कांहीं ठळक पुढाऱ्यांनीं तो पायंडा पाडला आहेच. मागें अेकदां कलकत्त्यास भंग्यांचा मोठा संप होऊन, सारें नगर घाण सांचून हतबुद्ध झालें असतां शेंकडों भद्र तरुणांनीं (सभ्य वंशांतील तरुणांनीं) आपापल्या आळींतून नी विभागांतून भंग्यांचें काम करण्यास आरंभिलें आणि त्याचा परिणाम संप मोडण्याच्या कामीं चांगला झाला. 'अुच्च' मानलेल्या जातींनींच हा धंदा हाताळला, केवळ तत्त्वाकरितां कां होईना – कीं, भंग्यांच्या जवळपासच्या 'अस्पृश्य' जाती तो करण्यास पुढें येतात हाहि अनुभव आहे. कारण प्राप्तीच्या दृष्टीनें पूर्वास्पृश्यांच्या हातीं असलेल्या धंद्यांत आज तरी भंग्याचा धंदाच भरभराटीचा आहे. मुलांसुद्धां अेका कुटुंबांतील बायका-पुरुष नोकर म्हणून नोंदवून घेअून भंग्यांचें अेकेक कुटुंब महिना पन्नास साठ रुपये मिळवीत असतें ! तेव्हां कांहीं सुशिक्षित तरुणहि ह्या धंद्यांत जर कांहीं काळ जाणूनबुजून पडले, तर माललेदार कचेरींतील कारकुनीपेक्षां वा शाळा-शिक्षकांतील प्राथमिक नोकरीपेक्षां दुप्पट पगार सहज मिळूं शकेल.

अेका बाजूनें भंग्यांचें काम प्रत्यक्ष करणारे प्रचारक पुढें यावे नी दुसऱ्या बाजूनें तितकें ज्यांस करवत नाहीं, अशा अितर सुधारकांनी भंगी काम करीत असलेल्यांना अितर कोणत्याहि मनुष्याप्रमाणें समानतेनें वागवावें. प्रत्यक्ष आचरणांत स्वत: तसे वागणाऱ्या पांचपन्नास सुधारकांचा गट जरी निर्भयपणें काम करूं लागला, तरी या प्रकरणीं समाजाची हजारों वर्षांची, भंग्यांस अत्यंत नीच मानणारी धार्मिक भावनाहि किती झटकन् बदलूं शकते त्याचें आश्चर्य वाटण्याअितकें प्रत्यंतर अुदाहरणच हवें तर गेल्या चार वर्षांत रत्नागिरीस बघावयास मिळतें. भंग्यांचीं मुलें शाळेंत सरमिसळ बसतात, भंगीकाम संपतांच भंगीमंडळी अखिल हिंदु अुपहार-गृहांत प्रत्यहीं दुपारीं, संध्याकाळीं, ब्राह्मण, वाणी, मराठा प्रभृति अनेक नागरिकांसह सरमिसळ चहाचिवडा अुपहार खात,

हसतखेळत बसलेलीं दिसतात. कीर्तनकार भंगी हजारों लोकांसमक्ष देवळाच्या सभामंडपांत कीर्तन करतात, ब्राह्मणादिक महिला मालाफुलें त्या भंगी कीर्तनकारास अर्पितात नी ब्राह्मणादि शेंकडों नागरिक कीर्तनपरंपरेप्रमाणें त्यांच्या पायां पडून प्रदक्षिणा घालतात. जी भंगीण दहा वाजतां मळाचा डबा घेऊन घरून गेली, तीच अकरा वाजतां स्नान करून सुवसनें लेवून सहस्रभोजनसमारंभीं म्हणून जेवायास देवळांत येते नी शेंकडों प्रतिष्ठित त्रैवर्णिक स्त्रिया तिच्यासह सरमिसळ जेवतात. असे प्रसंग अनेकदां घडत आहेत. ज्या रत्नागिरींत सात वर्षांपूर्वी भंगी स्त्रियांस नुसतें कुंकू लावावयास मोठ्या कष्टानें अवघ्या पांच त्रैवर्णिक मुली मिळाल्या, तिथें आतां यात्राअुत्सवीं देवळोंदेवळांतून हजारों स्त्रियांच्या थव्यांत भंगिणी सरमिसळ वावरतात, कुंकू लावतात, लावून घेतात, सभांतून निर्विशेष समतेनें अेकत्र बसतात ! तीच रूढि होत आली आहे !

तेव्हां समाजाला अत्यंत हितकारक नी अपरिहार्य असें भंगी-काम हें नीचपणाचें द्योतक नाही. तो धंदा करणारा समाजांत अितर धंदेवाल्याप्रमाणेंच स्वच्छ नी शुद्ध असल्यास समतेनें संव्यवहार्य असतो असें स्वतःच्या वर्तनानें प्रत्येक सुधारकानें प्रत्यहीं दाखविलें पाहिजे. म्हणजे त्या धंद्यांतहि अितर जाती पडतील नी व्यवसायबंदी जी दोन धंद्यांतच अजून जातवार उरलेली आहे, ती भंग्यापुरती तुटेल. राहतां राहिला भट.

## पण भटांची खोड मोडायची तर प्रथम यजमानांची खोड मोडली पाहिजे !

कारण वास्तविक पाहातां निदान आजतरी भट हा जर समाजाच्या डोक्यावर चढला आहे असें कोणास वाटत असेल तर त्यानें हें लक्षांत ठेवावें कीं, तो त्याच्या घरची, धूर्तपणाची शिडी आणून कांहीं तसा आमच्या डोक्यावर चढलेला नाहीं. तर आम्हीच आमच्या भाबडेपणाची

शिडी त्याला देऊन आपल्या डोक्यावर चढवून घेत आहोंत ! भट हा खरोखर पाहातां अेक निरुपद्रवी प्राणी आहे. तो जोंवर पोलिसचें सहाय्य घेऊन आज आमच्या घरांत बळानें घुसत नाहीं आणि जोंवर आम्हीच त्याच्यामागें आमंत्रणावर आमंत्रणें धाडून त्याची पायधूळ आमच्या घरांत झाडली जाओीतों समाधान पावत नाहीं' तोंवर तो दोष भटाचा नसून आम्हां यजमानांचाच आहे. भटाच्या नांवानें सांज-सकाळ बोटें मोडणारे अनेक ' समाजिस्ट ' नी ' सुधारक ' लग्न-मुंज, श्राद्धपक्ष, गौरी-गणपतीचा दिवस अुजाडला कीं, भटजीकडे जे हेलपाटे घालतात, तो येत नाहीं ह्मणून त्यावर जे चडफडतात, दोन वाजेपर्यंत अुपाशी रहातील पण भटानें पूजा सांगितल्यावांचून अन्नाचा घास जो त्यास गिळवत नाहीं, त्या त्यांच्या भावडेपणांतच भटशाहीचें बळ आहे, भटाच्या दर्भांत नव्हे. जोंवर यजमान हा भाबडेपणा सोघणार नाहीं, तोंवर भटशाहीस लाख शाप दिलेत तरी भट हा असाच डोक्यावर चढलेला असणार. यजमानाची ही खोड सुटली नाहीं, तोंवर भटाची खोडहि मोडतां यावयाची नाहीं. हे आजचे भट बदलाल तर ते अुद्यांचे डोकीवर चढतील !

कारण भट म्हणतांच प्रथम ब्राह्मण भट जरी चटकन् डोळ्यांपुढें येतो तरी गुरव गुरु, जंगम, फार काय महारांत देखील महार भट आहेतच ! ही सारी अब्राम्हण असलीं तरी भटशाहीच आहे. भटाचा मुलगा तो भट. त्यास तो गुण असो नसो. त्याचें केवळ वंशपरंपरा वतन तें. त्याच्यावांचून दुसऱ्या जातीस वा कुळास वा व्यक्तीस ते संस्कार करण्याचा हक्कच नाहीं. अशी स्थिति आज तरी जेथेंजेथें असेल तेथेंतेथें त्या भावड्या समाजास ती परवडते, ती हवी आहे— म्हणूनच ती टिकून आहे.

यास्तव भटाची जातवार व्यवसायबंदी मोडण्याचा मुख्य उपाय म्हणजे, संघटनाभिमानी सुधारकानें प्रथम आपले संस्कार ठराविक जातीच्या वा कुलाच्या भटावांचून होअू शकत नाहीत, हा स्वतःचा

भावडेपणा सोडून प्रत्यक्ष आचरणांत ती सुधारणा व्यवहारली पाहिजे. प्रथमतः अनेक संस्कारांत भट बोलावूंच नये. पूजा, पाठ, गौरी, गणपति, सोयर-सुतक, संक्रांत, द्वादशी, दसरा, दिवाळी प्रभृति शेंकडों प्रसंगीं भटावांचून कांहींअेक अडणार नाहीं. स्वतः पोथी वाचावी किंवा शुद्ध मराठींत ते शद्व नी भाव व्यक्तवून ज्याची त्यानें पूजा करावी. पारणें फेडणें तर आजच्या अुपयुक्त संस्थांस दक्षिणा द्यावी. श्राद्धपक्षास पितरांचें गुणसंकीर्तन करून त्यांच्या नांवें आज हिंदु राष्ट्रास बलवत्तर करणाऱ्या कार्याकडे कांहीं दान देत चलावें किंवा तो दिवस राष्ट्रसेवेस, पितृभूसेवेस ह्मणजे तो पितृसेवेस अर्पून स्वतः राष्ट्रकार्य कोणतें तरी करावें. पितृभूच्या–पितृराष्ट्राच्या प्रीत्यर्थ झटण्याहून नी झुंजण्याहून पितृ-ॠण फेडण्याचें अधिक श्रेयस्कर साधन तें कोणतें असणार ? लग्नें नैबंधिक नोंदीनें ( लीगल रजिस्टरनें ) करावीं. भटास प्रथम हातांपायां पडून बोलावतां कां नी मग त्यांच्या नांवें रडतां कां ! भटास ‘ शहा ’ म्हणूं नका, कीं भटशाही संपली !

तें होत नसेल आणि अुपाध्याय वर्ग हवाच असेल तर आमचे आर्यसमाजीय बांधव आज कित्येक वर्षे त्यांचा धर्मोपाध्याय वर्ग ज्या पद्धतीनें निर्मितात ती पद्धति अवलंबावी. श्रुतिस्मृतियज्ञप्रक्रियेंत ज्याची जी परीक्षा अुतरेल त्या पदवीचाच नव्हे, तर याज्ञिकी चालविण्याचा अधिकार, अधिकृत प्रमाणपत्र देअून अर्पिला जावा. मग ती कोणत्याहि जातीची वा कुळाची व्यक्ति असो ! आज डॉक्टर जसा जातपातीनेंच ठरत नसून, ज्यास डॉक्टरीचें ज्ञानार्जित प्रमाणपत्र मिळेल तो डॉक्टर होतो; तसाच यापुढें वैदिक, याज्ञिक, अुपाध्याय, भट भिक्षुक ! श्रीमान् श्रद्धानंदांनीं स्थापिलेल्या गुरुकुलांतून असलेले अस्पृश्य जातीचे ब्रम्हचारी विद्यार्थी आज वेदालंकार, तर्कतीर्थ, विद्यानिधि, याज्ञिक, अुपाध्याय होत आहेत. त्यांस ब्राह्मणतर्कतीर्थांचा, विद्यानिधींचा, याज्ञिकांचा, भटांचा मान मिळाला पाहिजे, अुपाध्यायाचा व्यवसाय करतां आला पाहिजे. तेव्हां भटच हवा असेल तर

प्रत्येक सुधारकानें तो जातवार न निवडतां गुणवार निवडावा. ह्मणजे आज सुतारकी वा वैद्यकी जशी सर्व जातींना उघडी झाली आहे, तशी याज्ञिकी किंवा भटकीहि ज्ञातिनिष्ठ न ठेवतां गुणनिष्ठ झाली पाहिजे.

खरोखर व्यवसायबंदी ज्या दोनच व्यवसायांत आज जातिबद्ध आहे, त्यांपैकी अेक वेळ भंग्यांची व्यवसायबंदी तोडणें किंचित् कठीण जावो; पण बिचाऱ्या भटाची व्यवसायबंदी तोडणें कठीण जाअू नये. कारण भटास बोलावलें नाहीं कीं संपलें आणि त्यास न बोलावलें तर भंगी न आला तर अडतें तितकें देखील अडणार नाहीं. स्वतः भंगी होणें अेक वेळ आजच्या समाजभावनेप्रमाणें अपमानार्ह होईल; पण स्वतःचा भट स्वतःच होणें हें सर्वस्वीं सन्मानार्हच समजलें जाईल. देवास मराठी समजतहि असलेंच पाहिजे. तेव्हां प्रत्येक सुधारकानें स्वतःचे सारे धर्मसंस्कार, पूजापाठ, व्रतवैकल्यें स्वतः मराठींत करावीं किंवा संस्कृतज्ञ बी. अे., अेम. अे. असलेल्या कोण्या ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य, महार, चांभार प्रभृति विद्वान् सदाचारी हिंदुसेवक मित्राकडून करवावीं किंवा आर्यसमाजीय पद्धतीप्रमाणें गुणनिष्ठ नी जातिनिर्विशेष अशा निघालेल्या पुरोहित विद्यालयांतून योग्यतेचें प्रमाणपत्र मिळालेल्या नव्या अुपाध्यायांकडून करवावी.

व्यवसायबंदी तोडण्याच्या कार्यीं, अशा रीतीनें सुधारकांस फारच थोडें करावयाचें आहे. तोंडपाटिलकी सोडून जो 'अितर करोत न करोत; मी माझ्यापुरता तरी ही सुधारणा प्रत्यहीं प्रत्यक्षपणें आचरून दाखविणार' असें वागेल तोच खरा सुधारक! आतां जन्मजात जातिभेदाच्या अुच्छेदनार्थ स्पर्शबंदी प्रभृति अुरलेल्या प्रकरणीं काय केलें पाहिजे, तें या लेखाच्या अुत्तरार्धांत विवेचिलें जाईल.

● ● ●

# जन्मजात जातिभेद मोडायचा म्हणजे काय करावयाचें ?

## ( उत्तरार्ध )

मागील लेखांकांत या विषयासंबंधी जीं मुख्य विधेयें (पॉइंट्स्) प्रतिपादिलीं त्यांचा या लेखांतील भागाशीं अगदीं निकट संबंध असल्यामुळें आणि त्या मुख्य विधेयांची पुनरुक्ति, त्यांचा ठसा वाचकांच्या मनावर पक्का बिंबविण्याच्या कामीं अुपयुक्तहि असल्यामुळें गेल्या लेखांकांतील तीं विधेयें अेकंदर विषयाच्या अनुसंधानार्थ आरंभींच पुन्हा अेकदां विवेचिणें अवश्य आहे.

आजचा जातिभेद हा 'जन्मजात' ह्मणून ह्मणवीत असला तरी तो निव्वळ 'पोथीजात' आहे ! जन्मतःच प्रगटणाऱ्या कोणत्याहि रूपगुणधर्माच्या भिन्नतेनें आजच्या जाती निरनिराळ्या ठरूं शकत नाहींत. तर अमक्या छापाच्या गटांत अमुक जन्मला ह्मणून तो श्रेष्ठ किंवा स्पृश्य आणि अमुक कनिष्ठ वा अस्पृश्य 'मानला' जावा असें पोथींत सांगितलें आहे. यासाठीं तो तसा नुसता मानला जात आहे. आजचा जातिभेद हा जन्मजात नसून निव्वळ पोथीजात आहे !

आजच्या जातिभेदाची ही जन्मजात ह्मणून नुसती मानल्या गेलेल्या अुच्चनीचतेची विषारी नांगी मोडून टाकली गेली कीं, मग त्या त्या जाती वा अुपजाति नुसत्या नांवानें आणखी कांहीं काळ जरी अशाच राहिल्या तरी मोठीशी हानि होणार नाहीं. प्रत्येक कुळाचें आडनांव जसें भिन्नभिन्न असतें, परंतु त्या कुळाला प्रत्यक्ष गुणानें अुपार्जिल्यावांचून कोणताहि अधिकार भोगतां येत नसल्यामुळें त्या भिन्न नांवाच्या गटांमुळें जसा कोणताहि परस्पर मत्सर वा राष्ट्रीय विघटना आज होअूं शकत नाहीं, तशीच ब्राह्मण, क्षत्रिय, साळी, माळी, महार, चांभार प्रभृति विभिन्न नांवें त्या त्या जातींच्या गटांची यापुढेंहि जरी चालली आणि जरी त्यांच्या विशिष्ट परिषदा, संघ, सण नी संस्कार जातवारीनें यापुढेंहि चालत राहिले, तरीहि—त्यांना जर प्रत्यक्ष व्यवहारांत कोणतेहि विशिष्ट हक्क प्रगट गुणावांचून अुपभोगितां आले नाहींत तर, आणि जर यच्चावत् अधिकार नी व्यवसाय सर्व जातींत समानतेनें अुघडलेले असले तर— अशा घरगुती गटांनीं राष्ट्रीय संघटनेची हानि होण्याचा संभव ह्मणण्यासारखा अुरणार नाहीं. अुलट अपरिहार्य ह्मणून अुरणाऱ्या ह्या अशा नांगी तोडलेल्या जातवार गटांचा अुपयोगहि राष्ट्रीय संघटनेला तसाच करून घेतां येईल की जसा तालुका, जिल्हा, अिलाखा प्रभृति भौमिक गटांचा अुपयोग राज्याच्या संघटनेला करून घेतां येतो.

## ज्ञातिपरिषदाहि राष्ट्रीय दृष्टया विघटक न होतां संघटकहि होअूं शकतील, जर—

त्या त्या परिषदा नी ज्ञातीय संस्था खालीं दिलेलीं मुख्य सूत्रें आपल्या मूळ उद्देशपत्रिकेंत दोन ध्रुवांप्रमाणें अढळपणें अंकितील ! प्रत्येक ज्ञातिपरिषदेची पहिली प्रतिज्ञा, पहिलें सूत्र, हें असलें पाहिजे कीं, **'आम्ही कोणत्याहि अितर ज्ञातींस केवळ जन्मामुळेंच, जन्मतःच, हीनतर मानीत नाहीं वा अुच्चतर मानीत नाहीं,'**

आणि दुसरी प्रतिज्ञा ही कीं, ' आमच्या जातींतील व्यक्तींत जे गुण प्रगटपणें नी प्रत्यक्षपणें आढळून येतील त्यांवरूनच आमची पात्रापात्रता ठरविली जावी, आम्हांस अधिष्ठान मिळावें, अितरांप्रमाणेंच त्या आमच्या गुणाचें चीज व्हावें, अितरांप्रमाणेंच त्या गुणाच्या संपादनास नी संवर्धनास आम्हांसहि मोकळीक असावी; पण **प्रत्यक्ष गुणांच्या कसोटीहून निराळ्या अशा कोणत्याहि पक्षपाती पोथीजात ज्ञातिनिष्ठेच्या वशिल्यानें अितर कोणचेहि न्याय्य अधिकार लुबाडण्याची आमची मनीषा नाहीं.** प्रत्येक जातिसंघानें ह्या दोन स्पष्ट प्रतिज्ञांच्या पायावर आपली ज्ञातिसंघटना केली असतां ती अितर ज्ञातींच्या हानीस सहसा बाधक होणार नाहीं. अितकेंच नव्हे, तर त्या दोन सूत्रांच्या कक्षेत येणाऱ्या त्या त्या जातींची शिक्षण–आरोग्य–शक्ति-संपन्नता–सहकार्याची वाढ ही आपल्या अखिल हिंदु राष्ट्राच्या संघटनेस सहाय्यकहि होण्याचा पुष्कळ संभव आहे. जन्मजात कुलांचे गट जसे असतात, तसेंच हे जन्मजात जातींचे गटहि आपल्या हिंदु राष्ट्राच्या विघटनेसच आजच्यासारखे कारणीभूत न होतां संघटनेसहि सहाय्यक होतील. आमच्या राष्ट्रीय महासेनेच्या त्या निरनिराळ्या अुपसेना आपल्या परंपरांच्या छावण्यांतून गटागटांनीं संघटित नी सज्ज होत राहिल्या तर तें फारसें अनिष्ट नाहीं. राष्ट्रीय ध्वजाखालीं राष्ट्रीय ध्येयासाठीं राष्ट्राचें रणशृंग फुंकलें जातांच, त्या त्या अुपसेना झट्कन् अेकत्र करून त्या महासैन्याच्या सुसंगत हालचाली करण्यास ही त्यांची गटागटांनी केलेली पूर्वसज्जता अुपयोगी पडल्यावांचून राहाणार नाहीं. **जोंवर ह्या जाती मोडतां येत नाहींत, तोंवर** त्यांच्या विभिन्न परंपरेच्या आवडीनिवडींचा संघर्ष नी विरोध कमींत कमी हानिकारक करवून घेण्याचा आजच्या परिस्थितींत जो अेकच मार्ग आहे तो वरील दोन सूत्रें हाच होय.

ह्या दृष्टीनें पाहातां रत्नागिरीच्या चित्पावन संघाचें अुदाहरण कांहींसें अुल्लेखनीय आहे. या संघानें आपल्या मूळ अुद्देशपत्रिकेंत हीं वरील दोन सूत्रें गोंविलीं असून नुकत्याच झालेल्या त्याच्या वार्षिक साधारण सभेंतहि त्यांचा सबळ पुरस्कार केला आहे. 'हा ज्ञातिसंघ आपल्या हिंदु राष्ट्राच्या कोणत्याहि ज्ञातीस केवळ जन्मतःच अुच्च वा नीच मानीत नाहीं. प्रत्यक्षपणें प्रकट होणाऱ्या गुणाव-गुणावरूनच ज्याची त्याची पात्रता ठरविली जावी आणि कोण-त्याहि ज्ञातीस वा व्यक्तीस अंगीं ते ते प्रकट गुण नसतां केवळ जन्माच्या वशिल्यानेंच कोणतेहि विशिष्टाधिकार वा विशिष्ट हानि भोगतां येऊं नयेत "वा भोगावी लागूं नये असेंच या संघाचें ब्रीद आहे.' अशी ग्वाही त्या संघाच्या बहुतेक प्रमुख वक्त्यांनीं त्या सभेंत जो दिली ती स्तुत्य आहे. जर तो संघ त्याचें हें लिखित ब्रीद तित-क्याच प्रामाणिकपणें व्यवहारांतहि करील आणि वैश्य, सारस्वत, मराठा, भंडारी प्रभृति ज्ञातिसंघहि जर तेंच ब्रीदवाक्य शिरोधार्य करतील, तर या ज्ञातिपरिषदा नी हे ज्ञातिसंघ अखिल हिंदुराष्ट्राच्या राष्ट्रीय विघटनेस कारणीभूत होण्याचें भय फारसें अुरणार नाहीं, तर अलट हिंदु संघटनेच्या महत्कार्यास ते झाल्यास अुपकारकहि होअूं शकतील.

## जन्मजात जातिभेदाचे चार पाय

तेव्हां आज हिंदु राष्ट्रास अत्यंत अपायकारक झालेल्या जन्मजात जातिभेदाचा अुच्छेद करण्यासाठीं आपणास केवळ मानीव असलेल्या ह्या पोथीजात अुच्चनीचतेला अुचलून धरणाऱ्या आणि व्यक्तीच्या प्रत्यक्ष नी प्रकट गुणांचा विचार न करतां, तिला कोणतेतरी विशिष्टाधिकार वा विशिष्ट हानि चिकटविणाऱ्या ज्या ज्या रूढी प्रचलित आहेत त्यांचें त्यांचें अुच्चाटण आपणांस केलें पाहिजे. अशा रूढींत अत्यंत प्रबळ, व्यापक नी हिंदु राष्ट्राच्या संघटनेस मूलतःच घातक होणाऱ्या रूढी चार आहेत. त्या ह्मणजे, व्यवसायबंदी, स्पर्शबंदी, रोटीबंदी आणि बेटीबंदी !

# ( १ ) व्यवसायबंदी

तोडण्यासाठीं आज काय केलें पाहिजे याची सविस्तर चर्चा गेल्या लेखांकांत केली आहे. जन्मजात जातिभेदाचा अत्यंत प्रबळ आधार ही व्यवसायबंदीची रूढीच होती. पण हिंदु राष्ट्राच्या सुदैवानें ती आज आधींच जवळजवळ अुच्छिन्नलेली आहे. वाटेल त्या जातीच्या मनुष्यास आज वाटेल तो व्यवसाय करतां येतो. त्यांत त्याच्या गुणानुरूप त्यास प्रतिष्ठाहि मिळते. निर्बंधाची ( कायद्याची ) त्याला कोणचीहि अटक नाहीं, अितकेंच नव्हे, तर अगदीं थोडे अपवाद वगळल्यास त्याला त्याच्या जातीचीहि आडकाठी अुरली नाहीं. ब्राह्मण हा शिंपी, सोनार, डॉक्टर, वाणी अित्यादि वाटेल तो धंदा निर्बंधान्वयें ( कायदेशीर रीतीनें ) तर करूं शकतोच, पण त्याच्या जातिनियमानुरूपहि आज व्यवसायस्वातंत्र्यास आडकाठी अुरली नसल्यानें तो ते धंदे करूनहि पुन्हा ब्राह्मणच्या ब्राह्मण राहूं शकतो. तीच स्थिति अितर वर्णांची. पूर्वास्पृश्याविषयींहि निर्बंधाची अटक अुरलेली नाहीं. आज कोणताहि अस्पृश्य कोणताहि स्वतंत्र धंदा करूं लागला– वाणी, सुतार, डॉक्टर, बॅरिस्टर, शिक्षक झाला– तरी जातीच्या निमित्तानें निर्बंध ( कायदा ) त्यास अडवीत नाहीं. समाजाचा अप्रत्यक्ष अुपद्रव मात्र त्यास अजून सोसावा लागतो. पण त्यानें त्यास तोंड दिलें पाहिजे आणि वेळीं नैर्बंधिक सहाय्य घेऊन त्या अुपद्रवाची खोड मोडली पाहिजे. व्यवसायबंदी आज जर खरो-खर कुठें तुटली नसली तर ती भट नी भंगी ह्या दोन धंद्यांतच काय ती होय. त्यांतहि निर्बंध आड येत नाहीं. पण रूढि येते ! या दोन अपवादांस अुच्छेदिणें अेवढेंच काय तें सुधारकांचें काम व्यवसाय-बंदी तोडण्याचे प्रकरणीं अुरलेलें आहे. तें त्यांनीं केलेंच पाहिजे आणि त्यांनींच केलें पाहिजे. पैकीं भंग्याच्या धंद्याचें अेकस्व ( मोनॉपली ) तोडण्याचे दोन अुपाय:– अेक हा कीं, भंग्यास प्रत्येक प्रसंगीं सन्मानानें वागवावें. त्यास हेतुतः प्रकटपणें बरोबर

हातांत हात घालून हिंडावें. आपल्या घरीं सर्वसाधारणपणें स्पृश्य येतात तेथवर भंग्यासहि बेखटक येअूं द्यावें. समाजाच्या लक्षांत ठळकपणें येअील अशा थोड्या दिखाअूपणानें त्यास प्रत्येक स्थळीं सन्मानावें, म्हणजे भंग्याचा धंदा हलकट ही भावना नाश पावून अितर जाती वेळ प्रसंगीं त्या धंद्यांत पडण्यास कचरणार नाहींत. आणि दुसरा अुपाय हा कीं, सुधारकांनीं प्रसंगविशेषीं जाणून-बुजून सार्वजनिकपणें भंग्याचें काम करावें. वेळीं कांहीं दिवस तीच नोकरी करावी. भंग्याच्या संपांत तर सुशिक्षित सुधारकांनीं हेतुतः भंग्याचें सारें काम स्वतः करून नगरग्रामें स्वच्छ ठेवावीं. स्वतःचा भंगी नाहीं कोण! त्रिकाळ स्नान करणारा स्नातकहि आपलें भंग्याचें काम आपणच करतो. मोठा चक्रवर्ती राजा झाला, तरी तो बाकीचीं यच्चावत् कामें चाकरांकडून करवूं शकेल; पण स्वतःच्या भंग्याचें काम मात्र त्याचें त्यालाच करावें लागणार! तें काम कांहीं तो राजाहि दुसऱ्या कोणाकडे कांहीं केल्या सोंपवणार नाहीं! ही शिकवण सुधारकांनीं तोंडीं तर दिलीच पाहिजे, पण ती स्वतः प्रकट-पणें सार्वजनिक भंगीकाम प्रसंगविशेषें वरचेवर करून दाखवून आचरली पाहिजे.

भटाची व्यवसायबंदी मोडण्याचे अुपाय असेः— अेक हा कीं, ब्राह्मण सुधारकानें शक्य तों भट बोलावूंच नये. आपलीं घरचीं व्रतें, सत्यनारायण, पूजापाठ सारीं स्वतः करावीं. वेळीं लग्नेंदेखील नैबँधिक नोंदीनें पार पाडावीं, म्हणजे ब्राह्मण सुधारकांना सह-भोजनादि सुधारणांत प्रकटपणें भाग घेतांना जी ठराविक अडचण पडते कीं, 'नाहीं तर भट येणार नाहीं!' ती मुळांतच नाहींशी होअील. दुसरा अुपाय हा कीं, ब्राह्मणेतर सुधारकांनीं भटास चक्क अट घालावी कीं, 'तुम्ही आमच्या घरीं वेदोक्त संस्कार चालवाल तरच यावें.' गौरीगणपतीप्रभृति प्रत्येक प्रसंगीं भटाकडून वेदोक्त पूजा करून घेतल्या कीं, वेदोक्तबंदी तुटलीच. आपली वृत्ति बुडविण्या-पेक्षां मोठमोठ्या शेठजींच्या वा सरदार, श्रीमंत, अब्राह्मणांच्या घरीं

वेदोक्त चालविण्यास मान्य होणारे भट मिळतात ही प्रयोगसिद्ध गोष्ट आहे. उदाहरणार्थ, प्रत्यक्ष रत्नागिरींत ती घडत आहे. पण ब्राह्मणेतर सुधारकहि भटास ही अट घालण्यास वचकतात ! तिथें भटापेक्षां अशा वाचाळ सुधारकांचाच दोष अधिक असें म्हणणें भाग आहे. शक्य असेल तिथें भटांची व्यवसायबंदी तोडण्यासाठींच कांहीं अब्राह्मण विद्वान सुधारकांनीं हेतुतः भटकी शिकावी. गुरव, जंगम, जोशीप्रभृति अब्राह्मण भटांचीहि भटशाही अशाच अुपायांनीं मोडली पाहिजे. भटांची भटशाही ही सर्वस्वीं यजमानाच्या भाबडेपणांतच आहे. त्यांत भटाचा अपराध अगदीं अल्प, हें सुधारकांनीं केव्हांहि विसरतां कामा नये. त्यास उत्कृष्ट अुपाय म्हणजे भट बोलावूं नये हाच ! साऱ्या भाबड्यांनीं निरर्थक व्रतवैकल्यांच्या गौडबंगालास चाट देअून लग्नादि सामाजिक विधि नैर्बंधिक करारांच्या स्वरूपांत नैर्बंधिक नोंदीनें पार पाडावे; सारी पूजाप्रार्थना स्वतःच्या भाषेंत भक्तिभावानें स्वतःच करावी.

## (२) स्पर्शबंदी

जन्मजात जातिभेदाचा दुसरा उपाय जो स्पर्शबंदी तो पहिल्या व्यवसायबंदीच्या पायासारखा आज जरी आधींच लुला होअून पडलेला नाहीं, तरी त्यावर चहूंबाजूंनीं आज टोल्यावर टोले लगावले जात असल्यामुळें तोहि बराच अधू होत आला आहे. तरीहि सुधारकांना अजून दहाबारा वर्षें तरी ही स्पर्शबंदी अुखडून टाकण्यासाठीं पराकाष्ठेचे प्रयत्न करावयाला हवेत. स्पर्शबंदी ही व्यवसायबंदीप्रमाणें यच्चयावत् हिंदु समाजाला भोंवत नाहीं. 'स्पृश्य समजल्या जाणाऱ्या वीस कोटी हिंदूंची ह्या व्यादीपासून मुळांतच सुटका झालेली असते. अुरलेल्या तीनचार कोटी हिंदूंना मात्र जन्मतःच त्यांची स्वतःची अुपजत प्रकृति धडधाकट असतांहि, ह्या महारोगाचें वीष समाजाकडून बळानें टोंचण्यांत येतें. आणि त्यांचें जीवन प्रत्यक्ष महारोग झालेल्या दुर्भाग्याहूनहि दुर्भागी, दुर्धर, धीक्कृत नी अमंगळ करण्यांत येतें.

पण हा छळ 'स्पृश्य' च तेवढा अस्पृश्यांचा करतो असें नाहीं. तर 'अस्पृश्य' ही दुसऱ्या 'अस्पृश्या'चा असाच असह्य छळ करावयास सोडीत नाहीं. गांवच्या विहिरीवर कावळे, कुत्रीं बागडत असतां नी पाणी पीत असतां भर दुपारीं ताहानेनें व्याकुळ झालेल्या महाराला तें पाणी शिवतां येत नाहीं. हें पाहून तो महार जेव्हां त्याला तेथून शिवीगाळ करून हुसकून देणाऱ्या ब्राह्मण मराठ्यांना "राक्षस आहेत हे क्रूर" म्हणून शिवी देतो, तेव्हां तो ती शिवी देत नसून सत्य तेंच सांगत असतो ! पण महार-वाड्यांतल्या विहीरीवर भंगी जर तसाच तान्हेला, तशाच भर दुपारीं, तसेंच पाणी शिवूं लागला तर तेच महार त्याच ब्राह्मण-मराठ्यासारखे त्यासहि शिवीगाळ करून हुसकून देण्यास सोडीत नाहींत ! ब्राह्मणास 'पाजी' म्हणणारा महार स्वतःच भंग्याचा ब्राह्मण बनतो ! भंग्याला तसेंच छळण्याच्या 'पाजी' पणांत रति-भरहि कमी करीत नाहीं ! नाशिकच्या राममंदिर सत्याग्रहाच्या वेळीं महार मंडळी देवदर्शनाचा आपल्या हिंदुत्वाचा न्याय हक्क बजाविण्यास गेली असतां, देवांतहि अस्पृश्यतेची संस्था घुसवून, 'स्पृश्य' देव नी 'अस्पृश्य' देव असा भेद निर्मून, अस्पृश्यांच्या दर्शनानें देव विटाळूं नये म्हणून जेव्हां कांहीं भटजीशेठजींनीं त्या महारांची टाळकीं लाठ्यांनीं सडकलीं तेव्हां सात्विक संतापानें जे महार चवताळले, त्यांनीं हेंहि विसरतां कामा नये कीं, जर महार जातीच्या कोण्या मरीआओीच्या मंदिरांत देवदर्शनाच्या त्याच हिंदु-त्वाच्या हक्कासाठीं भंगी लोक जाऊं लागते तर महारांनींहि तित-क्याच लांब पल्ल्याच्या लाठ्यांनीं त्या भंग्यांचीं टाळकींहि तशींच सडकण्यास कमी केलें नसतें !

अर्थात् स्पर्शबंदी तोडण्यासाठीं केवळ 'स्पृश्य' सुधारकांनींच नव्हे, तर 'अस्पृश्य' सुधारकांनींहि परस्परांशीं सहकार्य करून प्रयत्नांची पराकाष्ठा केली पाहिजे. स्पर्शबंदी तोडण्याचें दायित्व 'स्पृश्यां' अितकेंच 'अस्पृश्यां'वरहि आहे.

अशा लहानशा लेखांत फुटकळ अुपाय अशेषतः सुचविणें अशक्य. सर्वसाधारण रूपरेखा आंखणें नी दिग्दर्शनापुरते कांहीं ठळक अुपाय सुचवणेंच काय तें शक्य. यास्तव स्पर्शबंदी तोडण्याच्या कार्यक्रमाविषयीं अितकेंच सांगणें अिथें पर्याप्त आहे कीं, अस्पृश्यता घालविणें म्हणजे दुसरेंतिसरें कांहीं नसून ' शिवणें ' हेंच होय. अस्पृश्योद्धार-- त्यांना शिक्षण, नोकऱ्या, घरें प्रभृति सहाय्य देणें हादेखील जातिभेदोच्छेदाचा विषय नव्हे. जातिभेदोच्छेदनाशीं प्रत्यक्ष संबंध जन्मजात अस्पृश्यता तोडण्याशींच काय तो आहे. न शिवणें म्हणजे अस्पृश्यता -- अर्थात् ' शिवणें ' म्हणजे अस्पृश्यता नाहींशी करणें. रोटीबंदी, बेटीबंदी, वेदोक्तबंदी प्रभृति अितर सुधारणा पुढच्या पायऱ्या. त्या स्पृश्यांसहि लागू असतात. अस्पृश्यांचा गट ' स्पृश्य ' केला कीं, स्पर्शबंदी तुटली. अर्थात् अितर नाना अल्पसंबद्ध वा असंबद्ध प्रश्नांची ह्या प्रश्नांशीं गुंतागुंत केल्यानें, स्पर्शबंदीची जी बेडी तोडणें अेका बाजूनें अितकें दुर्घट कार्य वाटतें तेंच दुसऱ्या बाजूनें अितकें सोपें होअून बसतें. केवळ शिवायचें ! कीं, जन्मजात जातिभेदाचा अेक पाय खाड्दिशीं अुखडला जाअून ज्याच्या त्याच्यापुरतें तरी चार कोटि हिंदुबांधवास माणुसकींत आणून सोडण्याचें महत्कृत्य त्याचें त्यानें पुरतें केलें म्हणून समजण्यास हरकत नाहीं. तरी रे हिंदुसंघटका, अूठ आणि दुसरें कोणीं काय हवें तें करो, तूं तुझ्यापुरतें या घटकेपासून हें व्रत धर कीं **जें बोट कुत्र्या मांजरास मी लावतों तें बोट मी माझ्या 'अस्पृश्य' धर्मबंधूस, माणसास, प्रत्यहीं लावल्यावांचून प्रत्यहीं अन्नग्रहण करणार नाहीं.** म्हण, ' शिवेन ! ' आणि कोणातरी अस्पृश्य धर्मबंधूस प्रत्यहीं, प्रकटपणें सगळ्यांना तसा शिवून दाखीव ! -- कीं तुझ्यापुरता तूं अस्पृश्यतेच्या पापापासून हिंदु जातीस मुक्त केल्याचें पुण्य जोडलेंस ! सर्वसाधारण स्पृश्याला घरांत आपण जितके येअूं देतों तितकें अस्पृश्यांस येअूं द्यावें, ज्यांचीं भाड्यानें देण्याचीं घरें असतील त्यांनीं स्पृश्यांप्रमाणेंच तीं 'अस्पृश्यांना'हि भाड्यानें द्यावींत; ज्यांच्या स्वतःच्या

विहिरी असतील त्यांनीं त्या स्पृश्यांअितक्याच अस्पृश्यांना अुघडाव्या, जाणूनबुजून प्रदर्शनास्तवच महार, भंगीप्रभृति धर्मबंधूंस हातांत हात घालून साधेल तितक्या वेळां मार्गानें, बाजारांत, यात्रेंत प्रकटपणें हिंडावें. थोडक्यांत म्हणजे, जो कोणी अस्पृश्य भेटेल त्याला स्पृश्य समजूनच ते ते व्यवहार त्यांच्याशीं दिवसांतून अेकदां तरी प्रगटपणें सगळ्यांदेखत केल्यावांचून संध्याकाळ अुलटूं देअूं नये. ‘अस्पृश्य’ सुधारकानें त्याच्या ‘खालच्या’ अस्पृश्यास, तसेंच व्रत धरून अेकदां तरी दिवसांतून स्पृश्यत्वाचा अधिकार देअून शिवावें. चांभारानें धेडास, महारानें भंग्यास! संघटक सुधारकांपैकीं जर प्रत्येकजण बोलघेवडेपणा सोडून असा करघेवडेपणा प्रत्यहीं आचरला, आपल्या-पुरतें तरी ‘अस्पृश्यांस’ पूर्वास्पृश्य करून सोडलें, तरी देखील दहा वर्षांच्या आंत अस्पृश्यतेचा मागमूसदेखील साऱ्या समाजांत आढळून येणार नाहीं. अितकी संघटक सुधारकांची संख्या आजहि पुष्कळ झालेली आहे.

अस्पृश्य सुधारकांनीं आणखी अेक व्रत व्यक्तिशः स्वीकारलें पाहिजे. आज निर्बंधानें अनेक शाळा, कचेऱ्या, धर्मशाळा, विहिरी, वाहनें प्रभृति सार्वजनिक स्थानीं अस्पृश्यतेचें अुच्चाटन केलें आहे. त्या साऱ्या नैर्बंधिक (कायदेशीर) सवलतींचा प्रत्यक्ष अुपयोग प्रत्येक अस्पृश्य सुधारकानें हटातटानें करून त्या आत्मसात् केल्या पाहिजेत. ही गोष्ट सध्यां त्यांतल्या त्यांत सहज आहे. कारण त्यांत निर्बंधाचें सहाय्य सुधारकांच्या बाजूस आहे. या कामीं श्री. राजभोज बोर्डाच्या विहिरींवर अस्पृश्यांकडून प्रत्यक्षपणें पाणी भरविण्याची जी खटपट करतात आणि नागपूर प्रभृति प्रांतीं निर्बंधा-नुरूप अुघडलेल्या तलाव प्रभृति स्थानांचा प्रत्यक्ष अुपयोग करून घेण्याचा पायंडा जो तिकडील अस्पृश्य पुढारी चळाअी करून, वेळीं सत्याग्रहानेंहि पाडीत आहेत तो प्रत्येक ‘अस्पृश्या’नें जिकडेतिकडे अनुकारिला पाहिजे.

परंतु आज जे हे नैर्बंधिक अधिकार अस्पृश्यांस मिळालेले आहेत, **त्या सर्वांत अत्यंत परिणामकारक अधिकार म्हणजे शाळांतून मुलें सरमिसळ बसविण्याचा होय.** हा अधिकार प्रत्येक अस्पृश्यानें तलाव, विहिरीप्रभृतींच्याहि आधीं बजावावा. मुलें प्रत्यहीं शाळेंत स्पृश्यास्पृश्य भावना विसरावयास शिकलीं कीं, पुढच्या पिढीला धोबीप्रभृतिप्रमाणेंच महारभंगीहि पूर्णपणें नी सहजगत्या स्पृश्य वाटणारच वाटणार— केवळ संवयीच्या बळें ! ते अस्पृश्य केव्हां-तरी होते याची आठवणहि बुजेल– लहानपणा-पासून सरमिसळ खेळीमेळीनें वागत आल्यानें ! स्पृश्य मुलांशीं–खोत, वकील, शेठजींच्या मुलांशीं, बरोबरीनें प्रत्यहीं मांडीस मांडी भिडवून बसत आल्यानें अस्पृश्य मुलांची राहाणी सुधारते आणि अनेक प्रसंगीं बुद्धीच्या चढाओढींत अस्पृश्य मुलांचा क्रमांक ब्राम्हणा-दिकांहूनहि वर लागत असल्यामुळें अेका बाजूस अस्पृश्याचा आत्म-विश्वास वाढतो, दुसऱ्या बाजूस स्पृश्यांचा अहंकार घटतो. आज शाळेंत अस्पृश्य मुलें सरमिसळ बसूं लागलीं कीं, अुद्यां आपण होअून त्या अस्पृश्यांचे 'पूर्वास्पृश्य' झालेच ह्मणून समजावें ! पुन्हा शाळांतून सरमिसळ बसण्याचे कामीं सरकारी निर्बंध (कायदा) अस्पृश्यांचे बाजूसच असल्यानें, मंदिरप्रवेशापेक्षांहि अधिक परिणामकारक असतांहि हा अुपाय अधिक सहजसाध्य ठरतो.

यास्तवच मंदिरप्रवेशाचा प्रश्न सध्यां दुय्यम समजावा— शाळाप्रवेशाहून तरी ! कारण मंदिराविषयीं वहिवाट, वैयक्तिक मत्ता अित्यादि प्रत्येक प्रकरणीं निर्बंध (कायदा) अस्पृश्यांच्या अुलट जाणार हें ठरलेलें. मंदिरप्रवेशाच्या प्रश्नावर चढाअी करून त्यास सुरुंग लावण्याचा, कमींत कमी विरोधाचा नी जास्तींत जास्त परि-णामाचा मार्ग, म्हणजे रत्नागिरीच्या पतितपावन मंदिरासारखें अेकेक अखिल हिंदु देवालय, जातिनिर्विशेषसमानतेच्या पक्क्या पायावर प्रतिनगरीं स्थापणें, तेंच शस्वीं करून दाखविणें – हाच होय. जुनीं

मंदिरें घडाघड अुघडलींच पाहिजेत, अुघडणारच; पण तीं त्यांच्यावर समोरून चढाअी करून नव्हे, तर अखिल हिंदु देवालयांचा वा धर्मालयांचा सुरुंग त्यांचे मर्मस्थानींच भरून त्याच्या धडाक्यासरशीं समाजाच्या भावनेंतच क्रांति घडविल्यानें होय. ह्या वर्षी पुढें मागें रत्नागिरीच्या जात्युच्छेदक आंदोलनाच्या प्रयोगाची प्रत्यक्ष फलश्रुति आम्ही अेका लेखांत स्वतंत्रपणें सांगूं अिच्छतों. त्यांत श्रीपतितपावनासारख्या ह्या अखिल हिंदुसंस्थचे परिणाम ह्या प्रकरणीं किती दूरवर होतात, तें स्पष्टविलें जाअीलच.

## (३) रोटीबंदी

जन्मजात जातिभेदांचें अुच्चाटण जर आजच्या परिस्थितींत कोणत्या अेखाद्या रूढीच्या अुच्चाटणांत बव्हंशीं सामावलेलें असेल तर तें ह्या अुच्चाटणांतच होय. कारण व्यवसायबंदी तुटलेलीच आहे; स्पर्शबंदी ही सर्व हिंदुसमाजास लागूं नसून अस्पृश्यांपुरतीच आहे. तुटर्ताहि आली आहे आणि रोटीबंदी तुटून महाराबरोबर ब्राम्हण जर जेवूं लागला, तर तो स्पर्श करील कीं नाहीं हा प्रश्नच अुरत नाहीं. अुंटच गिळणारा सुपारीचें खांड गिळण्यास का कचरणार आहे? आणि बेटीबंदी ही रोटीबंदी तोंडण्याइतकी कां अवश्य नी कठिण नाहीं तें आम्ही पुढें सांगतच आहों. अशा रीतीनें आजच्या जातिभेदाच्या या चार पायांपैकीं जो पाय मुख्यत्वेंकरून हाणतांच हें धूड खालीं कोसळणारें आहे तो पाय रोटीबंदी हाच होय! आजच्या ह्या हजारों जाती एकमेकांपासून पृथक करणारें मुख्य नी सर्वगामी जिवंत लक्षण रोटीबंदी नी बेटीबंदी हेंच होय. पकीं बेटीबंदी फार थोड्या प्रमाणांत जात्युच्छेदनाच्या सार्वजनिक नी त्वर्य (अर्जंट) कार्यक्रमास आडवी येते. ती कशी तें पुढें पाहूं. अुरलेली रोटीबंदी तेवढी तत्काळ तोडलीच पाहिजे आणि ती तोडली कीं, जन्मजात जातिभेदांत जो कांहीं थोडाबहुत खरा जीव आज अुरलेला आहे त्याच्या मर्मी मारक टोला बसलाच म्हणून समजावें.

रोटीबंदी तोडावयाचें साधनहि विश्वास वाटूं नये अितकें सोपें आहे; नुसतें जेवायचें!– भिन्न जातीयाबरोबर जेवायचें! कीं हा अेवढा दुर्गम, दुस्साध्य वाटणारा जातिभेदाचा प्रचंड गड गडगडत कोसळलाच पाहिजे. जातिभेद अेकत्र लढून जन्मांत मरायचा नाहीं; पण अेकत्र जेवतांच तो ठिकच्या ठिकाणीं मरून पडतो. यास्तव प्रत्येक खऱ्या सुधारकानें हें सूत्र वेशीवर टांगावें कीं, 'जें रुचेल नी पचेल तें वैद्यकीय दृष्ट्या योग्य त्या कोणत्याहि मनुष्यानें खावें, नी प्यावें!' तो हिंदु असो, मुसलमान असो वा अंदमानीज असो– कोणाबरोबरहि खाण्यानें, पिण्यानें, सहभोजनानें वा सहपानानें, जात जात नाहीं! धर्म बुडत नाहीं! सहपान वा सहभोजन हा वैद्यशास्त्रीय प्रश्न आहे; जातीची जात किंवा धर्मच्या धर्म भाताच्या पेजीच्या बुडबुड्यांत बुडतो, असें सांगणाऱ्या भाबड्या धर्मशास्त्राचा नव्हे! आम्हांस जर कोणा संघटक सुधारकानें विचारलें कीं, आजच्या स्वरूपांत असलेल्या ह्या पोथीजात जातिभेदाचें मरण नक्की कशांत आहे? तर आम्ही अेका शब्दांत अगदीं प्रयोगसिद्ध सत्य म्हणून सांगूं कीं—

## सहभोजन! सहभोजन!! सहभोजन!!!

या पोथीजात जातिभेदाचें मरण सहभोजनांत आहे. पण त्याच्या अटी ह्याः– (अ) 'आम्हांस सहभोजनाचें तत्त्व मान्य आहे!' अशी वाचाळता करून प्रत्यक्षपणें सहभोजनांत भाग घेण्यास कचरतां कामा नये. (आ) सहभोजनांत अितर कोणी भाग घेवो वा न घेवो अन्य जातीचा अेकच मनुष्य जरी मिळाला, तरी आपण आपल्यापुरतें त्याच्याबरोबर जेवून आपल्यापुरती रोटीबंदी तोडली पाहिजे. (अि) ती जन्मांत केव्हां तरी अेकदां तोडूं, आतां पुन्हा मुद्दाम कशाला? असें विचारीत पुन्हां अुभ्या जन्मांत सहभोजनांत पाय न टाकणारें भीरुत्व वा सभ्यत्व कुचकामी समजून प्रत्यहीं प्रसंग

आला तरी प्रत्यहीं सहभोजन केलें पाहिजे. प्रत्यहीं ब्राम्हणभोजन करणारा जर अधिकच पुण्यशील समजला जातो, तर प्रत्यहीं सहभोजन करणारा मात्र खटयाळ कां समजला जावा ? (औ) प्रत्यक्ष सहभोजन प्रकटपणें —जाहीर रीतीनें— झालें पाहिजे. नांवें शक्यतों छापलींच पाहिजेत. अिराण्याच्या दुकानांत जसे अचानक 'भटजी' सांपडतात आणि कॉलेजांतून वा कलेक्टरम्लेंच्छांसह गुपचुप जेवणारे वकील वा पदवीधर अुघडपणें आमच्या रोटीबंद आर्यसंस्कृतीचा अुदोअुदो करतांना गल्लोगल्लीं जसे आढळतात, तसेच मिथ्याचारी सुधारकहि दुर्मिळ नाहींत ! त्यांचा उपयोग काय ? (अु) प्रत्येक सहभोजनांत शक्य तों 'अस्पृश्य' मनुष्य अवश्य असावा. सहभोजनाची तीच खरी क्षारपरीक्षा (ॲसिड टेस्ट) आहे ! नाहीं तर केवळ ब्राम्हणाबरोबर मात्र सहभोजनें करण्यास हपापलेले, पण महाराबबरोर बसतांच 'आज कोठा जड, दूध घेतों कीं थोडें !' अशी लटपटपंची करणारे समाजिस्ट कांहीं थोडेथोडके भेटत नाहींत !

आम्ही अनुभवजन्य निश्चितीनें सांगतों कीं, असें प्रत्यक्ष आचरण करणारे पांचशें संघटक सुधारक वारंवार सहभोजनें करीत राहिले, तर पांच हजार वस्तीच्या नगरांतून रोटीबंदीची रूढि अुखडून टाकूं शकतात. जेवण्यावारीं जातिभेद मारला जातो, तें कसें हें लेखमर्यादेमुळें अिथें पाल्हाळानें आम्हीं सांगत बसत नाहीं— पाल्हाळ अवश्यहि नाहीं. खऱ्या संघटक सुधारकांस आम्ही ग्वाही देतों कीं, तुम्ही आधीं करून पाहा. फळ न मिळालें तर मग ह्याचें समर्थन आम्हांस पाल्हाळानें विचारीत बसा. बहिष्कार ? पडतीलच ! पण पांचशें चिकाटीच्या सहभोजक सुधारकांवर बहिष्कार घालणारा पांच हजारांचा बहुजनसमाजहि अंतीं मेटाकुटीस येतो. कारण बहिष्कार हें दुधारीं शस्त्र घालणांरासहि तें कापतें. खरा सुधारक निश्चितार्थ असतो. बहुजनसमाज तसा नसतो. संख्येचें प्रमाण हें वरचें असलें तर, बहुजनसमाजच या रोटीबंदीच्या प्रकरणीं तेवढे

बोलायचें तर– आज तितकासा मनःपूर्वक विरुद्ध नसल्यामुळें त्रास सोसण्याअितका चिवट राहात नाहीं आणि शेवटीं त्याची दृष्टि मरून, त्यांत त्याला कांहीं विशेष चिडल्यासारखें वाटेनासें होऊन, आगबोटींत विटाळ नाहीं हें शास्त्र जसें जन्मलें तसें सहभोजनानें जात जात नाहीं हें शास्त्रहि न कळत अुमजतें,– पटतें.

## (४) बेटीबंदी

जातिभेद मोडायचा ह्मणतांच सर्वसाधारणतः बहुतेक लोकांना जो धक्का बसतो तो त्यामुळें बेटीबंदी तुटून प्रचंड घोंटाळा अुडणार ह्याच कल्पनेनें होय ! ह्मणजे आतां शेंकडों ब्राह्मणांच्या मुली महारवाड्यांत कोंबायच्या नी चांभारांच्या मराठामोळ्यांत घुसायच्या ! अशी एक भयानक कल्पना जातिभेद मोडायचा ह्मणतांच लोकांसमोर उभी राहाते ! रोटीबंदी तोडून महारांच्या पंक्तीस ब्राह्मण जेवणाऱ्या सहभोजनांचादेखील त्यांना अेक वेळ अितका धक्का बसत नाहीं; पण बेटीबंदी तोडण्याचें नांव काढतांच ते अगदीं घाबरून जातात ! अुलटपक्षीं कित्येक सुधारक विशेषतः जहाल अस्पृश्य– जातिभेद तोडायचा याचा अर्थ ब्राह्मणांच्या मुली आह्मांस दिल्या पाहिजेत असाच नेमका ठांसूनठांसून सांगतात !

पण वास्तविक पाहातां त्या पहिल्यांची भीति नी ह्या दुसऱ्यांची आकांक्षा हीं सारखींच असत्य नी अतिरेकी आहेत. कारण बेटीबंदी तोडण्याचा अर्थ अमक्याच्या मुली तमक्यांना 'दिल्याच' पाहिजेत असा नाहीं. ब्राह्मणांच्या वा वाण्यांच्या मुली आम्हांस 'दिल्याच' पाहिजेत असे ह्मणणारे अस्पृश्यहि त्या सवद्याच्या प्रतिमूल्याचा प्रश्न निघतांच धक्का खाऊन 'नव्हे, नव्हे, दिल्याच पाहिजेत असें नव्हे ! ' असें म्हणत चांचरूं लागतात; कारण त्यांसच तें प्रतिमूल्य परवडत नाहीं. जातिभेद मोडण्यासाठी ब्राह्मण–वाण्यांच्या शंभर मुली जर महारचांभारांस 'दिल्याच' पाहिजेत, तर त्याच

अटीप्रमाणें महारचांभारांच्या शंभर मुली भंग्यांस नी धेडांसहि 'दिल्याच' पाहिजेत, म्हणून भंग्यांच्या वतीनें मागणी घालण्याचा उशीर कीं, त्याच महारचांभारजहालांस भीक नको पण कुत्रा आंवर असें होऊन जातें. आणि तेहि विवेकाची भाषा बोलूं लागतात.

तो विवेक असाः– अमक्यानें तमक्या मुली 'दिल्या' पाहिजेत ही भाषाच मूलतः असह्य नी आजतर अशक्य आहे! आजच्या मुली उपवर असणार, त्यांच्या वरांना दिवसेंदिवस मुख्यतः त्याच निवडणार. आम्हांस 'देणारे' तुम्ही कोण म्हणून त्या आओीबापांस देखील जिथें हटकणार तिथें तिसऱ्या सोमाजीगोमाजीस कोण विचारतो. दुसरें असें कीं, महार, वाणी, बंगाली, मराठ्यानें अेखादे दिवशीं क्षणभर शेजारीं बसून सहभोजनांत जेवणें निराळें आणि भाषा, वेषभूषा, आचारआहारानें विभिन्न अशा अेका रहाणींतील मुलीला दुसऱ्या अगदीं अपरिचित राहाणींत जन्माची ढकळणें वा जावें लागणें हें निराळें! अुद्यां रोटीबंदी जरी अगदीं निर्बंधानें (कायद्यानें) तोडली, तरीदेखील महाराष्ट्रीय ब्राह्मण मुलीला बंगाली ब्राह्मणाच्यादेखील घरीं देणें हजारी नअूशेंनव्याण्णव अंशीं परवडणार नाहीं, जुळणार नाहीं. कारण जातीचा विचार सोडला, तरी लग्नासारख्या आजच्या शरीरसंबंधांत सोयीचा विचार तरी केला जाणारच जाणार. त्या मराठी नी बंगाली ब्राह्मण वधूवरांच्या आवडीनिवडीहि जुळणें दुर्घट. मराठी ब्राह्मण वधू त्या बंगाली ब्राह्मणाच्या घरीं, आपल्या सासरीं जातांच तीं माणसें बंगाली बोलणार, ही मराठींत अुत्तरणार! कानडीनें केला मराठी भ्रतार! अेकांचें अुत्तर अेका नये! पुढें स्नानें होअून साड्या पालटूं लागतांना त्या बंगाली सासू-जावा बिनकास्टयानें लुगडीं नेसणार; हिला तसेंच बिनकाष्टयानें सगळ्यांसमोर वावरणें जिवावर येणार! सैंपाकाला ती सासू बसली कीं, हिला सांगणार, 'येवढे चार मासे सोलून दे पाहूं?' जेवतांना ती बंगाली ब्राह्मणांच्या रीतीप्रमाणें

माशांची आमटीं भुरक भुरक भुरकणार ! ही मराठी ब्राह्मणांची मुलगी त्या मासोळी जेवणाच्या वासासरशीं ओकओक ओकणार ! परत वरचेवर माहेरीं यावें तर अेका वर्षाचा येत्याजात्या भाड्यांचा खर्च लग्नाअेवढा होत रहाणार ! ! ही गोष्ट जशी अेका प्रांतांतील मुली स्वजातीय परप्रांतीयांच्या घरीं दिल्याची, तशीच गांवांतल्या गांवांतहि महाराची मुलगी मराठ्याच्या वा चांभाराची महाराच्या घरीं देण्याची. अंतर, भाषा, रहाणी अित्यादि सोयी-गैरसोयीमुळें नी आवडीनिवडीमुळें रोटीबंदी तत्त्वतः तुटली तरी, अेका जातीच्या मुली शेंकड्यानें अन्य जातींत ढकलल्या जातील अशी जी भीति वाटते ती तसें कधींहि घडणें शक्य नसल्यामुळें अगदीं काल्पनिक आहे. इंग्लंड नी स्कॉटलंड यांमध्यें जातवारीची बेटीबंदी नाहीं. पण ह्या सोयीगैरसोयीमुळेंच हजारीं अेक अिंग्लिश मुलगी लंडनला पिढ्यान् पिढ्या राहात असतां स्कॉटलंडांत दिली जाते कीं नाहीं, याची शंकाच आहे. लंडनच्या मुली बहुधा लंडनच्या आसपासच आपले वर निवडणार. तीच स्थिति जातवार बेटीबंदी तत्त्वतः तुटली तरी पुण्याची, मद्रासची, कलकत्त्याची, रत्नागिरीची तिथल्या मुली बहुधा आपल्या शेजारच्या गांवांत नी स्वजातींतच आपलें सासर शोधणार, आपले स्वयंवर निवडणार. तेन्हां बेटीबंदी तत्त्वतः तुटली, तरी प्रत्यहींच्या व्यवहारांत अकस्मात् कोणतीहि म्हणण्यासारखी अुलाढाल होणें शक्य नाहीं. मग बेटीबंदी तोडायची याचा अर्थ तरी काय ? त्याचा अर्थ हा कीं—

**बेटीबंदी तोडणें म्हणजे, अमक्या जातीच्या मुली तमक्या जातींत 'दिल्याच' पाहिजेत अशी आज्ञा नसून, जर कोणा हिंदूनें प्रेमशील, सुप्रजननक्षमता प्रभृति वैवाहिक गुणानुकूल असा अन्य जातीचा हिंदु वधूवर निवडला तर, केवळ जात भिन्न अेवढ्यासाठींच, तो विवाह निषेधिला जाअू नये वा त्यायोगें त्या वधूवरांस पूर्णपणें सव्यवहार्य समजण्यास हरकत असूं नये, अशी अेक अनुज्ञा आहे.**

अशी मिश्र विवाहाची अनुज्ञा जन्मजात जातिभेद मोडण्याच्या दृष्टीनें नव्हे, तर शुद्धिचळवळ पचविण्यासहि अत्यंत अवश्य आहे. हिंदु राष्ट्राच्या संघटनास अुपकारक नी अपरिहार्य आहे.

बेटीबंदी तोडण्याची अेक मर्यादा मात्र मनुष्यप्रगतीच्या सद्यः-स्थितींत नी हिंदु राष्ट्राच्या आजच्या विशिष्ट परिस्थितींत निरपवाद-पणें पाळणें अवश्य आहे. ती ही कीं, हिंदूनें आपसांतील कोणत्याहि जातीशीं विवाह केला तरी चिंता नाहीं; पण हिंदुत्वाच्या कक्षेबाहेर जाअून कोणीहि मुसलमान ख्रिश्चनादिकांशीं विवाह करतां कामा नये. जोंवर मुसलमान ,मुसलमानच राहूं अिच्छितो तोंवर हिंदुला हिंदूच राहिलें पाहिजे. तिला वा त्याला हिंदु करून घेतल्यावांचून अहिंदूशीं विवाह करणें आपल्या हिंदु राष्ट्राच्या सामुदायिक हितास अत्यंत अनिष्ट आहे. ज्या वेळीं ते दुराग्रही अहिंदु केवळ मनुष्यधर्मास भजूं लागतील नी मुसलमानकी सोडून माणुसकींतच समावतील. तेव्हां हिंदूहि त्याच मनुष्यधर्माप्रमाणें मनुष्यामनुष्यांत कोणताहि जातिधर्म, देशाचा भिन्नभाव मानण्याचें सोडून केवळ माणुसकीचें नातें तेवढे पाळतील. आज मात्र हिंदूंनीं तसा भोळसटपणा करणें हेंच माणुसकीच्या विरुद्ध आहे.

## बॉंब-गोळ्यांनीं नव्हे, बुंदीच्या लाडवांनीं !

जर या दोन्ही लेखांकांत दिग्दर्शिलेला कार्यक्रम पुढें ठेवून प्रत्येक संघटक सुधारक, अितर कोणाची वाट न पहातां आपला आपण ह्या सुधारणांस स्वतःच्या प्रत्यहींच्या आचरणांत व्यवहारूं लागेल, प्रत्यक्ष तसें करूं लागेल, तर जन्मजात जातिभेद ज्या अर्थी तो मोडायचा आहे त्या ह्या लेखांत विशदिलेल्या अर्थी अुच्छेदिणें फारसें दुर्घट नाहीं. ज्याच्या त्याच्यापुरता तरी जातिभेद आजच्या आज तोडतां येणार आहे. त्यांतल्या त्यांत त्यांचा आजचा जिवंत चालता पाय जी रोटीबंदी ती तर प्रत्येक सुधारकानें

तत्काळ आणि सारखी तोडीत राहिलें पाहिजे. सहभोजन हाच जातिभेदाच्या समंधास गाडणारा प्रबल मांत्रिक ! नुसत्या शास्त्राधाराच्या अेरंडाच्या गुन्हाळानें तर तो जातिभेद मरणार नाहींच, पण प्रत्यक्ष शस्त्राधारांच्या नैबंधिक सक्तीसहि तो मारणें दुर्घट, अनिष्टहि. जसा मारावा तसा जर त्यास मारणें असेल, तर सुधारका, तूं तुझ्यापुरती रोटीबंदी तत्काळ तोडून टाक. किती सोपें हें साधन ! ब्राह्मण व महारांनीं अेकत्र बुंदीचे लाडू झोडावयाचे कीं जातिभेद मेलाच म्हणून समजा ! जातिभेदाच्या ह्या अजिक्य किल्ल्यास असाच शाप मिळालेला आहे कीं, तूं शतकोशतकें बॉंबगोळ्यांच्या माऱ्यानेंहि ढासळणार नाहींस; पण शेवटीं बुंदीच्या लाडवांचा मारा मात्र तुझा चक्काचूर अुडवील ! !

● ● ●

# मद्रास प्रांतांतील कांहीं अस्पृश्य जाति

जातिभेदाचें आजचें तिरस्कारार्ह स्वरूप किती भयंकर आहे आणि त्यायोगें आपल्या हिंदु राष्ट्राचीं कशीं छकलें छकलें अुडलीं आहेत हें विशदिण्याच्या कार्यीं नुसत्या तात्त्विक वा सामान्य विवेचनानें मनावर जो परिणाम होतो त्यापेक्षां शतपटीनें अधिक परिणाम त्याच्या स्फुट विवरणानें होतो. काश्मीरपासून रामेश्वरपर्यंत किती भिन्नभिन्न जाती, त्यांच्या अुपजाती, पुन्हा त्या अुपजातींच्या पोटजाती, त्या जाति-अुपजाती-पोटजातींतील प्रत्येक जात, अितरांपासून बेटीबंद, रोटीबंद, लोटीबंद झालेली ! 'जातिभेद' म्हणतांच बहुतेकांस त्याच्या ह्या 'बहुशाखाह्यनंताश्च' अशा विषारी विस्ताराची कांहींअेक कल्पना येत नाहीं आणि त्यामुळें जातिभेदानें आपल्या हिंदु राष्ट्राची किती अपरिमित विघटना केली आहे, किती तुकडेतुकडे पाडले आहेत आणि त्याचे परिणाम किती

भयावह होत आहेत, याची पुसट अशीसुद्धा कल्पना येत नाही. 'जातिभेद' म्हणतांच बहुतेकांच्या दृष्टीपुढें नुसतें चातुर्वर्ण्य अेवढाच अर्थ अुभा राहतो आणि ते म्हणतात, "त्यांत हो काय ! बुद्धिशाली वर्ग, शक्तिशाली वर्ग, धनिक नी श्रमिक, बस्स, चारच वर्ग ! आणि तो किती सोयिस्कर श्रमविभाग ! प्रत्येक राष्ट्र ह्याच चार विभागांत विभक्त नसतें का ?" पण प्रथमतः प्रत्येक राष्ट्रांत ह्या चार विभागांना, रोटीबंदी-बेटीबंदीच्या दुर्लंघ्य तटांना मध्यें अुभारून जन्मजातपणें पृथक् केलेलें नसतें. कामापुरते ते वेगळे, पण संध्याकाळीं पुन्हा घरीं येतांच अेकत्र रहाणारे, अेकत्र जेवणारे, अेका कुटुंबांत मिसळून अेकजाति होणारे कुटुंबीय असतात. श्रमविभाग सर्वत्र असेल; पण श्रमविभागानें तिकडे जातिविभाग पडून राष्ट्राचीं चार बेटीरोटीलोटीबंद छकलें अुडालेलीं नाहींत !

पण 'जातिभेद' म्हणतांच– 'चातुर्वर्ण्य' चारच काय तीं छकलें– हा अर्थ जो बहुतेकांच्या मनांत येतो तोच किती चुकीचा आहे ही गोष्ट जातिभेद या सामान्य नांवाचें फुटकळ विवरण, नुसतें परिगणन करतांच स्पष्ट होतें ! चातुर्वर्ण्य म्हणजे चार वर्ण आणि जातिभेद म्हणजे कमींत कमी चार हजार जाति ! 'ब्राम्हणजात' या सामान्य नांवानें, नुसत्या ब्राम्हण या जातीच्या तात्त्विक चर्चेनें, ती एकच जात असा बोध वरवर होत राहातो; पण तिचें फुटकळ वर्णन करूं लागतांच, नुसतीं कोण कोण ब्राम्हण तीं नांवें सांगूं लागतांच, ब्राम्हणांच्याच पांचशें पोटजाती बेटीबंद, रोटीबंद कशा आहेत याचा एक निराळाच संस्कार मनावर झटपट होतो. तीच गोष्ट क्षत्रिय ह्या एका शद्बाची, वैश्य ह्या शद्बाची, शूद्र ह्या शब्दाची. म्हणजे जातिभेद ह्या सामान्य शद्बानें वा त्याच्या तात्त्विक चर्चेनें जो अेकपणाचा वा फार फार तर चारपणाचा पुसट बोध होतो तो त्या जातिभेदाचें फुटकळ विवरण करूं लागतांच नाहींसा होऊन, चार जातींच्या चारशें मोठमोठ्या जाति, त्यांच्या अुपजाति-पोटजाति चार हजार होऊन पडतात !

तीच गोष्ट 'अस्पृश्य' ह्या शद्वाची. अस्पृश्य वर्ग असा सामान्य अुल्लेख केला म्हणजे मनाची कशी फसगत होते पाहा! तो जसा कांहीं अेक गट आहे. स्पृश्य नांवाच्या दुसऱ्या अेका गटानें काय तो त्यांचा अस्पृश्यतेचा भयंकर छळ चालविला आहे, अितकाच अर्थ भासमान होतो. पण अस्पृश्य कोणकोण, त्या अेका शद्वाच्या पोटांत किती जाति, अुपजाति, पोटजाति भरलेल्या आहेत आणि अेक अस्पृश्यहि दुसऱ्या अस्पृश्यास कसा अस्पृश्यच लेखतो, या पापाचा अधिकारी 'स्पृश्य' तेवढा नसून अस्पृश्यहि कसा असतो, हें त्या अस्पृश्य जातींच्या विवरणानें, फुटकळ वर्णनानें, जसें ध्यानीं येतें तसें त्या शद्वाच्या नुसत्या सामान्य अुच्चारानें वा तात्त्विक चर्चेनें येत नाहीं.

जातिभेद वा अस्पृश्यता प्रभृति सामान्य शद्वांच्या अुच्चारासरशीं जो अर्थ वा अनर्थ मनुष्यांच्या मनाला साधारणत: प्रतीत होतो, त्याहून त्यांच्या फुटकळ वर्णनानें वा परिगणनानें किती अुत्कटपणें मनावर ठसतो, तें अेका दुसऱ्या अुदाहरणानें दाखवूं. 'जातिभेदानें हिंदु राष्ट्राचीं छकलें केलीं' हें सामान्य नी तात्त्विक विधान वाचतांच कोणाच्याहि मनावर हिंदु राष्ट्राच्या जातिभेदानें अुडालेल्या त्या छकलाचा आणि त्यायोगें झालेल्या भयंकर हानीचा जो पुसट ठसा पडतो तो पहा आणि तीं छकलें कितीं, त्यांचें नुसतें महाराष्ट्रापुरतें ओझरतें विवरण, नुसतीं जातींचीं नांवें अुच्चारतांच जो यथातथ्य ठसा अुमटतो नी त्या हानीची बिनबोलतां किती भयंकर कल्पना येते ती पहा. महाराष्ट्रांतील जाति — देशस्थ, चित्पावन, कऱ्हाडे, गोवर्धन, सामवेदी, पळसे, सारस्वत, शेणवी, कुडाळकर, भंडारी, मराठे, दैवज्ञ, कासार, लिंगायत, संगमेश्वरी वाणी, नामदेव शिंपी, भावसार शिंपी, कोंकणस्थ वैश्य, देशस्थ वैश्य, पाताणे प्रभू, साळी, माळी, कोष्टी, तांबट, सोनार, धनगर, जिनगर आणि प्रत्येकीं पुन्हा पोटजाती! अेका 'मराठा' जात या अेकेरी शद्वाचें विवरण केलें, तर शंभर पोटजाती! अस्पृश्य जात या अेकेरी शद्वाचें विवरण करतांच, अेकेरी

पेंव फोडतांच अळ्याच अळ्या निरनिराळ्या बाहेर पडाव्या तशाच जातीच जाती बाहेर पडतात. महार, चांभार, मांग, वडार त्यांच्यांत पुन्हा पोटजाती– कोंकणस्थ महार, देशस्थ महार, कोकणे चांभार, अितर चांभार ! वराडांतदेखील पुन्हा पोटजाती असून त्या अेकमेकांत 'उच्च जाति' आणि 'नीच जाति' म्हणून पृथक् पृथक् ! त्या अस्पृश्यांतील अेक जात दुसरीस अस्पृश्य मानणारी ! या सार्‍या जाती बहुधा अेकमेकांपासून बेटीबंदीनें नी रोटीबंदीनें जन्माच्या, पिढ्यान्पिढ्या कधीहि अेकजात होण्याचा संभव नसलेल्या !

जातिभेदानें आपल्या हिंदु राष्ट्राच्या पाडलेल्या ह्या अनेक तुकड्यांपैकीं कोणतेहि दोन तुकडे अेकांत सांधणें अधर्म–पण त्या पडलेल्या जातींच्या शतशः तुकड्यांपैकीं प्रत्येक पिढींत पाडण्यास पूर्ण स्वातंत्र्य–तो धर्म ! प्रभुजातींत अेकाच्या हातून गंधाचें कचोळें पडलें. तें जातिबहिष्कार्य पाप ठरलें. त्या पाडलेल्या कंचोळ्याचा पक्ष अुचलला ते निराळे पडले—'कचोळे प्रभु' म्हणून नवीन जात झाली ! अशा जातींच्या नुसत्या नांवनिशी, फुटकळ वर्णनास अेकतांच या जातिभेदराक्षसाच्या हिडीस स्वरूपाचा जो बोध होतो, तो त्याच्याच नुसत्या 'जातिभेद' अशा अेकेरी सामान्य अुल्लेखानें कधींहि होत नाहीं !

ही झाली नुसत्या महाराष्ट्राची गोष्ट. पण हिंदु राष्ट्राची ह्या जातिभेदानें कशी दुर्दशा अुडविली आहे याची कल्पना करायची तर हिंदुस्थानांतील जातींचाहि नामोच्चार केला पाहिजे. साधारणतः महाराष्ट्रीय वाचकांस त्याची कल्पना नसते. जातिभेदाच्या विरुद्ध पांचशे पृष्ठें सामान्य नी तात्त्विक चर्चेचा ग्रंथ लिहूनहि जो धक्का महाराष्ट्र वाचकांस बसणार नाहीं तो त्यांस सार्‍या हिंदुस्थानांतील हिंदूंमध्ये नुसत्या मोठमोठ्या अशा किती जाती आहेत त्यांची नुसती नामावळी अेकून बसेल ! नुसते ब्राम्हण पहा–काश्मिरी ब्राम्हण, पंजाबी, कनोजी, मारवाडी, गुजराथी, बंगाली, तेलगू, तामीळ, ओरिसा, आसाम, मलबारी, कानडी असे अनेक प्रांतिक भेद ! त्यांत

पुन्हा शैव–वैष्णव, कुलीन–अकुलीन, शाकाहारी–मांसाहारी ब्राम्हण; त्यांत पुन्हा अंडीं न खाणारे नी अंडीं खाणारे ब्राम्हण, बोकड खाणारे पण कोंबडीं न खाणारे, मासे खाणारे पण बोकड न खाणारे ब्राम्हण ! यांच्या भिन्न जाती– रोटीबंदी, बेटीबंदी ! क्षत्रियांची तर गोष्टच नको ! तीच वैश्यांची गत ! जातिभेद म्हणतांच चातुर्वर्ण्य–चार तुकडे तेवढे समजणारांची केवढी भयंकर चूक होते ती पहा ! चातुर्वर्ण्य म्हणजे ब्राम्हण एक गट, एकच तुकडा, पण त्या ब्राम्हण शब्दाची फोड करूं जातांच पांचशे मोठमोठ्या मुख्य जाति ! प्रांत तितक्या जाति, पंथ तितक्या जाति, भाषा तितक्या जाति, धंदे तितक्या जाति–रोटीबंद-बेटीबंद ! याचें नांव आजचा जातिभेद ! कसलें घेऊन बसलां आहांत चातुर्वर्ण्य ! तें कधींच मेलें ! जें आहे तें चतुष्कोटिवर्ण्य !

ह्या जातिभेदराक्षसानें आपल्या हिंदु राष्ट्राच्या विराट् शरिराचे हे शेकडो तुकडे कसे उडविले आहेत तें नुसत्या तात्त्विक चर्चेपेक्षां ते तुकडे अेकेक मोजून फुटकळपणें दाखविल्यानेंच खरी कल्पना येण्यास सुलभ जातें, म्हणून मधूनमधून महाराष्ट्रास अपरिचित अशा अन्य प्रांतांतील जातींचीं नांवें नी थोडी माहिती देणें जितकें मनोवेधक तितकेंच हृदयविदारकहि होईल, जातिभेदाचा यावा तसा तिटकारा येऊं लागेल, यास्तव तशी माहिती देण्याचा यत्न होणें अवश्य आहे. त्या दिशेनें आज थोडी माहिती देत आहों. त्यांतहि ती मद्रासच्या अस्पृश्य जातींचीच प्रथमतः निवडण्यांत हेतु हा कीं, जातिभेदाची जशी शिसारी यावी तशीच त्यांतल्या त्यांतहि जी अत्यंत अन्याय्य नी आत्मघातक अस्पृश्यता तिचेंहि घातक रूप नी तिच्या योगें होणारी हिंदु राष्ट्राची जी भयंकर हानि तिची तर ओकारीच यावी ! स्पृश्यांनाच नव्हे तर, अस्पृश्यांनाहि पटावें कीं, अस्पृश्यतेच्या पापाचे तेहि वांटेकरीच आहेत, त्यांना इतर स्पृश्य जसे कुत्र्यांसारखे हडहड करतात तसेंच तेहि स्वतः स्पृश्य बनून त्यांच्या खालच्या जातींना शिवत नाहींत, कुत्र्यासारखे हडहड करण्यास सोडीत नाहींत !

दुसऱ्याच्या नांवानें खडे फोडतांना त्या अस्पृश्यांनीं स्वतःच्या नांवेंहि खडे फोडावे. दोषी सारे-सारे मिसळून तो दोष दूरवावा हेंच अुचित. जी जी शिवी अस्पृश्य स्पृश्यांना देतात ती ती त्या अस्पृश्यांना स्वतःहि दिली जाते हें त्यांनींहि विसरूं नये !

## मद्रासमधील कांहीं अस्पृश्य जाति

**चेरुमा ( पुलिया )** – ही अस्पृश्य जाति मलबारांत राहते. अुत्तर मलबारांत राहतात त्यांना पुलिया म्हणतात आणि दक्षिण मलबारांत वसतात त्यांस चेरुमा. म्हणजे अेका चेरुमा जातीच्या स्थानपरत्वें दोन मुख्य जाति झाल्या. पण अेवढयानेंच संपत नाही. त्या दोन अुपजातींपैकी चेरुमा जातींत २९ पोटजाती. कनक्का चेरुमा, पल्ला चेरुमा, अेलारन, रोलन, बुडानप्रभृति पडल्या आहेत आणि पुलियांत १२ पोटजाति पडल्या आहेत ! ह्यांपैकी चेरुमा-अिरया हे स्वतःस पुलिया जातीहून अुच्च समजतात. ते सारे चेरुमा लोक ब्राम्हण-क्षत्रियांकडून अस्पृश्य मानले जातात; शूद्रहि त्यांस शिवत नाहींत. ती अस्पृश्यता अितकी कडक आहे कीं, परंपरेप्रमाणें नियम म्हटला कीं, चेरुमा अस्पृश्यानें ब्राम्हणांपासून ९० फूट अंतरा-वर आणि नायरप्रभृति अब्राम्हणांपासून ६४ फूट अंतरावर अुभें राहिलें पाहिजे. त्या अंतराच्या आंत वाटेनेंदेखील त्यानें ब्राम्हण-शूद्रादिकांजवळ येतां कामा नये, नाहींतर विटाळ होतो ! आपल्या-अिकडे सावली तेवढी पडूं देऊं नये अितकी ढिली झालेली अस्पृश्यता म्हणजे या मद्रासी अस्पृश्यतेच्या मानानें अेक वरदानच म्हणावयानें. जर कोणी चेरुमा अस्पृश्याजवळ ह्या अंतराच्या आंत बोलला तर त्या ब्राम्हणशूद्रांस स्नान करून प्रायश्चित्त घ्यावें लागतें. कांहीं स्थलीं त्यांना बाजारांतदेखील प्रवेश नाहीं, मग तलावाची नी गावची गोष्टच दूर !

ब्राम्हणशूद्रप्रभृति स्पृश्यांकडून ह्या चेरुमांचा चाललेला हा अपमान नी पीडा अैकून ह्यांची दलित म्हणून जितकी दया करावी

तितकी थोडीच आहे ! मग स्वतः अितके नीच नी दलित झालेले हे चेरुमा अस्पृश्यसुद्धां ज्या पुला, परिया, नबादी आणि अुल्लदन जातीच्या लोकांना अस्पृश्य मानतात, त्यांची दया किती करावी ! क्षत्रिय प्रभृति 'स्पृश्य' जसें चेरुमांना पीडतात नी त्यांना शिवणेंहि पाप समजतात तसेंच वरील परिया, पुलादी प्रभृति जातींना तेच चेरुम पीडतात नी त्यांना शिवणेंहि पाप मानतात ! वरचे जी पीडा नी नीचता त्यांच्यावर लादतात, त्याच पीडेचा नी नीचतेचा बोजा हे चेरुम खालच्यावर लादून स्वतःच्या वरच्यांकडून होणाऱ्या अपमानाची भरपाअी खालच्याचा अपमान करून भरून काढतात ! त्यामुळें ब्राम्हणक्षत्रियांनाच तेवढे प्रपीडक म्हणण्यास त्यांस तोंड नसतें; कारण त्याच शासनाच्या आधारें ते अस्पृश्य स्वतःस अुच्च समजून त्यांच्या खालच्या जातींचे ब्राम्हणक्षत्रिय बनतात : त्यांस शिवणेंहि पाप मानतात ! अस्पृश्यतेच्या क्रूरतेसाठीं जी जी शिवी अस्पृश्य स्पृश्यास देतो, ती .ती अशी परत त्याच्याहि डोक्यावर येअून आदळते; कारण प्रत्येक अस्पृश्य जात दुसऱ्या कोण्यातरी खालच्या जातीस अस्पृश्य मानीत असते; अगदीं सगळयांच्या खालची जात कोणची तें सापडून काढण्याचें काम तर शेषाची टाळूच शोधून काढणारें एखादें पाताळयंत्र काय तें करू जाणे !

हे चेरुम लोक अुच्चवर्णियांच्या शेतीचें सारें काम करतात. ज्या स्वामीच्या पदरीं हे असे राहतात त्यांचे ते वंशपरंपरा कृषक होऊन पडतात. दुसऱ्याच्या शेतावर वाटेल तेव्हां नोकरी करणें त्यांना दुर्घट. ते शेतास बांधलेले असतात. त्या चेरुमाचें लग्न व्हावयाचें तर त्याला दहा रुपये आपल्या स्वामीस देऊन अनुज्ञा मिळवावी लागते. हे चेरुम आपल्या स्त्रीस विकूंहि शकतात. सन १८४१ पर्यंत तर मुलगा साडेतीन रुपयांना नी मुलगी तीन रुपयांपर्यंत ह्यांच्यांत विकली जाअी.

हे चेरुम लोक अगदीं प्राचीन काळीं मलबारमध्यें लहानमोठीं राज्यें करीत असावे असा अितिहासज्ञांचा अभिप्राय आहे. चेरनाद्र

ही अशाच अेका राजाची राजधानी होती. पुढें ते पराभूत होऊन जेत्यांशीं त्यांचें हाडवैर जुंपलें नी त्याचा परिणाम त्यांची अस्पृश्यता ही असावी. त्यांच्या पुला, चेरुमा प्रभृति कांहीं पोटजाती गोमांस खातात. त्यांना अस्पृश्य चेरुमांच्या अितर जातीहि अस्पृश्य मानतात. चेरु शद्वाचा अर्थ शेत असाच आहे. त्यांचे आजचे मुख्य धंदेहि शेतीचेच. यावरून पूर्वी हेच हृया भूमीचे धनि असावे. पुढें भूमीचें स्वामित्व दुसऱ्याकडे जाऊन हे केवळ भूदास ( Serfs ) होअून बसले असावे असा अेक तर्क आहे.

चेरुमा नी पुलिया हिंदुधर्मीय, देवीदेवपूजक. परकुट्टी, करमकुट्टी, चयन प्रभृति त्यांच्या विशिष्ट देवतापूर्वज यांचीहि पूजा ते करतात. कर्क आणि मकरसंक्रान्तीस ते ओनम् ( ॐ? ) नी विष्णुभगवानांचे चरणीं प्रसाद वाहतात. त्यांच्या विवाहविधींत वृद्धांवर तांदुळांचा मारा करतात. आणि 'मंगलम्' नांवाचा संस्कार झाला कीं लग्न लागतें. चेरुमची स्त्री त्यांच्याहून नीच नी ज्यांना तेहि अस्पृश्य समजतात त्या पारिया प्रभृति जातींशीं संबंध ठेवतांना आढळली, कीं जातिबहिष्कृत होते– आणि अर्थातच अिसाअी नी अिस्लाम यांच्या पंजांत अचानक सांपडते ! सन १९२१ च्या शिरगणतीप्रमाणें हृयांची संख्या– चेरुमा अडीच लक्ष नी पुलिया पावणेतीन लक्ष होती. हे चेरुम लोक आपलीं प्रेतें गाडतात.

**होलिया:–** हे मलबारच्या वर दक्षिण कानडांत मुख्यत्वें राहतात. होला शद्वाचा अर्थ भूमि. त्यापासून त्याचें होलिया हें जातिवाचक नांव पडलें. चेरुमा या शद्वाचा अथ जसा भूमिधर तसाच या होलियांचाहि. अितकेंच नव्हे तर, चेरुमांचीं प्राचीन राज्यें मलबारमध्यें होतीं. तशींच होलियांची दक्षिण कानडांत होतीं. अर्थात् त्यांची भूमि विजयी लोकांच्या हातीं गेली तेव्हां हे केवळ भूमिदास होऊन बसले. हेहि आपलीं प्रेतें गाडतात. हेहि अस्पृश्य. हेहि उच्चवर्णीय भूस्वामींच्या कृषीचें काम करतात.

क्कचित् पोटधंदे म्हणून कपडे विणतात, मासेमारी करतात. यांचें मुख्य दैवत शिव नी ग्रामदेवता. अेक आश्चर्यकारक चाल यांच्यांत आहे ती अशी, कीं होलियांचा स्पर्श वा प्रवेश ब्राम्हणवस्तींत झाला तर जसें ब्राम्हण अपवित्र होऊन प्रायश्चित्त घेतो तसेंच जर ब्राम्हण चुकून होलियावस्तींत शिरला तर होलिया लोकहि आपली वस्ती बाटली असें समजून ती शुद्ध करण्याचा अेक संस्कार करतात! यांच्या अेकंदर रीतिभाति, अंगलट, अितिहास, यांवरून हे कानडांतील होलिया त्या मलबारांतील चेरुमांच्याच जातीचे असून प्राचीन काळीं त्यांचे पूर्वज अेकच असावे असें अनुमानणें भाग पडतें. त्यांची संख्या सन १९२१ च्या शिरगणतीप्रमाणें पाअुणेसात लक्ष होती.

**पल्लां**:– ही अस्पृश्यांतील तिसरी मोठी जात. तंजोर, त्रिचनापल्ली, सलेम नी कोअिमतूर जिल्ह्यांतून वसलेली आहे. पल्ला शब्दाचा अर्थ खोल भूमि. ह्यांचा धंदाहि खोलगट भूमींत तांदुळादिक शेती करणें. ह्यावरून कानडांतील होलिया नी मलबारांतील चेरुमाप्रमाणें हेहि पूर्वी ह्या भूमीचे धनी नी नंतर त्यांचे विजेते भूस्वामी झाल्यावर त्यांचे भूदास झालेले असावे असें तर्किलें जातें. स्पृश्यांच्या गावांत हे राहूं शकत नाहींत. गांवाबाहेर यांची वाडी झोपड्यांची असते. तीस पल्लाचेरी म्हणतात. त्यांची जातिसंस्था चिवट नी आश्चर्य वाटण्यासारखी संघटित आहे. प्रत्येक गांवीं तीनचार जण 'मुखिया' असतात. ते पंच. त्यांच्यांत अेक अध्यक्ष, तो 'नात्तुमुप्पन'. अेक 'अडुमपिल्लची' चपराशासारखी पंचायतीच्या वेळीं सर्वांस जमविणारा, आजच्या भाषेंत 'प्रतोद' ( Whip ). यांच्या जातीचेच न्हावी, धोबी स्वतंत्र असतात. जातीनियम मोडील त्यास जातिच्युत करतात नी त्याचें काम हे न्हावी, धोबी कोणी करीत नाहींत. हे लोक शिव नी ग्रामदेवता भजतात. सन १९२१ त यांची शिरगणति नअू लक्षांजवळ होती.

**पारिया, माल** आणि **मादिगा**– ह्या मद्रासकडील अस्पृश्यांच्या अुरलेल्या दोन मोठ्या जाति. पारियांत कांहीं नगारा

वाजवितात, पण बहुतांश लोक चेरुमा, होलिया नी पल्लां या वरील जातींप्रमाणेंच शेतकी करून शेताच्या धन्याची बांधलेली नोकरी पिढोन्‌पिढ्या करतात. माल नी मादिगा हे तेलगु प्रांतांत नी पारिया हे तामील प्रांतांत वसतात. ह्यांच्या आपसांत रोटीबंदी बेटीबंदी प्रभृति जातबंद्या आहेतच हें सांगणें नकोच. हे काली, शिव, विष्णु आणि ग्रामदेवता पूजतात. गेल्या शिरगणतींत पारियांची संख्या चोवीस लक्ष, माल चौदा लक्ष, मादिगा सात लक्ष अशी होती !

दक्षिण कानडांतील होलिया, मलबारांतील चेरुमा, तंजोर-कडील पल्लां, तामील प्रांतांतील पारिया नी तेलगू भागांतील माल-मादिगा ह्या पांच जाती म्हणजे 'पंचम' जात ! ह्या पांच मोठ-मोठ्या अस्पृश्य जातींची अेकंदर संख्या साठ लक्षांवर जाते ! युरोपांतील तीनचार पूर्तुगाल, डेन्मार्क, स्विट्झर्लंड राष्ट्रांइतकें हें संख्याबल ! अर्धी अिटली ! अितकें हें आपल्या हिंदुराष्ट्राचें संख्या-बळ आज आपल्यापाशीं असून नसून सारखें झालें आहे ! या अस्पृ-श्यतेच्या महारोगाच्या खाअींत आम्हीच आपण होअून त्यांना पचत ठेवीत आहोंत, मृतप्राय करून ठेवीत आहोंत ! ते अस्पृश्य आहेत अितकेंच नव्हे : तामील प्रांतांतील चोवीस नक्ष पारियांपैकीं बहुतेक जाति मद्रासीय सनातन्यांमध्यें

## अस्पृश्यच नव्हे, तर अदृश्य ! !

समजल्या जातात. त्यांच्या स्पर्शानेंच नव्हे, सांवलीनेंच नव्हे, तर नुसत्या दुरून दिसण्यानें विटाळ होतो ! स्नान करावें लागतें ! त्यांचा शद्ब कानांवर पडतांच जेवण विटाळतें ! मार्गानें जर क्वचित् दूरवर पारिया अुच्चवर्णीयासमोर येत असला तर तो पारिया चट्‌कन आपलें तोंड पदरानें झाकून घेअील; कारण तो अदृश्य ! केवळ अस्पृश्यच नव्हे ! तो दिसतांच अुच्चवर्णीय विटाळतील, त्या पारियास बहुधा गांवांतून हाणमारहि होअील !

ह्या पांची अस्पृश्य नी अदृश्य जाती मूळ अेकजात होत्या हें बहुतेक अितिहासज्ञ समाजशास्त्र्यांचें मत. त्या अेका कृषक जातीच्या पांच प्रांत नी जाती भाषापरत्वें झाल्या. त्या पांचांच्या पन्नास नी पन्नासांच्या पांचशे ! अस्पृश्यांतहि अनुलोम-प्रतिलोमाच्या सुऱ्यांनीं, बोकडाचा बळी कापावा तसा—समाज, राष्ट्र, कापूनकापून तुकडे-तुकडे उडविले ! स्पृश्य अस्पृश्यांस शिवणार नाहीं, तोंड बघणार नाहीं ! अस्पृश्यहि खालच्या अस्पृश्यांना शिवणार नाहीं, तोंड बघणार नाहीं ! ह्या साऱ्या पांचशे जाती जन्मजात पृथक्, रोटीबंद, बेटीबंद !

हाय हाय ! अशा आमच्या या लोकांत कसली संघटना नी कसलें अैक्य होणार ! छे: छे ! हिंदु राष्ट्राची संघटना जर हवी, आजच्या परिस्थितीशीं टक्कर देण्यास समर्थ असें जातिवंत अैक्य हवें तर हा जन्मजात जातिभेदाचा राक्षस प्रथम मारलाच पाहिजे आणि त्यास मारणें अितकें सोपें कीं, 'मर' म्हणतांच तो मरतो ! केवळ आमच्या अिच्छेंत त्याचें जीवन आहे ! ह्याचाच अुलट सिद्धान्त म्हणजे केवळ आमच्या अिच्छेंत आमचें मरण आहे ! नुसती अस्पृश्यता काढून भागणार नाहीं—त्या विषारी शाखेचें मूळ जो जन्मजात जातिभेदाचा विषवृक्ष तोच मुळांसुद्धा अुखडून टाकला पाहिजे.

जोंवर ह्या जातिभेदास आम्ही आमच्याच अिच्छेनें आमच्या राष्ट्राच्या कंठास नख लावूं देत आहों, तोंवर आम्हांस मारण्याचें काम शत्रूला करावयास नकोच; आम्ही आपण होअूनच मरत आहोंत. मद्रासमधल्या ह्या पांची अस्पृश्य जातींत अिस्लाम नी अिसायी मिशनें दोहों हातांनीं आमचें संख्यावळ लुटीत आहेत यांत काय आश्चर्य ! नुसत्या अिसायी लोकांनीं पन्नास हजारांवर अस्पृश्यांस दोनचार वर्षांत ख्रिस्ती केलें ! मोपलामुसलमानांसारख्या अडाणी जातीहि अस्पृश्यांना धडाधड बाटवीत आहेत, त्या विपक्षांच्या नांवानें

रडून आतां कांहीहि होणार नाहीं. जी दुःस्थिति मद्रासची, तीच सर्वत्र !

जर आम्ही हिंदु ह्या जन्मजात जातिभेदाचा आमूलात् अुच्छेद करूं तरच तरूं. राष्ट्र म्हणून, धर्म म्हणून यापुढें जगूं शकूं ! दुसरा अुपाय नाहीं ! !

● ● ●

# ह्या आनुवंश, कीं
# आचरटपणा? कीं आत्मघात?

आपल्या हिंदु राष्ट्रांत आज ज्या सहस्रावधि जाति–अुपजाति–पोटजाति–पोटपोटजाति पडलेल्या आहेत, त्या साऱ्या जणूं काय आनुवंशाच्या ( Heredity ) सृष्टिनियमांचा अत्यंत सखोल अभ्यास करून कोण्या महान् समाजशास्त्रतज्ज्ञ पुरुषानें गणितागत कोष्टकांत आंखून, रेखून मग पाडलेल्या आहेत; त्यांच्या प्रत्येक गटाचे रक्तबीजगुण हे अन्य गटाच्या रक्तबीजगुणापासून भिन्न आहेत, असें जणूं काय अगदीं अद्यावत् प्रयोगशाळेंत ते रक्तबीजगुण थेंब थेंब परीक्षून ठरविलें आहे. ज्यांचें ज्यांचें रक्तबीज आनुवंशविज्ञानाच्या कसोटीनें संकीर्ण झालें असतां संतति निकृष्ट–निकृष्टतरच होणार असें प्रयोगान्तीं ठरलें, त्यांचे त्यांचेच गट निरनिराळे केले आहेत–आणि यास्तव आजच्या या सहस्रावधि जाति–अुपजाति– पोटजाति–पोटपोटजाति मोडल्यानें समाजशास्त्राचें कंबरडेंच मोडून जाणारें

आहे असा आभास कांहीं लोक आजकालच्या शास्त्रांतील मोठमोठे Heredity Eugenics प्रभृति गालफुगाअू शद्व वारंवार अुच्चारून अुत्पन्न करीत असतात !

पण हा आभास किती खोटा आहे याचा अगदीं निर्विवाद पुरावा आज ज्या हजारों जातीपातींची वीण वाढलेली आपणांस दिसत आहे, त्यांपैकीं कित्येकांची पृथक् पृथक् अुत्पत्ति पाहिली असतां सहज मिळूं शकतो. कोणत्याहि रक्तबीजाची थेंब थेंब परीक्षा प्रयोगशाळेंत होअून अमुक कुळांचें रक्तबीज हीन ठरत आहे म्हणून त्यांची जात आम्ही निराळी करतों, असा अुल्लेख अेखाद्या समाजशास्त्रज्ञाचा वा आनुवंशविज्ञाचा असलेला पुराणांत ज्यांच्या प्रकरणीं मुळींच सांपडत नाहीं, अशाच हजारों पोटजाति आहेत; अितकेंच नव्हे, तर त्या पोटजाति वा जाति कशा झाल्या त्यांची जी अुपपत्ति वा अुत्पत्ति पुराणांत दिलेली आहे, तींत वरील प्रकारच्या शास्त्रोक्त परिक्षेची लवलेश सूचनासुद्धां नसून दिलेलीं कारणें निव्वळ भाकडकथाच काय त्या आहेत !

त्याहीपेक्षां निर्णायक पुरावा असा; पुराणांचीं पानें मुद्रणकलेनें मोजून वरचा पुठ्ठा त्या पोथीवर जेव्हां अितका पक्का बांधला कीं, त्यापुढें अेकदेखील अनुष्टुप त्या पुराणांत घुसडण्यास जागाच अुरूं नये. त्या पुराणरचनेच्या अितिश्रीकाळानंतर अगदीं अर्वाचीन काळापर्यंत ज्या जातींचीं पुन्हा शकलें अुडत राहिलीं नी तीं शकलें स्वतंत्र नव्यानव्या अुपजाती बनत चाललीं, त्यांच्या अुत्पत्तींची माहिती अगदीं साधार नी बहुधा सरकारी कागदपत्रांतूनच नोंदविली गेलेली आहे. त्या अगदीं अैतिहासिक माहितीवरून तर हें स्पष्टच होत आहे कीं, रक्तबीजाची शास्त्रोक्त परीक्षा होअून आनुवंशाच्या दृष्टीनें समाजांत अुत्तम संततीची भर पडावी अशा कोणत्याहि हेतूनें ह्या आजच्या जातिपाति वेगवेगळ्या केलेल्या नसून त्यांच्या फाटाफुटी 'तूं मांस खातोस कीं नाहीं ?' 'तूं शिव की वैष्णव ?' 'तूं

अुभ्यानें विणतोस् कीं बसल्यानें ?' 'ताज्या दुधाची साय काढतोस कीं तापविलेल्या ?' 'तूं नाशिक जिल्ह्यांत रहातोस कीं नागपूर ?' अशा अत्यंत हास्यास्पद मतभिन्नतेनें अेकमेकांवर बहिष्कार पडून त्या होत आल्या आणि अेकेक जातीचे तुकडे अुडत नवनव्या काय त्या जाती पडत चालल्या.

हातच्या कांकणास आरसा कशाला ? आज चालू असलेल्या या हजारों भिन्नभिन्न रोटीबंद, बेटीबंद जातीपातींच्या अुत्पत्तीविषयींची कांहींची जी माहिती पुराणांतील भाकडकथांत दिली आहे आणि कांहींची जी अगदीं अैतिहासिक कागदपत्रांत नोंदली आहे तिचींच कांहीं अुदाहरणें खालीं देअू. त्यावरून हें अनायासेंच अुघड होअील कीं, अशा शेंकडों जातीपातींचा अुगम कोणच्याहि आनुवंश-रक्तबीजादि शास्त्रीय परीक्षाप्रभृति वैज्ञानिक तत्त्वांत झालेला नसून तो झालेला आहे निव्वळ भाकडकथांत नी आचरटपणांत !

हो, निव्वळ आचरटपणांत ! त्या शद्बापेक्षां दुसरा योग्य शद्बच तीं कारणें अेकत्र अुल्लेखावयास सापडणारा नाहीं. आचरटपणा म्हणजे आचारांचें वाष्कळ स्तोम ! अुभें गंध कां आडवें गंध ? कोणीं अुभ्या गंधाच्या वैष्णवानें आडवें गंध लावलें कीं, झालाच तो अेकदम जातिबहिष्कृत ! त्याच्याबरोबर त्याचें घर, जो जो त्याच्याशीं खाअीलपिअील तो तो, कीं त्यांची बनली अेक नवीन पोटजात ! आणि जात म्हणजे रोटीबंद, बेटीबंद. राष्ट्राच्या अेक-संधि, अेकजीवि देहाचा आणखी अेक तुकडा टाकलाच ताडकन् वंश-परंपरा तोडून ! – केवळ गंध लावण्यांत पन्नास पिढ्यांपूर्वी कोणा दहापांच व्यक्तींची चूक झाली म्हणून ! शेंकडों जातींचे तुकडे पडून आजच्या शेंकडों भिन्न पोटजाति अुत्पन्न झालेल्या आहेत—अगदीं अशाच आचरटपणापायीं !

कोणाला ही अतिशयोक्ति वाटत असल्यास ही अेक अगदीं अर्वाचीन नी कागदोपत्रीं पुराव्यांतहि सांपडणारी अेका अपजातीच्या जन्मपत्रिकेची नोंद पाहा !

# (१) "कंचोळे" प्रभूंची जात कां आणि कशी झाली ?

ती गम्मत अशी ! सरासरीं दीडशें वर्षांपूर्वीं पाठारे प्रभू जातींत अेक लग्नसमारंभ होता. पाठारेप्रभू जातीची अेकजात सर्व वऱ्हाडी मंडळी मंडपांत जमली. जातीचा एकजीवीपणा वाढून जात अधिक संघटित व्हावी अशासाठींच हे सामाजिक नी धार्मिक समारभ योजिलेले असतात. मंडपांत जातीचे अिष्ट सगे-सोयरे जमताच रीतीप्रमाणें गंध लावण्यासाठीं अेक तरुण गृहस्थ कंचोळें (गंधपात्र) घेऊन सभेंत आला. गंध आधीं कोणास लावावें हें नक्की न कळल्यामुळें त्यानें ज्या पहिल्या गृहस्थास गंध लावलें त्याच्याविरुद्ध अग्रमान सांगणाऱ्या गृहस्थानें प्रतिपादन करतांच गंधाच्या अग्रमानाविषयीं कडाक्याचें भांडण जुंपून गोंधळ माजला. त्यांत त्या गंध लावणाऱ्या तरुणाचीहि ओढाताण होत राहिल्यामुळें तो वैतागला नी गंधाचें तें कंचोळें तसेंच खालीं फेंकून देऊन संतापानें मंडपाबाहेर निघून गेला.

अेका लग्नाच्या अेका मंडपांत जमलेल्या अेका वऱ्हाडी मंडळीं-तील हें यःकश्चित् भांडण— गंध सोम्याला सोडून गोम्याला लावलें, गंधपाळें, तें कंचोळें, अेका तरुण मनुष्यानें खालीं फेंकलें. ही दीडशें वर्षांपूर्वीं घडलेली अेका तरुणाची अेक अति क्षुल्लक चुकी !— आणि तिचा परिणाम ? अेका अेकगटी पाठारेप्रभू जातीचे दोन तुकडे होणें ! वंशपरंपरा रोटीबंद, बेटीबंद ! अेक नवीन जात फुटून निघणें !!

त्या गंधपाळें फेंकून गेलेल्या तरुणास नी अग्रमानासाठीं भांड-णाऱ्या त्यांनी गंध न लावलेल्या मंडळीस ,अुलट पक्षानें दंड केला. कसला ? त्यांच्या वैयक्तिक अपराधासाठीं कांहीं देहदंड वा द्रव्य-दंड ? नव्हे ! दंड म्हटला कीं जातिबहिष्काराचा ! जातिबहिष्कार

म्हटला कीं त्यांच्याशीं कोणीं जेवूं नये, कोणी विवाहूं नये ! रोटी-बंदी, बेटीबंदी ! बरें ती तरी त्या व्यक्तीपुरती नव्हे, त्यांच्या यच्च-यावत् वंशजांच्या पिढ्यान्‌पिढ्या चालणारी ! अेकानें दीडशें वर्षी-पूर्वीं अेक गंधाचें कंचोळें फेकलें ह्या अेकाच्या अपराधासाठीं दंड त्याच्या पिढोन्‌पिढ्यांस ! त्यांच्याबरोबर खाणाऱ्यापिणाऱ्या सर्वांस ! त्यांच्या जन्मलेल्या मुलांबाळांस; न जन्मलेल्या सतराव्या भावी पिढीच्या मुलांबाळांस ! ! ! हा खाक्या आमच्यांत शतकोंशतकें चालत आलेला आहे ! शेंकडों अुपजाति, पोटजाति, पोटपोटजाति अशा पडत आलेल्या आहेत !

त्या गंधाचें कंचोळें फेंकलेल्या तरुणावर नी त्याचा पक्ष घेणाऱ्यावर त्या लहानशा मंडपांत जो बहिष्कार पडला, त्याची बातमी पाठारेप्रभूंच्या निरनिराळ्या गांवीं जसजशी पोंचत गेली, तसतशी गांवोगांव ती बहिष्कारप्रतिबहिष्काराची ब्याद पसरत गेली. शेवटीं त्या बहिष्कृतांची अेक "कंचोळे" प्रभू नांवाची पोटजात बनली ! ते आपसांत जेवतात, आपसांतच मुली देता-घेतात. त्या दोन जातींना पुन्हा अेकवटण्याचे यत्न करण्यांत आले; पण कांहीं अुपाय चालेना. बॅ. जयकर प्रभृतींनीं अगदीं अलीकडे देखील हे प्रयत्न करून पाहिले, पण फुकट !

आज जर कोणी अेका मनुष्यानें अेखाद्या संघाचा, मंडळाचा वा नगरसंस्थेचा अेखादा नियम मोडला, तर त्या व्यक्तीस फार तर दंड होईल; पण जर कोण्या न्यायाधिशानें अगदीं चोरीसारखे अपराधसुद्धां पुनःपुन्हा करणाऱ्या चोराला शिक्षा दिली कीं, त्यालाच नव्हेतर त्याच्या जन्मलेल्या मुलांना, त्याच्या न जन्मलेल्या नातवा-पणतवा-पडतपणतवांना सत्तर पिढ्यांपर्यंत तुरुंगांत टाकावें वा दंड करीत राहावें, तर आपण त्या न्यायाधिशास भ्रमिष्टालयांतच ( Lunatic Asylum ) बंद करूं !

परंतु अगदीं तशीच रानटी पद्धत आपण आपल्या जातपंचाअितींतील आडदांड न्यायनिवाड्यांतून शतकोंशतकें चालविलेली असून त्या अन्यायी विक्षिप्तपणालाच 'सनातन धर्म', 'शिष्टाचार' प्रभृति नांवांनीं गौरवींत आलों आहोंत !

कांहींहि क्षुल्लक गोष्ट जातीपातींच्या रूढीविरुद्ध घडली, कीं लगेच जातिबहिष्काराची शिक्षा त्या व्यक्तीला वा पक्षाला देण्यांत येते आणि जातिबहिष्काराची ही शिक्षा त्या व्यक्तीपुरतीच न ठेवतां वंशपरंपरा चालत राहते. त्यामुळें त्या अेका जातीच्या हटकून दोन जाती होतात ! जातीचें संघटित बळ कमी होतें आणि जातिबहिष्कार म्हणजे रोटीबंदी नी बेटीबंदी हाच असल्यानें, राष्ट्राच्या अखंड जीवनाच्या सतत ओघाचींच खंडविखंड तुटक डबकीं होअून पडतात ! व्यक्तीच्या अपराधासाठीं राष्ट्रास दंड पडतो ! त्या मूळच्या क्षुल्लक वा मोठ्या वैयक्तिक अपराधामुळें राष्ट्राची जी हानि होते, त्याहून शतपट अधिक हानि त्या अपराधभरपायीसाठीं केलेल्या दंडामुळेंच होते ! ती कशी याचें हें वर दिलेलें कंचोळे प्रभूंच्या पोटजातीच्या अुत्पत्तीचें अगदीं अर्वाचीन अुदाहरण स्पष्ट करीत नाहीं काय ?

कंचोळें फेंकलें तेन्हां त्यांतील गंध सांडलें, एकदोघांचा अपमान झाला, हा अपराध ! त्या अपराधापायीं सांडलेल्या शिंपलीभर गंधानें वा कोण्या यःकश्चित् अेकादोघां गांवठी मानकऱ्यांच्या अपमानानानें राष्ट्राची काय हानि झाली होती याचा विचार करा आणि तो अपराध घडूं नये म्हणून केलेल्या जातिबहिष्काराच्या दंडापायीं अेका जातीच्या रक्तबीजाच्या भाऊबंदांत वंशपरंपरेचा संबंधविच्छेद, ममत्वविच्छेद होअून दोन भिन्न जाती झाल्यामुळें राष्ट्राची जी हानि झाली तिचा विचार करा ! म्हणजे अुठल्या बसल्या जातिबहिष्काराची, रोटीबंदी-बेटीबंदीची शिक्षा देणाऱ्या आमच्या बाष्कळ संवयीचे घातक परिणाम चटकन् ध्यानांत येतील !

आतां गंधाचें कंचोळें दीडशें वर्षांपूर्वी अेका तरुणानें फेंकलें ह्यापायीं पाठारेप्रभूच्या अेकसंधि जातीचे दोन तुकडे पडले. त्यांत रक्तबीजाच्या वैज्ञानिक परीक्षेचा वा आनुवंशाच्या कसोटीचा लव-लेश तरी संबंध येतो का ? पाठारेप्रभूंतून फुटल्यानंतरहि कंचोळेप्रभू अजूनहि, अतिशय अडचण पडते तरी, आपलीं लग्नें आपसांतच करीत आलेले आहेत ! भिन्न रक्तबीजाचा प्रश्नच काढणें शक्य नाहीं. केवळ गंधाचें कंचोळें अेकानें दीडशें वर्षांपूर्वी फेंकलें, अेवढेंच कारण ! आणि परिणाम अेका जातीच्या रोटीबंद, बेटीबंद अशा वंशपरंपरा दोन जाती पडणें ! आतां सांगा. हा आनुवंश कीं, निव्वळ आचरटपणा, कीं भ्रमिष्ट आत्मघात ?

अशाच अत्यंत क्षुल्लक मानपानादि गांवढळ कल्पनावारी तंटे होअून आणि जातिबहिष्कार अेकमेकांवर पडून अेका जातीच्या दोन जाति, त्यांच्या चार जाती कशा पडत गेलेल्या आहेत याची साधारण माहिती रिसले, अेन्थोवेन प्रभृति लेखकांनीं दिलेली आहे. शिर-गणती करणाऱ्या अभ्यासू अधिकाऱ्यांची ही माहिती कोणींहि अुघड्या डोळ्यांनीं जर वाचली, तर त्याची निश्चिती पटेल कीं, हिंदु राष्ट्राचें जातीपातीपायीं हे जे हजारों रोटीबंद, बेटीबंद तुकडे तुकडे पडले आहेत, त्यांतील शेंकडों जाती अशाच निव्वळ आचरटपणामुळें पडल्या. आनुवंशादिक कसल्याहि वैज्ञानिक कसोटीनें कोणीं बुद्ध्या आंखून रेखून त्या पाडल्या असा आभास अुत्पन्न करणें निव्वळ कुभांड होय !

कोणी म्हणेल कीं, ही गोष्ट हिंदूंच्या ह्या अर्वाचीन पाखंड कालांत पडलेल्या जाती-पातीविषयीं खरी असली तरी आमच्या पोथीपुराणांच्या कालाविषयीं खरी नाहीं. त्या वेळीं जाती पडत त्या आनुवंशादि समाजशास्त्रीय कसोटीनें, रक्तबीज पारखूनच पाडल्या जात असल्या पाहिजेत, असें जर कोणास वाटेल, तर त्यानें अेकदां पुराणांतून नी पोथ्यांतून अनेक जातींच्या दिलेल्या अुपपत्त्या

१७७४ अनुक्र. ५५ २१-१०-७१

पाहाव्या ! त्या तर इतक्या भाकड नी मूर्खपणाच्या आहेत कीं त्यापेक्षां वर दिलेली अैतिहासिक माहितीच कमी मूर्ख नसली तरी निदान अधिक प्रामाणिक तरी असतेच असते ! अुदाहरणार्थ, अेक हजार वर्षे तरी ज्या जातीच्या अस्तित्वाचा अुल्लेख सांपडतो; तिच्या अुत्पत्तीविषयीं संस्कृत पोथीपुराणांच्या कालांत काय वर्णन दिलेलें आहे तें पहा !–

## ( २ ) भंडारी जातीच्या अुत्पत्तीविषयीं पोथीपुराणांतील माहिती

भंडारी जातीविषयीं ब्रम्होत्तरखंड नी कथाकल्पतरु या पोथ्या-पुराणांत असें सांगितलें आहे कीं पूर्वीं अेकदां तिलकासुर नांवाचा दैत्य फार मातला. महादेवासहि फार पीडा झाली. तेव्हां महादेवानें त्यास दडून घाण्यांत घातला नी नंदीस आज्ञापिलें 'फिरीव तो घाणा नी पिळून काढ त्या दैत्याला !' नंदी घाण्यास त्याप्रमाणें फिरवीत असतां अिकडे महादेव थकव्यामुळें 'हुश्श' करून जों खालीं बसतात तों त्यांच्या कपाळावरून अेक घामाचा बिंदु खालीं गळला आणि त्यांतून तात्काळ अेक पुरुष अुत्पन्नला ! त्यास पाहातांच शंकर म्हणाले, 'तुझें नांव भावगुण ! कारण तूं माझी स्तुति करीत अुभा आहेस ! जा, मला तहान लागली आहे, प्रथम पाणी आणून दे !' ( शंकराच्या जटेंत असणारी पतिसेवानिरत भागिरथी या प्रसंगीं तीर्थ-यात्रेस कुठेंतरी गेली असावी; नाहींतर पाण्याची इतकी टंचाअी महादेवास भासती ना, हें अुघड आहे ! ) भावगुण म्हणाला, 'देवा, शीतोदक कुठून आणूं ? अिथें तर कुठें देखील तें नाहीं.' असें अेकतांच शंकरानें अिच्छामात्रेंकरून अेक झाड अुत्पादिलें. तेंच हें नारळीचें झाड ! ( वनस्पतिशास्त्रज्ञांनीं नारळीच्या झाडाची ही अुत्पत्ति ध्यानांत ठेवावी ! ह्या कथेनें आनुवंशविद्येंतच काय ती भंडाऱ्यांची अुत्पत्ति सांगून भर टाकली आहे. ) आणि नारळीच्या

झाडावर अिच्छामात्रेंकरून सुरामधुर फळें अुत्पादिलीं. तेव्हांपासून नारळीला 'सुरातरु' म्हणतात. भावगुण लगेच त्या झाडावर चढला आणि त्यानें तीं सुराफळें आणून, सोलून, तोंडावर कोयतीचा टंवचा मारून तीं महादेवास प्यावयास दिलीं. ( मनुष्य-झाड-फळें अिच्छामात्रें अुत्पन्न करणाऱ्या महादेवाला तहान लागतांच तोंडांतल्या तोंडांतच सुरा कां अुत्पादितां आली नाहीं वा झाडावरच्या फळाला भावगुणानें वर चढून तोडण्याच्या आधीं, खालीं कां आणतां आलें नाहीं, देवच जाणे ! ) प्रसन्न चित्तें महादेव भावगुणास म्हणाले, 'जा अलकावतीच्या भांडारावर तूं अधिकारी हो, जा ! ' तेव्हां-पासून त्यास 'भांडारी' म्हणूं लागले ! आणि शंकर सुरातरूचीं सुराफलें पिअूं लागले. ( त्या दिवसापर्यंत भांग प्रभृति पदार्थच काय ते भगवान् सेवीत असत; पण भंडारी भावगुणाची ओळख होतांच भगवान् सुराहि पिअूं लागले. संगतीचा परिणाम ! दुसरें काय ! )

पण अितक्यांत त्या मुदैवाच्या झाडावरून घसरून, नारळीच्या झाडावरून मनुष्य आपटावा तसा, भावगुण भांडारी खालीं दुर्दैवाच्या दगडावर आपटला. कारण पार्वतीदेवी त्याला भांडारांतील सोनें पारितोषक द्यावयास आंत गेली असतां, अेक ब्राम्हण तिथें आला. त्यास पहातांच भावगुण भांडारी आंतला पाट त्या ब्राम्हणाला बसा-वयाला देऊन अुभा राहिला. पार्वती सोनें घेअून आली नी पाटावर पूर्वीप्रमाणें भावगुणच बसला आहे असें समजून त्या आगंतुक ब्राम्ह-णालाच सोनें देअुन चुकली. ब्राम्हण लगेच अुठून गेला. ( पार्वती-देवींना साध्या गुप्तपोलीसाअितकेंहि अंतर्ज्ञान वा व्यवहाराचें भान या वेळीं राहूं नये नी त्या ब्राम्हणास अटक न होतां तो सुटावा अं ! ) थोड्या वेळानें पार्वती वळून पाहातात तों भावगुण भंडारी पाठीशींच अुभा ! तेव्हां त्या म्हणाल्या, 'अरे, तुला सोनें दिलें तरी रेंगाळ-तोस कां ?' तेव्हां तो बिचारा म्हणाला, 'सोनें ब्राम्हणास दिलें,

मला नव्हे ! मी धर्माचाराप्रमाणें ब्राम्हण पाहतांच त्यास माझा पाट देअून अुभा राहिलों; त्याच्या दक्षिणेंत व्यत्यय येअू नये म्हणून मध्येंच तोंड घातलें नाहीं. आपण देवता ! तो ब्राम्हण हें आपणांस कळणार नाहीं असें माझ्या स्वप्नांतहि आलें नाहीं !' हें अैकतांच आपण फसलों याचा पार्वतीदेवींना राग आला आणि त्यांनीं काय केलें म्हणतां ?– तर त्या ब्राम्हणानें त्यांना फसविलें म्हणून त्या न फसविणाऱ्या शिष्टाचारशील बापड्या भावगुण भंडाऱ्यासच शाप दिला कीं, 'जा ! तुझ्या जातीस नारळाची माडी नी ताडी विकूनच पोट भरावें लागेल. दरिद्री राहील तुझी जात सदैव ! सोनें असें भंडाऱ्यास मिळणार नाहीं ! तेव्हांपासून भंडारी जात नारळीच्या माडीस विकून अुपजीविका करते. दरिद्रीपणामुळें सोनें गांठीं सांचत नाहीं ! ( समाधानाची गोष्ट अितकींच कीं, आमच्या ओळखीपैकीं अेका चलाख भंडारी गृहस्थांनीं तरी महादेवाचीं दोनचार देवळें बांधून त्या वशिल्यानें पार्वतीदेवीच्या शापाची नांगी ढिली पाडली आहे. श्रीमंत भागोजीशेठ कीर भंडारी असतांहि त्यांच्या हातीं, खिशांत, बँकेंत सोन्याच्या नाण्याचे ढीगच्या ढीग खुळखुळत असून आम्ही त्या पाटावर बसलेल्या ब्राम्हणांचे वंशज असतांहि आंगठी अितक्यादेखील सोन्यास पारखे झालेलों आहोंत ! )

जात कशी अुत्पन्न होते याच्या अशा पौराणिक कथा शेंकडों आहेत; पण कुठेंहि रक्तबीजाच्या परीक्षेनंतर आनुवंश दृष्ट्या सुप्रजनन साधेल अशी कसोटी लावून मग ही जात नीच नी अुंच, ही निराळी ती निराळी, अशी आंखणी केल्याची लवलेश सूचनादेखील सांपडत नाहीं ! जातिपातीच्या अुत्पत्तींच्या बहुतेक साऱ्या कथा अशाच सांच्याच्या, निर्भेळ भाकडपणाच्या, येथून तेथून बाष्कळ !

वास्तविक पाहातां भंडारी जात ही भट्टारक रजपुतांतून झालेली. भांड म्हणजे मोठी नौका. संस्कृतांत काय, किंवा पेशवाई कागदपत्रांत काय, भांडें हा शब्द तारवांस लावलेला आहे. ( भांडें याचें

आपल्यांत जसें पात्र नी तारूं असे दोन अर्थ होतात अगदीं तसेच Vessel ह्या अिंग्लिश शब्दाचेहि भांडें आणि तारूं असे दोन अर्थ होतात. हें गमतीचें साम्य जातांजातां अुल्लेखनीय आहे. ) मौर्य कालापासून भंडारी जातीचे पूर्वज सामुद्रिक सैनिक; ते पेशवाईच्या अंतापर्यंत तसेच गाजत आले. त्या मौर्य कालापासून 'भाण्ड' सेनेचे अधिप आणि 'भांडीं' वनविणारेहि असल्यानें त्यांच्या जातीस भांडारी हा शब्द लागला. ही अुत्पत्ति विचारणीय कीं, ती पुराणांतील महादेवाच्या घामाच्या थेंबाची नी घाण्याला जुंपलेल्या नंदीची ? कोंकणांत भंडारी यांचा तारवांचा धंदा मुख्य. दुय्यम धंदा नारळीचीं माडी-ताडी काढणें,–विकणें. त्याला अनुलक्षून कोण्यातरी पुराणिकानें ही वरील भाकडकथा संस्कृतांत दडपून दिली. कारण पुराणिक जितका भाबडट तितकेच त्याचे ते भंडारी-श्रोतेहि ! महादेवापासून आपली उत्पत्ति झाल्याची ही बाष्कळ कथा त्यांना आवडली, म्हणून भंडाऱ्यांत घरोघर ती टिकली नीं खरोखरी अुत्पत्ति सांगणारी माहिती लोपली !

गंधाचें कचोळें अेकानें फेंकतांच त्याच्या नी त्याच्या पक्षाच्या सर्वांवर वंशपरंपरा जात बहिष्कार टाकणारी ती पाठारेप्रभु पंचाअित आणि अेका भावगुण भंडाऱ्यावर रागावतांच त्यालाच नव्हे, तर त्याच्या पिढोनपिढ्याना, जातीच्या जातीला, 'नित्याचे दरिद्री रहाल ! माडी विकाल !' म्हणून ह्या कथेंतला शाप देणारी पार्वती ह्या दोघांचाहि अन्याय सारखाच असह्य, अदूरदर्शीपणाचा आहे ! मूर्ख भक्तांच्या संगतीनें देवहि मूर्ख बनतात ते असे ! धांदलींत ब्राम्हण ओळखला नाहीं ही चुकी पार्वतीची, रागावली भावगुण भंडाऱ्यावर आणि शापिली भंडारी जातीची जात –जन्मोजन्म ! अयोध्येच्या कैकेयीनें किंवा पुण्याच्या आनंदीबाअीनें देखील अितका आततायीपणा सहसा केला नसता !

# (३) शिंप्यांच्या पोटजातींची उत्पत्ति

सध्यां ज्या प्रकरणीं शिंपी समाजांत खूप खल चालला आहे, त्या भावसार क्षत्रिय जातीच्या अुडालेल्या तुकड्यांची अुत्पत्ति आणखी अेक म्हणून देअूं. भावसार क्षत्रिय अगदीं नामदेवांच्या काळापर्यंत रोटीबेटी सर्व प्रकरणीं एकजात, अेकरक्त, अेकबीज, मूळ हिंगला देवीचे शाक्तपंथीय. पुढें नामदेवांच्या शिष्यांत जे मोडले त्या भावसारांनीं भक्तिमार्ग स्वीकारला. त्यासरशीं नामदेव शिंपी ही अुपजात झाली—शाक्तांनीं भक्तांवर बहिष्कार टाकून रोटीबंदी, बेटीबंदी केली म्हणून ! त्यांच्यापैकीं कोणाच्या रक्ताबीजाची वैज्ञानिक परीक्षा होअून ते सुप्रजननास कमी योग्य ठरले म्हणून नव्हे ! केवळ दैवत निराळें झालें म्हणून ! पुढें त्या नामदेव शिंप्यांत कांहीं नाशिककडे, कांहीं कोंकणांत, कांहीं नागपुरांत, गटागटांनीं फार दिवस राहिल्यामुळें अेकमेकांशीं जातिव्यवहार घडूं शकला नाहीं. कारण, अेखादी वैज्ञानिक अनुवंशाची कसोटी नव्हे— तर त्या काळीं आगगाडी, मोटार नव्हती अेवढेंच ! दळणवळण नव्हतें. त्यामुळें त्या नामदेव शिंप्यांत तीन पोटजाति पडल्या. रोटीबंद, बेटीबंद ! अगदीं ऐतिहासिक कालांतील कागदोपत्रांत गोंवलेल्या ह्या गोष्टी. त्यामुळें पुराणिकाला त्यांना शंकर, पार्वती, नंदी ह्यांच्या ठराविक चौकटींत बसविण्यांत संधि सांपडली नाहीं. नाहींतर त्या शिंपी लोकांच्या जातीहि महादेवाच्या अंगावरील कफनी पार्वतीनें लाडझगड्यांत फाडून टाकली त्या वेळीं पडलेल्या फाटक्या चिध्यांतून निरनिराळ्या अशा अगदीं अनादिकालींच अुत्पन्न झालेल्या आहेत. पौराणिक भाकडकथा कुणी पंडितजी रचूनहि टाकीत किंवा Heredity Eugenics प्रभृति गालभराअू शब्दांची पोकळ आवर्तनें करीत. ह्या पोटजाती त्या शास्त्रीय तत्त्वानेंच पाडलेल्या आहेत अशी अर्वाचीन भाकडकथा कुणी समाजशास्त्रज्ञ गोमाजी टिच्चून सांगूं लागते ! शिंप्यांतील या सर्व पोटजाती अर्वाचीन. त्यामुळें हा निश्चित पुरावा मिळतो कीं,

त्यांच्यापैकीं कुणीहि मूळच्या समाजिकपणांतील जातिबांधवांबाहेर बेटीव्यवहार केलेले नाहींत. अर्थात् रक्तबीज प्रभृतींतील अुच्चनीचत्वामुळें ह्या जाती पाडल्या गेल्या हें धादांत खोटें असून त्या काळीं मोटारीसारखीं, अंतर नाहींशीं करण्यासारखीं साधनें नसल्यानें त्या जाती परस्परापासून दूरावल्या,—पृथक् झाल्या. भौगोलिक कोंकणस्थ, देशस्थ, पाटणे, संगमेश्वरी प्रभृति नांवाचे शिंपी, वाणी, चांभार प्रभृति जातींत, जे पोटजातीभेद पडलेले दिसतात त्यांचें मुख्य कारण म्हणजे त्यांच्यांतील पोटभेदांपैकीं कोणांत पडलेला अुत्कृष्ट रक्तबीजाचा तुटवडा नव्हे, तर मोटारींचा तुटवडा, हेंच होय !

## (४) अंड्यांवर पाय पडला म्हणून पोटजात !

अत्यंत क्षुल्लक जातरूढि मोडल्यासाठीं जातिबहिष्काराचा दंड देऊन अेकदम वाळींत टाकण्याची आणि त्यापायीं नवीन जातीचे तुकडे पाडीत चलण्याची ही प्रक्रिया अगदीं आजदेखील सारखी चाललेली आहे. लहानसहान अुदाहरणें सोडून अेका मोठ्या जातीचेंच अेक अगदीं चटका लावून सोडण्यासारखें प्रकरण दाखला म्हणून देतों.

माळव्यांत ओसवाल नांवाची अेक प्रख्यात नी प्रमुख जात आहे. सन १९३१ मध्यें त्यांच्यांत अेक मोठी खळबळ अुडविणारी गोष्ट घडली. त्या जातींतील अेका शेठजींच्या घरांत लावलेल्या एका तसबिरीमागें अेका चिमणीनें दोन अंडीं घातलीं होतीं. त्यांतील अेक लहान सुपारी अेवढें अंडें खालीं घसरलें. घसरलें म्हणून पडलें, पडलें म्हणूत फुटलें. फुटतांच त्यांतील चिकट रस भुअीवर सांडला. तोंच शेठजींच्या दहा वर्षांच्या एका मुलानें दार अुघडून सप्कन आंत घुसण्याच्या वांदलींत त्या फुटलेल्या चिमणीच्या अंड्याच्या चिकावर न कळत पाय टाकला ! हाच तो भयंकर अपराध कीं, ज्यायोगें ती जातीची जात खळबळून उठली ! पायास चिकट काय लागलें म्हणून तें मूल पाहूं लागलें, तों वडील माणसांचें लक्ष तिकडे

गेलें नी अंड्याच्या वेलदोड्याअेवढ्या पांढऱ्या कवच्या, चीक, पाणी, सारें मिळून संध्येच्या पळीभर सामान विखुरलेलें दिसलें! झालें! जिकडे तिकडे, घरीं शेजारीं गवगवा होत बातमी फैलावली– 'अंड्यावर पाय पडला! चिमणीचें अंडें पायाखालीं फुटलें! मुलाचा पाय बाटला! शेठ बागमलांचा मुलगा बाटला!''

ओसवाल जैन पक्के शाकाहारी! त्या लेकराला त्याच्या घरच्यांनींच त्या दिवसापासून पंक्तीबाहेर जेवणास बसविलें. अेकदोन दिवसांत श्वेतांबर जैनमंदिरांत जात पंचायत बोलावली गेली–गंभीरपणें पूर्वोत्तर पक्ष विचार करूं लागले! चिमणीच्या अंड्यावर नकळत मुलाचा पाय पडून चीक लागला ह्या भयंकर हिंसादोषास्तव त्या मुलास जातिबहिष्कृत करावें कीं नाहीं? खडाजंगी अुडाली! दोन पक्ष झाले! जात फुटली! त्या मुलाचें घरच्या घरच वाळींत पडलें. त्याच्या बाजूचे लोकहि वाळींत पडले! ह्या प्रकरणाचा शेवट ठराविक पायऱ्यांनी दोन जाती पडण्यांतच झाला असता; पण शेठ गोपीलाल छापेडावाले यांनीं त्यांच्यावर असाच अेक बहिष्कार जातीनें घातला होता, तेव्हां कोर्टांतच तें प्रकरण खेंचून तडजोडींतच काढणें भाग पडलें होतें; त्याप्रमाणें हेंहि प्रकरण कोर्टांत नेण्याचा धाक घालतांच पंचायतीनें मूग गिळून पुढें कांहीं केलें नाहीं. पण कित्येक गृहस्थांनीं त्या चिमणीच्या फुटलेल्या अंड्यावर पाय टाकणाऱ्या मुलाशीं नी त्याच्या घराशीं रोटीव्यवहारादि संबंध नाहीं तर नाहींच ठेवला!

या दाखल्यापुरत्या दिलेल्या जुन्यानव्या उदाहरणांवरून हें अुघड होत आहे कीं, आजच्या वैदिक, जैन, लिंगायत प्रभृति अखिल हिंदुराष्ट्रांत ज्या हजारों जातिपाति पडलेल्या आहेत, त्या अनुवंश वा सुप्रजनन वा अितर कोणत्याहि समाजशास्त्रीय रक्तबीजपरिक्षेच्या कसोटीस लावून पाडलेल्या आहेत, असा मोघम भास पसरविणें निव्वळ थापेबाजी आहे! आजच्या जातींतील हजारों पोटजाति केवळ प्रांत, भाषा, धर्ममतें, कोंबडीं खाणें कीं, बकरा खाणें कीं, मासे खाणें, मांसाहार कीं

शाकाहार, लसूण कीं कांदा, तंबाखू ओंढणें कीं खाणें, अुभ्यानें विणणें कीं बसून, गंधाचें कचोळें फेकणें, चिमणीच्या फुटलेल्या अंड्यावर नकळत पाय देणें, अशा अगदीं बाष्कळ कारणांवरूनच पडल्या आहेत! अेकसंधि, अेकजीवि, अखंड सांग अशा राष्ट्रीय देहाचें ह्या 'जातिबहिष्कारा'च्या तलवारीनें खंड खंड असे हजारों तुकडे अुडविले! कांहीं झालें कीं, घाल जातिबहिष्कार! आणि जातिबहिष्कार म्हणजे रोटीबंदी, बेटीबंदी, जन्मोजन्म, पिढोन्पिढ्या! हा कसला अनुवंश! हा आहे निव्वळ आचरट आत्मघात!

म्हणूनच बडोद्यासारख्या कांहीं संस्थानांतून गांवढळ, अडाणी नी त्यांच्या कृत्याचे काय राष्ट्रीय परिणाम होतात हें न समजणाऱ्या जातपंचाभितांच्या हातून जातिबहिष्काराचें हें आत्मघातक हत्यार काढून घेण्याचे जे निर्बंध ( कायदे ) होत आहेत, ते अगदीं हवेतच. निव्वळ आचरटपणापायीं पडलेल्या ह्या जातिपाति—ही जातिभेदाचीच व्याद मुळापासूनच अुखडून टाकली पाहिजे. त्याच्या तडाख्यांत हातीं घेण्यासारखें: साधन म्हणजे रोटीबंदीचा अुच्छेद, प्रकट सहभोजनांचा धूमधडाका!!

● ● ●

# वज्रसूचि !

फलान्यथौदुंबर वृक्ष जातः ।
मूलाग्रमध्यानि भवानि चापि ॥
वर्णाकृतिस्स्पर्शरसैस्समानि ।
तथैक तो जातिरिति प्रचिंत्या ॥ १

तस्मान्न गोऽश्ववत्कश्चित्
जातिभेदोस्ति देहिनाम् ॥
कार्यभेदनिमित्तेन संकेतः
कृत्रिमः कृतः ॥

— भविष्यपुराण, अ. ४०

बुद्धधर्माच्या महान् प्रचारकांत अश्वघोष याची मोठी योग्यता मानण्यांत येते. त्यानें लिहिलेलें संस्कृत श्लोकबद्ध 'बुद्धचरित्र' हें काव्य बौद्ध वाङमयांतील अेक अुत्कृष्ट पूज्य नी प्रासादिक ग्रंथ असून तें संस्कृतवाङमयांतील काव्यसंपत्तीमध्यें देखील माननीय स्थान पावणारें आहे.

ह्या विद्वान् बौद्ध प्रचारकानेंच, त्या काळीं वैदिक नी बौद्ध अशा आपल्या हिंदु राष्ट्रांत पडलेल्या धर्मपंथांच्या दुफळींत जो अेक अत्यंत वादग्रस्त नी तीव्र मतभेदाचा प्रश्न होअून बसला होता, त्या जन्मजात जातिभेदाच्या प्रथेवर तर्कमूलक चर्चा करणारा वज्रसूचि नांवाचा अेक प्रबंध रचिलेला आहे.

अुपनिषद् कालापासूनच स्वतंत्र तत्त्ववादांनीं वनोपवनांतील आश्रमाआश्रमांत भारतीय वातावरण सदोदित निनादलेलें असे. त्यांतहि श्रुतिस्मृतीच्या मर्यादांचीसुद्धां मंत्ररेखा न जुमानतां बुद्ध कालांत जेव्हां बुद्धिवाद सर्वस्वीं स्वतंत्रपणें अकुंठित संचार करूं लागला, तेव्हां तर राष्ट्राच्या आणि मानव्याच्या प्रत्येक क्षेत्रांत 'हें असें कां' या प्रश्नाच्या अग्निदिव्यामध्यें तत्कालीन यच्च्यावत् मतें, रूढि, आचार, विचार साधकबाधक ज्वालांत तावून सुलाखून निघूं लागलीं. वैदिकांनीं बौद्धांचीं आणि बौद्धांनीं वैदिकांचीं वचनें नी वचनें, मंत्र नी मंत्र, कोटिक्रम नी कोटिक्रम कुशाग्र तर्काच्या पिंजणा-खालीं नुसता तंतून्तंतू पिंजून काढला. वैदिक वैदिकाशीं वा बौद्ध बौद्धाशीं जेव्हां वाद घाली, तेव्हां त्यांच्या तर्कशुद्धतेला नेहमीं 'अिति श्रुतिः' किंवा 'अिति बुद्धानुशासनम्' च्या दुर्लंघ्य मंत्ररेषेची आड-काठी आडवी येअी. कारण श्रुतिवाक्य खोटें हें म्हणणें हें वैदिका-वैदिकांच्या तर्कास अशक्य; बुद्धवाक्य खोटें हें म्हणणें हें बौद्धाबौद्धां-तील तर्कवादास सर्वत्र निषिद्ध. त्यामुळें श्रुतींची छाननी वैदिक तर्काला अशक्य, बौद्धागमाची छाननी बौद्धतर्कशक्तीला अशक्य. त्यामुळें त्या त्या आप्तवाक्यांच्या कुंपणापर्यंतच काय ती तर्काची

गति अकुंठित असे. पण वैदिक आणि बौद्ध यांच्यांत जेव्हां तेच अुपनिषत्कालापासून प्रचलित असलेले 'तद्विद् संवाद' झडूं लागले, तेव्हां श्रुतिप्रभृति त्या त्या अनुल्लंघनीय नी अशंकनीय मर्यादाहि तर्काच्या गतीस खुंटवूं शकल्या नाहींत. कारण बौद्धांना 'अिति श्रुतिः' चा धाक नसे, तिचा मंत्र नी मंत्र ते तर्कमुशींत हेतुवादाच्या सहाणेवर घांसून, पारखून टिकला तरच घेणार. वैदिकांना 'अिति बुद्धानुशासनम्' ची भाडभीड नसे. त्या बुद्धाच्या शद्वान् शद्वाचा तर्काच्या मान्याखालीं धुव्वा अुडवून देण्यास ते कचरत नसत. अशा स्थितींत बुद्धकालांत श्रुति, स्मृति, आगम-निगम, रीतिरूढि, आचार-विचार या सान्यांची छाननी पुरुषबुद्धीच्या अग्निदिव्यांत जशी झाली, श्रुतींना देखील पुरुषबुद्धीच्या परिक्षेला बसावें लागूनच काय जें प्रमाणपत्र मिळवितां येअील तें मिळविणें भाग पडलें, तसा प्रकार त्यापूर्वी केव्हांहि अितक्या मोठ्या प्रमाणावर झाला नव्हता.

यामुळेंच बुद्धकालांतील धर्माधर्म, कर्माकर्म, आचारानाचार यांची चिकित्सा करणारे निर्भेळ नी स्वतंत्र तर्काच्याच कसोटीवर पारखले जाणारे वादविवाद आज मोठे मनोरंजक नी बोधप्रदहि वाटतात. कुशाग्र बुद्धिवादांचीं तीं त्या काळच्या मानानें अप्रतिम नी अकुंठित अुदाहरणें आजहि वाचनीय आणि विचारणीय वाटल्या-वांचून रहात नाहींत. अमक्या ग्रंथांत अमुक आहे म्हणूनच तें खरें, हें पालुपद त्या वादविवादांत तर्काचें तोंड बंद करतांना सहसा आढळत नाहीं. युक्तिसंगत, हेतुमत्, बुद्धिनिष्ठ अशा त्या त्या काळच्या वादविवादांचीं जीं कांहीं अुदाहृणें आज अुपलब्ध आहेत, त्यांतच जन्मजात जातिभेदाची खडखडीत भाषेंत साधकबाधक चर्चा करणाऱ्या श्रीमद् अश्वघोष याच्या त्या वज्रसूचि नामक निबंधास गणलें पाहिजे. त्यांत आजच्या तर्कपद्धतीचा अवलंब सर्वथैवपणें नसणें जरी साहजिकच आहे तरीहि त्या काळचे चातुर्वर्ण्य विषयासंबंधीं जे अनुकूल प्रतिकूल आक्षेप-प्रत्याक्षेप चालू होते त्यांचा खल आजहि

अभ्यसनीय वाटावा अितक्या चटकदार बुद्धिवादानें केलेला आहे. आजच्या जन्मजात जात्युच्छेदनाच्या वादांत आधार घेण्यासाठीं नव्हे, तर ह्या विषयावर त्या कालीं आपल्या राष्ट्रांतील धुरीणांचीं काय मतामतें असत तीं समजून घेण्यासाठीं अुपयुक्त आणि अपरिहार्य असा अेक प्राचीन अधिकृत लेख म्हणून आम्ही तो 'स्त्री' मासिकाच्या वाचकांच्या सेवेस सादरवीत आहोंत. मराठीच्या जुळणीस आणि स्थलावकाश धरून भावार्थाची मांडणी करतांना मूळ ग्रंथांतील मतें नी तर्कपद्धति शक्य तितकीं यथावत् अनुसरलीं आहेत.

० ० ०

# श्रीमत् अश्वघोषकृत वज्रसूचि

जगद्गुरु श्री मंजुघोषास शरीरवाङ्मनाहीं वंदून नी स्तवून त्याचा शिष्य जो मी अश्वघोष तो शास्त्राधारपूर्वक वज्रसूचि नामक ग्रंथ प्रारंभितों.

धर्म आणि अर्थ यांना विवेचिणाऱ्या श्रुति आणि स्मृति ह्यांस मतमतांतरांच्या भागाविषयीं जरी मी प्रमाण मानीत नाहीं, तथापि त्यांच्यांतील विश्वसनीय नी सयुक्तिक अशा भागाविषयीं प्रामाण्यबुद्धि बाळगण्यास आमची हरकत नाहीं.

परंतु श्रुतिस्मृतिविषयीं अशा अर्थी प्रामाण्यबुद्धि ठेवली तरीहि चातुवर्ण्याविषयींच्या तुमच्या कल्पना त्या ग्रंथांच्या आधारानेंहि सिद्धितां येत नाहींत असें मला वाटतें.

प्रथम ब्राह्मण्यास विवेचूं. तुम्ही कशास ब्राह्मण्य म्हणतां? जीव, का जात, का जन्म, का आचार, का वेदज्ञान, का ज्ञान? ब्राह्मण्य कशानें येतें? ब्राह्मण्य म्हणजे यांपैकीं कोणतें?

जीव हेंच ब्राह्मण्य असें म्हणाल तर वेदांत तसें समजण्यास मळींच आधार नाहीं. ब्राह्मण्ययुक्त अशी जीवांचीच अेक स्वतंत्र

जात आहे, ती कांहीं झालें तरी ब्राह्मणाची ब्राह्मणच राहाणार अशा मतास वेद मुळींच समर्थीत नाहीत. प्रत्यक्ष देवासंबंधीं जर वेद म्हणतात कीं, 'सूर्यः पशुरासीत्। सोमः पशुरासीत्। अिंद्रः पशुरासीत् पशवो देवाः ॥' देवतासुद्धां प्रथम पशूच होत्या, नंतर कर्मबळानें देव झाल्या, तर ब्राह्मणाचा जीव हा मूलतःच ब्राह्मण होय, अपरिवर्तनीयपणें ब्राह्मण ब्राह्मणच रहाणार हें कसें सिद्ध होअील ? फार काय, नीचापेक्षा नीच असे जे श्वपाक तेसुद्धा ब्राह्मणच नव्हेत तर देव होअू शकले 'आद्यत्ते देवा पशवः श्वपाका अपि देवा भवन्ति' असें श्रुतीच म्हणतात ! तेंच महाभारत अनुवादितें. महाभारतांत अेके ठिकाणीं स्पष्ट लिहिलें नाहीं का कीं, कालिंजल टेकडीवरील सात शिकारी व दहा हरीण मानस, सरोवरावरील अेक बदक, शरद्द्वीपावरील अेक चक्रवाक् हे सर्व कुरुक्षेत्रांत ब्राह्मण असे जन्माला आले आणि वेदपारंगत झाले ! मनु म्हणतो, चतुर्वेद नी त्यांची अंगें-अुपांगें यांत प्रवीण असलेला ब्राम्हण जर शूद्रापासून दक्षिणा किंवा अितर दान घेअील तर त्याला गाढवाचे बारा जन्म, डुकरांचे सहा जन्म आणि सत्तर जन्म कुत्र्याचे येतील ! यावरून हें अुघड आहे कीं, ब्राम्हणाचा जीवच ब्राम्हण्यस्वरूपी असून तो केव्हांहि अब्राम्हण होअूंच शकत नाहीं, ही कल्पना श्रुतिस्मृतींनाहि संमत नाही.

आतां जर असें म्हणाल कीं, ब्राम्हण्य हें आअीबापांपासून म्हणजे रक्तबीजांतूनच प्राप्त होतें. ब्राह्मण आअीबापांच्या पोटीं जो जन्मतो तो आणि तोच ब्राम्हण होतो, तर तीहि कल्पना शास्त्राविरुद्ध आहे. स्मृतींतील प्रसिद्ध श्लोकांवरूनच हें उघड आहे. अचलमुनीचा जन्म हत्तीच्या पोटीं, केशपिंगलाचा घुबडाच्या पोटीं, कौशिक गवताच्या पोटीं, द्रोणाचार्य मडक्याच्या पोटीं, तैतीरी अृषीचा पक्षाच्या पोटीं, व्यास कोळिणीच्या पोटीं, कौशिकीचा शूद्रिणीच्या पोटीं, विश्वामित्र चांडाळणीच्या पोटीं, वशिष्ठ वेश्येच्या

पोटीं जन्मले; हे श्लोक स्मृतींतील म्हणून तुम्हांस मान्य असलेच पाहिजेत. या सर्वांचीं आओीबापें ब्राम्हण नसतांहि त्यांना तुम्ही ब्राम्हण्याचे अधिकारी ब्राम्हण म्हणून मानतां त्या अर्थी आतां मातापित्यांच्या द्वारेंच काय तें ब्राह्मण्य लाभतें, ब्राह्मण आओीबापांच्या पोटीं येतो तोच ब्राम्हण होअू शकतो हेंहि म्हणणें खोटें ठरतें.

स्मृतींतील श्लोकांची गोष्ट सोडली तरी प्रत्यक्ष व्यवहारांत जे प्रकार आपण ऐकतों नी पाहतों त्यांचाहि विचार संकोच सोडून केलाच पाहिजे. अनेक अुदाहरणें पिढ्यानपिढ्या घडत आलीं नी प्रत्यक्ष घडतात नाहीं का कीं, ज्यांत शूद्र पुरुषाशीं ब्राम्हण स्त्रियांचा गुप्त संबंध घडून झालेली संतति त्या त्या ब्राम्हण कुलांतच मोडत राहते ? आओी वा बाप कोणीतरी वा दोघेहि ब्राम्हण नसतांहि मनुष्याला ब्राम्हण्य प्राप्त झाल्याची स्मृति नी व्यवहार यांतील अुदाहरणें ब्राम्हण्य आओीबापांच्यामुळेंच मिळतें या म्हणण्याला खोटयांत काढतात.

बरें, एकदां मिळालेलें ब्राम्हण्य, ब्राम्हण आओीबापांच्या पोटीं निःसंशय जन्म घेतल्यानें लाभलेलें ब्राम्हण्य, जर ब्राम्हण्याची पैतृक अुपपत्तीच तेवढी खरी असें मानलें, तर पुन्हा मरेतों नाहींसें होतां कामा नये. ब्राम्हण पितरांच्या पोटीं आल्यानेंच जें मिळतें तें तसा जन्म होतांच मिळालें तें मिळालें. तें आजीवन राहणारच. कारण त्याच्या प्राप्तीची जी अेकच अट ती प्रथम जन्मतःच पुरी झालेली असते. पण स्मृतीवरून तसें दिसत नाहीं. मनु म्हणतात कीं, जो ब्राम्हण मांस खाओील तो तात्काळ ब्राम्हण्यापासून च्युत होतो. मेण, मीठ, दूध विकील तो ब्राम्हण तीन दिवसांत शूद्र होतो ! अर्थात् ब्राम्हण आओीबापांच्या पोटीं जन्म घेणें हेंच काय तें ब्राम्हण्याचें कारण नव्हे, संपादनाचा अुपाय नव्हे. जन्मावरच निश्चित होणारें ब्राह्मण्य नीच कर्मानें अेकाअेकीं नाहींसें कसें होओील ? आकाशांत अुडणारा घोडा पृथ्वीवर अुतरतांच डुक्कर बनल्याची कथा कोणीं कधीं अैकिली आहे ! वा विश्वासिली आहे ?

आतां ब्राम्हण्य हा शरिराचा धर्म आहे, विशिष्ट शरिरांत ब्राम्हणपण सांठविलेलें असतें, असें म्हणाल तर मोठाच घोंटाळा होअील. ब्राम्हणांचें शरीर प्रेत होतांच जे त्यास सरणावर ठेवून अग्नि देतील ते ब्रम्हहत्त्येच्या पातकांचे अधिकारी होतील, वधदंडार्हं ठरतील ! कारण ब्राम्हणपण जर शरिरांत असणार तर तें शरीर जाळणारा ब्रम्हहत्याहि करणारच ! पुन्हा ज्या श्लोकांत असें लिहिलेलें असतें कीं, यजनयाजन, अध्ययनअध्यापन, दानप्रतीग्रह हीं सारीं कृत्यें ब्राम्हणाच्या देहापासूनच निर्मिलीं जातात, त्या मतवाद्यांस आम्ही असें विचारतों कीं, ब्राम्हणाचें शरीर नाश पावतांच त्या साऱ्या कृत्यांचे गुणधर्म नाशतात काय ? 'मुळींच नाहीं' असें तुम्ही ठासून सांगाल ! तर मग ब्राम्हणांचें शरीर म्हणजे ब्राम्हण्य नव्हे, ब्रम्हकर्मांचें अुत्पत्तिस्थानहि नव्हे, हें तुम्हींच मानल्यासारखें होत नाहीं काय ?

आतां ज्ञानामुळें ब्राम्हण होतो, असें म्हणाल तर ठीकच. पण मग तुम्हीं तसें वागावयास हवें. त्या व्याख्येप्रमाणें जो जो ज्ञानयुक्त त्यास त्यास तुम्हीं ब्राम्हण्याचे सारे अधिकार अर्पिण्यास हवेत. ज्ञानानें ब्राम्हण्य येतें तर मग अनेक शूद्रहि ब्राम्हण मानावे लागतील. चतुर्वेद, व्युत्पत्तिमीमांसा, सांख्य वैशेषिक, ज्योतिष, तत्त्वज्ञान प्रभृतींत पारंगत असे पंडिताग्रणी शूद्रामध्येंहि असलेले आजहि माझ्या स्वतःच्या परिचयाचे आहेत. पण त्यांपैकीं अेकालाहि तुम्ही ब्राम्हण मानून ब्राम्हण्याचे अधिकार अर्पिलेले नाहींत ! तेव्हां तुम्ही ज्यास ब्राम्हण्य म्हणतां तें केवळ ज्ञानानें मिळतें असें तुम्हांस कसें म्हणतां येअील ?

आचारानें ब्राम्हण्य ठरतें असें म्हणाल, तरीहि आज तुम्ही व्यवहारांत त्या व्याख्येप्रमाणें लवलेशहि वागत नाहीं. भाट, कैवर्तक आणि भांड ह्या लोकांचे आचार किती सोज्वळ असतात पहा. अनेक कष्ट सोसून ते कडकडीत धर्माचार पाळतात. साधारण ब्राम्हणांहूनहि त्यांचे आचार अितके सोज्वळ असतां त्यांसच तुम्ही चुकूनसुद्धां ब्राम्हण म्हणत नाहीं !

ज्ञानाच्या अितर विभागांत कोणी कितीहि पारंगत असला तरी ब्राम्हण्य त्यायोगें मिळत नाहीं, तें ब्राम्हण्य वेदपठण नी वेदज्ञान ह्यायोगेंच काय तें संपादितां येतें, असें म्हणाल तर आम्हीं विचारतों कीं, रावण हा वेदांत पारंगत होता, पण त्यास राक्षसच म्हणत, ब्राम्हण नव्हे. त्या काळचे राक्षस वेद पठत, मग त्यास तुम्हीं ब्राम्हण कां म्हणत नाहीं ?

तेव्हां सारांश असा दिसतो कीं, तुम्ही कोणत्या गुणावरून वा कोणत्या धर्मावरून ब्राम्हण्य ठरवितां हें तुमचें तुम्हांलाच समजत नाहीं. ब्राम्हण कशानें ठरतो याचा तुम्ही विचारच करीत नाहीं. कोणतीहि अेक कसोटी निश्चयून तीवर टिकेल तोच ब्राम्हण असें तुम्ही वागत नाहीं.

**माझ्या मतें तर ब्राम्हण्याचें लक्षण हेंच कीं,**

तो अेक निष्कलंक गुण आहे. ज्याच्या योगानें पाप विनष्टतें तें ब्राम्हण्य ! व्रततपदान, शमदमसंयम यांहीं सुसंपन्न असा जो मनुष्य, अविवेक नी अहंकार, राग नी द्वेष, यापासून मुक्त असतो, संग नी परिग्रह यांच्या ठायीं जो आसक्त, दया हेंच ज्याचें ब्रीद तोच ब्राम्हण ! त्या सद्‌गुणाविरुद्ध जो दुर्गुणी नी दुष्ट तोच चांडाळ ! वेदांत नी शास्त्रांतहि ब्राम्हण्याचें हें सर्वमान्य लक्षण आहेच आहे. शुक्राचार्य तर याहि पुढें जाऊन सांगतात कीं, देवांना जातीची पर्वा नसते. अधमाधम गणलेल्या जातींत जरी जन्म असला, तरी जो सज्जन त्यासच ते ब्राम्हण समजतात.

सज्जन शूद्रासहि प्रव्रज्येचा अधिकार नाहीं, त्यांनीं द्विजांची सेवाच करून राहिलें पाहिजे; कारण शूद्र हा नीच, अशा तुमच्या विधानाला आधार काय, तर म्हणे चातुर्वर्ण्याच्या परिगणनांत तो शूद्र शब्द शेवटीं येत असल्यानें तो नीच समजला पाहिजे. हें कारण घडधडीत पुढें मांडतांना पोरकटपणाची पराकाष्ठा होते, अितकेंदेखील

तुमच्या कसें ध्यानांत येत नाहीं कोण जाणे ! बोलण्याच्या अथवा लिहिण्याच्या ओघांत जे शब्द आपण पुढेंमागें घालतों ते कांहीं अुच्च आणि नीच या परंपरेसाठींच घालीत नाहीं. अुच्चारांत सुटसुटीतपणा येण्यासाठींच किंवा केवळ व्याकरणप्रथेसाठींच तसे शब्द पुष्कळदां आगेमागें घातले जातात. तशा शब्दक्रमांचा अर्थ जर नेहमीं अुच्च-नीचतेच्या अर्थी घेतला, तर काय हास्यास्पद प्रकार घडतील पहा ! पाणिनीच्या अेका सूत्रांत 'श्वानं युवानं मघवानमाह' हें प्रसिद्धच आहे. मग काय श्वान पहिल्यानें सांगितला म्हणून कुत्रा हा मघव्यापेक्षां—अिंद्रापेक्षां— श्रेष्ठ नी अिंद्र कुत्र्याहून नीच समजायचा ? दंतौष्ठ समा-सांत दंत प्रथम सांगितला म्हणून दांत ओंठाहून ज्येष्ठ मानायचा ? वास्तविक ओंठ ज्येष्ठ, दांत मागाहून जन्मले ! अुमामहेश असें म्हटलें म्हणून काय अुमा ही महेशाहून वरिष्ठ ठरली ? मग ब्राम्हण, क्षत्रिय, वैश्य, शूद्र म्हटलें म्हणूनच शूद्र जन्मादारभ्य, कितीहि सज्जन असला तरीहि नीचतम दुर्जन ठरला असें म्हणणें निव्वळ पोरकटपणाचेंच ठरत नाही काय ? अर्थात् शूद्राला प्रव्रज्येचा अधिकारहि आहेच आहे.

मनूमध्यें शूद्र नीच असल्याविषयीं सांगितलें आहे म्हणून म्हणतां ? शूद्रिणीचें स्तनपान केलेला, शूद्रिणीनें ज्यावर आपला नुसता सुस्कारा टाकला, किंवा ज्याची आअीच शूद्रीण त्या ब्राह्मण कुळाला ब्राह्मण जातींत प्रायश्चित्तानेंहि येतां येणार नाहीं. जो शूद्रीचें अन्नपाणी घेतो, तो ब्राह्मण ह्याच 'जन्मीं शूद्र नी पुढच्या जन्मीं कुत्रा होअील; ' शूद्रिणीला 'अंगवस्त्र' म्हणूनहि बाळगतां कामा नये. तसें करणारा ब्राह्मण 'मेल्यावर नरकांत जातो' असले दंडक मनूंत आहेत खरेच. पण ते खरे म्हणाल तर ब्राह्मण हा जन्मानेंच ब्राह्मण असून कांही केल्या ब्राह्मणाचा शूद्र होत नाही, हें तुमचें मुख्य सूत्रच चुकीचें ठरतें आणि सदाचारी तो शूद्रहि ब्राह्मण होतो, दुराचारी तो ब्राह्मणहि शूद्र होतो हें आमचें सूत्र खरें ठरतें ! पुन्हा त्याच मनूंत शूद्रांनीं पुण्यशाली आचारांमुळें ब्राह्मण्य पटकाविलें असेंहि

स्पष्ट म्हटलेलें आहे. काढीन मुनि, अुर्वशी वेश्येचा पुत्र वशिष्ठ, कुलालणीच्या पोटचा नारद हे शूद्र असतांहि तपानें, साध्वाचारानें ब्राह्मण झाले नाहींत काय ? नीच कुळांत जन्मून पुण्याअीनें स्वर्ग पटकावल्याचीं हवीं तितकीं अुदाहरणें सांपडतात, तीं काय तुम्हांस नाकारतां येतील ?

ब्राह्मणाविषयीं मीं जें म्हटलें तेंच क्षत्रियांनाहि तंतोतंत लागू आहे. वंश मोठ्या राजांचा असला आणि सद्‌गुणांची वाण असली, तर तो क्षत्रियसुद्धां तिरस्करणीय होय असें मनु सांगतात. चार जातिवर्णांची ही कल्पना मुळींच खोटी. मनुष्याची जात अशी अेक.

तुम्हीच म्हणतां सर्व माणसें अेका ब्रम्हदेवापासून अुत्पन्न झालीं आहेत; मग त्यांच्यांत अेकमेकांशीं रक्ताबीजाचा संबंध नसलेल्या या चार भिन्न जाती कशा निर्मिल्या गेल्या ? माझ्यापासून माझ्या पत्नीला चार मुलें झालीं, तीं अेकाच जातीचीं नव्हेत काय ? मग अेकाच ब्रम्हदेवाचीं हीं मुलें जातीचींच भिन्न असतील तरी कशीं ?

## जातींची भिन्नता म्हणजे वास्तविक कशी असावयास पाहिजे ?

जात निराळी मानावयाची म्हणजे भेद कसा असला पाहिजे तें ठरविण्यास प्राणिमात्रांच्या जाति आपण कशा ठरवितों तेंच पाहणें अिष्ट. अिंद्रियादि रचनेच्या मूलतःच असणाऱ्या भेदावरून जात निराळी ठरते. घोड्याचा पाय हत्तीच्या पायासारखा नसतो. वाघाची तंगडी आणि हरणाची तंगडी अेकसारखी नसते. अशा प्रकारच्या शारीर नी अैंद्रिय रचनात्मक मूलभेदामुळेंच प्राण्यांची अेक जात दुसरीपासून विभक्त असें आपण ठरवितों. पण तशा अर्थीं ब्राह्मण नी क्षत्रिय ह्यांच्या दोन जाति कधींहि मानतां याव-याच्या नाहींत. त्यांचे पाय काय तशा निरनिराळ्या प्रकारचे

असतात ? बैल, टोणगा, घोडा, हत्ती, गाढव, माकड, बोकड, मेंढा ह्यांच्या जननेंद्रियें, रंग, आकार, वार, आवाज, मलमूत्रापर्यंत अितका मूलभूत फरक असतो कीं, त्यांस भिन्न जाति म्हणून चटकन् ओळखतां येतें. तशा अर्थी मनुष्यांतील ब्राह्मण, क्षत्रिय हे भिन्न जातींचे असें कधींतरी म्हणतां येअील काय ? पक्ष्यांची तीच स्थिति. कबूतर, पोपट, मोर प्रभृतींचे ध्वनि, रंग, पंख, पिसारे जितके मूलतः भिन्न रचनेचे तितके मूलतः भिन्नत्व कधींतरी ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य, शूद्रांत असणें शक्य आहे काय ? वृक्षांत वड, बकुळ, पळस, अशोक, तमाल, नागकेशर, शिरीष, चंपकादि वृक्षांचीं खोडें, पानें, फुलें, फळें, सालीं, बिया सर्व कांही भिन्न; त्यांची जात निराळी खरी. पण त्या अर्थी जात हा शद्ब ब्राह्मण–क्षत्रियादिकांस विभेदपणें लावतांच येअू नये, अितके हे चारी वर्गांतील लोक अंतर्बाह्य अेकजाति हाडेंहडकें, रक्तमांस, अवयव, अिंद्रियें, रस, सत्त्व प्रभृति लक्षणांहीं अभिन्न. हास्यरोदन, भावभावना, रोगभोग, जगण्यामरण्याची रीतिकृति, भीतीचीं कारणें, कर्मांच्या प्रवृत्ति सारें अितकें अेकसारखें कीं, प्राणिमात्रांत जातिभिन्नत्व दर्शविण्यास घोडा नी बैलः यांच्यांतील वैषम्यासारखें जें वैषम्य आपणांस आढळावें लागतें तसें वैषम्य या चारी वर्णांत लवलेशहि आढळत नसल्यानें त्यांच्या प्रकरणीं त्या अर्थी भिन्न जात हा शद्बच लावतां येत नाहीं, त्या अर्थी ते सारे अेकाच जातीचे समजणें भाग आहे.

औदुंबराच्या नी फणसाच्या झाडांना खांद्या, खोड, सांधे, मूळ इत्यादि सार्‍या स्थळीं फळें धरतात. पण म्हणून खांदीवरचें फळ खोडावरच्या फळापेक्षां ज्या अर्थी रंगाकृतिस्पर्शरसांहीं अगदीं समान असतें, त्या अर्थी तीं फळें अेकच होत म्हणून आपण समजतों, भिन्न जातींचीं मानीत नाहीं. खांदीच्या टोकाला अुंबर आलें म्हणून तें ब्राम्हण अुंबर आणि मुळाला धरलें तर तें शूद्र मुंबर म्हणायचें काय ? तद्वतच तुमच्या म्हणण्याप्रमाणें यद्यपि ब्रम्हदेवाच्या शरिराच्या

निरनिराळ्या भागांपासून ब्राम्हण–शूद्रादि अुपजले असें मानलें तरी तीं सारीं माणसेंच असल्यानें केवळ स्थलभेदें अत्यंत विषम वर्णाचीच मानली जाते, ती भिन्न भिन्न जातिमत्ता त्यांच्या प्रकरणीं कशी मानतां येणार ? ते वेगळ्या वेगळ्या जातीचे कसे असणार ?

## वैशंपायन-धर्म-संवाद

या प्रकरणीं महाभारतांतच वैशंपायनधर्मसंवाद आहे तोहि तुम्हांस काय सांगतों तें अैका. धर्मराजानें प्रश्निलें, "वैशंपायन अृषे, आपण ब्राम्हण कोणाला म्हणतां नी ब्राह्मणाचें लक्षण काय ?" त्या प्रश्नास अुत्तरतांना वैशंपायन शेवटीं म्हणाले, "युधिष्ठिरा, सत्य, दया, अिंद्रियदमन, परोपकार नी तपाचरण हे गुण ज्याच्या ठायीं असतात, त्याला मी ब्राम्हण समजतों. ज्याच्या ठायीं त्यांचा अभाव तो शूद्र. हे पांच गुण म्हणजेच ब्राम्हण्य. फार काय, हे गुण एखाद्या चांडाळाच्या ठायीं असले तर तोहि ब्राम्हणच होय. पूर्वी भूलोकावर अेकच जात होती. पुढें आचारकर्मांहीं भिन्नत्व वाढून चातुर्वर्ण्याची व्यवस्था झाली. 'अेकवर्णमिदं पूर्वं विश्वमासीत् युधिष्ठिर । कर्मक्रियाप्रभेदेन चातुर्वण्यम् प्रतिष्ठितम् ।' हें पहा, सर्व मानवांची अुत्पत्ति स्त्रीपासूनच अेकाच पद्धतीनें होते, सर्वांच्या दैहिक आवश्यकता, अंतरिंद्रियें, बहिरिंद्रियें सारखींच असतात. अर्थात् जात निराळी नसून ज्याची वागणूक चांगली तो ब्राम्हण, वाअीट तो शूद्र. अर्थात् वागणूक सुधारतांच तो शूद्र तत्काळ ब्राम्हण्याचा अधिकारी होणारच. हे राजा, यास्तव अिंद्रियमोहापासून अलिप्त नी सच्छील अशा शूद्राला दान देणें हें सत्कृत्यच आहे नी स्वर्ग्यफलप्रदहि आहे. जातीचा विचार खोटा. सद्गुणावरच ब्राम्हण्य अधिष्ठतें. जो दुसऱ्याच्या कल्याणासाठीं अहर्निश सिद्ध असतो, तो ब्राम्हण. जो आयुष्य सत्कृत्यांत व्ययितो तो ब्राम्हण. क्षमा, दया, सत्य, शौच, ज्ञानविज्ञान यांही जो युक्त तो ब्राम्हण."

महाभारतासारख्या धर्मग्रंथांतील वैशंपायनासारख्या ऋषींचीं हीं वाक्यें आहेत. त्यांचा तरी अर्थ मित्रहो, तुम्ही नीट ध्यानीं घ्या, तो सन्मार्ग धरा.

अज्ञान निरसावें या सदिच्छेनें म्यां, अश्वघोषानें हें प्रवचन केलें. पटलें तुम्हांस तर ठीकच; न पटलें किंवा कोणीं त्यास हेतुतःच हेटाळलें तरी आम्ही त्याचाहि विषाद मानीत नाहीं. अिति 'वज्रसूचि !'

वरील प्रवचनांत अश्वघोषांनीं त्या प्राचीन काळच्या प्रचलित आक्षेपादिकांचाच ऊह त्या काळच्या तर्कपद्धतीनुसार केला अस-ल्यामुळें त्याचें महत्त्व प्राचीन काळचा लेख ह्या दृष्टीनें तत्कालीन मापानेंच मोजलें पाहिजे हें सांगावयास नकोच. यास्तवच त्यांतील जन्मजात जातिभेदाविरुद्ध चातुर्वर्ण्याविरुद्ध जे जे कोटिक्रम केलेले आहेत, ते ते आजच्या परिस्थितींत वाचतांना त्यांतील अुणीवांकडेहि कानाडोळा होतां कामा नये. त्या आणि यांपैकीं अगदीं अनुपेक्षणीय अशी जी अुणीव आपण स्वतःपुरती भरून काढली पाहिजे ती ही कीं, त्यांत ब्राह्मण ज्ञातीसच जरी मुख्यत्वेंकरून साऱ्या कोटीक्रमांत संबोधिलें आहे, तरी तीं ब्राम्हणांना यथायोग्यपणें दिलेलीं प्रत्युत्तरें क्षत्रियांखालील वर्णांना पायाखालीं तुडवूं पाहणाऱ्या क्षत्रियांनाहि तंतोतंत लागू पडतात. वैश्यांतहि वरच्या ब्राम्हणक्षत्रियांस 'पीडक' वर्णाहंकारी म्हणून दूषीत स्वतः शूद्रास्पृश्यादिक खालच्या जातींना मात्र आपल्या 'अुच्च' वाणीपणाचें पाणी दाखविण्यास नी खालच्यांचे आपणहि 'ब्राह्मण' वनण्यास न सोडणारे लक्षावधि वैश्य आहेतच; शूद्रांतहि 'त्रैवर्णिकांनीं ज्ञातिभेदाचें ढोंग काढून आम्हांस नागविलें, मनुष्यमात्र समान !' म्हणून घोषिणारे शूद्रच त्यांच्या 'खालच्या' शूद्र पोटजातींससुद्धां त्याच जातिभेदाच्या त्याच ढोंगाखालीं हीन लेखिण्यास सोडीत नाहींत, बेटीरोटीव्यवहार करीत नाहींत, महारादिक पूर्वास्पृश्यांस तर शिवतहि नाहींत. पर्वती-सत्याग्रहांत अस्पृश्यांच्या

डोक्यांत लाठी घालणाऱ्या प्रमुखांत अनेक मराठे होतेच. नाशिकच्या राममंदिर-सत्याग्रहांत अस्पृश्यांना मज्जाव करणाऱ्यांतील कट्टरांतील कट्टर विरोधक नुसते भटजीच नसून शेठजी आणि रावजीहि होते. अस्पृश्यांनीं जन्मांत घोड्यावर बसूं नये, तो अधिकार क्षत्रियांचा म्हणून हुंकारीत अस्पृश्यांस अनेक क्षत्रिय राजांनीं पूर्वीं कठोर दंड केले आहेत. राजपुतान्यांत झांशीस गेल्या दोनतीन वर्षांत अनेक वेळां मारपीट केल्याचीं प्रकरणें घडलीं आहेत. अेका शिक्षित मराठा तरुणीनें मराठेतर अुच्च कुळांत प्रीतिविवाह करावयाचें ठरवितांच त्यांची जातगंगा भरून दंगाधोपा करण्याच्या धमक्या देण्यापर्यंत पाळी आणलेलीं अुदाहरणें हिंदुसभांच्या दृष्टीस दाखल आहेत. पांडवप्रतापाची मिरवणूक काढणाऱ्या महारांवर लाठीहल्ले शूद्रांनीं नाशिक जिल्ह्यांत केल्याचें वर्तमान अगदीं आजकालचें आहे, सर्वत्र गाजलेलें आहे. खेडेगांवांतील शाळांत आमच्या मुलांशेजारीं महार-चांभारांच्या मुलांस बसूं देणार नाहीं, म्हणून मराठ्यांनी आणि स्वतः शूद्रांनीं दांडगाया केलेलीं अुदाहरणें तर प्रत्येक संघटक कार्यकर्त्यास पदोपदीं आडवीं येतात. द्विजांबरोबर अेकासन करणारा शूद्र दंडनीय म्हणून सांगणाऱ्या स्मृतींस कडकडून शिव्या देणारे शूद्र स्वतःबरोबर अस्पृश्यांना अेकासन करण्याची तशीच कठोर बंदी करतात !! फार काय, अस्पृश्यांतदेखील प्रत्येक जात ‘खालच्या’ जातीवर तेच अन्याय त्याच ‘अुच्च’ जातिमत्वाच्या सूत्रानें करीत आहे कीं, ज्या अन्यायांस ब्राम्हणांनीं केले म्हणून ब्राम्हणेतर ब्राम्हणांस नी अस्पृश्य स्पृश्यांस शिव्या देत आले, ब्राम्हण ब्राम्हणेतर भांडले तसेच ब्राम्हणेतरांत मराठे मराठेतर भांडतात, स्पृश्यास्पृश्येतर अेकमेकांस कुचलतात, स्पृश्येतरांतहि महारमहारेतर पंथ पडून महारेतरांवर महार फार अन्याय करतात म्हणून बोंबाबोंब चालू आहे. चांभार पुढारी आंबेडकरांवर महारांचा पक्षपाती म्हणून आरोप करतात. फार काय, महारांतदेखील आंबेडकर कोंकणस्थ महार म्हणून देशस्थ महारांनीं त्यांचें पुढारीपण नाकारण्याच्या नी देशस्थ

नां. वि.

महारांचा सवता सुभा उभारण्याच्या चळवळी केल्या आहेत, करीत आहेत. ब्राम्हणांतच कोंकणस्थ ब्राम्हण नी देशस्थ ब्राम्हण नाहींत तर वाण्यांत कोंकणस्थ वैश्य, देशस्थ वैश्य, महारांत कोंकणस्थ महार, देशस्थ महार !

फार काय सांगावें, नाशिकला ब्राम्हण, वाणी, मराठ्यांनीं 'राममंदिरांत शिरूं' म्हणतांच महारांना मारहाण केली त्या असमानतेविषयीं सात्विक नी न्याय्य संतापानें जळफळणाऱ्या महारांच्या मरीआईच्या देवळांत जर भंगी तशाच अत्याग्रहानें शिरूं लागले तर तेच महार तोच असमानतेचा ध्वज संरक्षिण्यास्तव तशाच लाठ्यांनीं त्या भंग्यांस झोडपण्यास सोडणार नाहींत ! रायगडीं गेल्या महिन्यांत शिवोत्सवीं महार सहभोजनास आले म्हणून कांहीं मराठे ब्राम्हण जसे उठून गेले तसेच महार सार्वजनिक पंगतींत भंगी मंडळी बसतांच महारहि त्या 'बाटाबाटी'स लाठालाठीनेंहि विरोधिण्यास सोडणार नाहींत.

तेव्हां जातिभेदाच्या खुळाचें खापर ब्राम्हणांवर वा क्षत्रियांवर वा स्पृश्यांवरच फोडणें निव्वळ पक्षपात आहे. ह्या रोगानें भंग्यापर्यंत प्रत्येक जात पछाडलेली आहे. हा जात्यहंकाराचा दोष सर्वांचा आहे. त्याविषयीं ज्या ज्या शिव्या ब्राम्हणांस वा क्षत्रियांस कोणी हांसडूं अिच्छितो त्यांच्या त्यांच्या 'प्राप्तीचा अर्धा वांटा' यच्चावत् जातींना वांटून दिला पाहिजे.

अुलट पक्षीं ह्या जन्मजात जातिभेदाच्या रोगास निर्दाळूं निघालेल्या सुधारकांत अत्यंत प्रमुख सुधारक ब्राम्हणहि होते; बुद्धाच्या मागें त्यानें त्याच्या संघाचा सारा भार नी आपला संचालकत्वाचा

अधिकार सोंपविला अेका ब्राह्मणावर! स्वतःचें अधिकारी पिठाधिष्ठानवसन बुद्धांनीं मरतांना ज्या पट्टशिष्यावर घातले तो महाकाश्यप होता ब्राह्मण. बुद्ध पंथाचे मोठमोठे ग्रंथकार, सूत्रकार, प्रचारक, भिक्षु होते ब्राह्मण. संतावैष्णवांत अनेक प्रमुख आचार्य होते ब्राह्मण. चैतन्य प्रभु, ज्ञानेश्वर, अेकनाथ, रामकृष्ण परमहंस, सारे ब्राह्मण. आर्यसमाजाचे स्थापक दयानंद, ब्राह्मोसमाजाचे अध्वर्यु टागोर, प्रार्थनासमाजाचे रानडे होते ब्राह्मण. त्याचप्रमाणें अनेक क्षत्रिय, अनेक वैश्य, अनेक शूद्र, नव्हे रोहिदास, चोखा, नंद तिरुपेल्लुअरांसारखे अनेक 'अस्पृश्य' हि थोरथोर सुधारक होअून गेले, होता आहेत.

अर्थात् ब्राह्मणांत काय, भंग्यांत काय जात्यहंकारी, वैषम्यवादी, पीडक जसे सांपडतात, तसेच त्या त्या प्रमाणांत जातिभेदोच्छेदक समतावादी सुधारकहि सांपडतात. ब्राह्मण वा क्षत्रिय म्हटला कीं, लुच्चा आणि अितर तेवढे सारे केवळ परोपकारी, केवळ साधु, केवळ समतावादी निरुपद्रवी सज्जन असें म्हणणारा जातिभेदोछेदक हा, त्या त्याच्या जात्युच्छेदक गर्जनेनेंच जातिद्वेषाचें कार्य साधतो, कळत नकळत जातिभेद खरा आहे असें सिद्ध करतो. कारण ब्राह्मणाची वा कोणाचीहि जात जन्मतःच आणि सगळी जातची जात वाईट नी इतरांची जातची जात जन्मतःच हटकून चांगली, असें म्हटलें कीं, ह्या जाति नुसत्या मानीव, नुसत्या पोथीजात नसून खरोखरीच जन्मजात आहेत, त्यांच्यांत जन्मजात असा कोणता तरी विशिष्ट विभेद आहे, असेंच नाहीं का सिद्ध होत?

पण ब्राम्हणाच्या वा भंग्याच्या जातींत सारेच वाअीट वा सारेच चांगले लोक जन्मतःच वांटले जात नाहींत. तसें म्हणणाऱ्या

वेड्या पिरांचा तो आक्षेप समूळ खोटा नी द्वेषदूषित असतो. म्हणूनच ह्या साऱ्या जाति मूलतःच भिन्न नसून हा जातिभेद जन्मजात नसून निव्वळ मानीव नी पोथीजात आहे असें ठरतें.

अश्वघोषांनीं लिहिलेल्या वरील वज्रसूचींत हें तत्त्व गृहीत नी सूचित असतांहि स्पष्टीकृत नसल्यानें कोणाचाहि गैरसमज होऊं नयें यास्तव तें आम्हीं वर स्पष्टिलें आहे.

# सहभोजनांचा धूमधडाका !

**किर्लोस्कर** मासिकाच्या सन १९३५ च्या फेब्रुवारीच्या अंकांत 'जातिभेद मोडावयाचा म्हणजे काय करावयाचें ?' :हा लेख लिहिला होता. त्यांत आम्हीं असें दाखविलें होतें कीं, जन्मजात म्हणविणाऱ्या परंतु वास्तविकपणें केवळ पोथीजात असणाऱ्या या आजच्या जातिभेदास अुच्चाटिण्याच्या कार्यीं सहभोजन हेंच अमोघ साधन आहे. रोटीबंदीची बेडी तुटली कीं जातिभेदाची नांगीच गळली म्हणून समजावें ! जातिभेद तोडणें म्हणजे मुख्यत: रोटीबंदी तोडणें होय आणि रोटीबंदीची बेडी तोडणें म्हणजे दुसरेंतिसरें कांहीं करावयाचें नसून जातिभेदाचें पूर्वींचें जें एक महत्वाचें अुपांग असे, त्या व्यवसायबंदीची आज जी गत झालेली आहे, तशीच रोटीबंदीची गत करून सोडली पाहिजे.

पूर्वीं जातिभेदाचें अेक अत्यंत महत्त्वाचें लक्षण म्हणजे व्यवसायबंदी हेंच होतें. ब्राह्मणांनी थोड्याचा, सुताराचा, लोहाराचा धंदा करणें निषिद्ध; लोहारानें मासोळीचा निषिद्ध, सुतारानें भटपणाचा निषिद्ध. पण आज काय आहे? धंद्याचा जातीशीं कांहींअेक संबंध राहिला नाहीं. जातीचा प्रश्न निराळा, धंद्याचा निराळा. वाटेल त्यानें वाटेल तो धंदा केला तरी त्याची जात जात नाहीं, हीच आज अितकी ठाम समजूत झालेली आहे कीं, जणूं काय तेंच मूळचें श्रुतिस्मृतिपुराणोक्त सनातन शास्त्र होय! अगदीं वेदशाळेंतील गुरुजीस जरी म्हटलें कीं, 'अहो, ते गोडबोले किराण्याचें दुकान घालून बसले आहेत, शामभट म्हशी ठेवून दूध विकतात आणि मवांडेकर विविधविक्रेत्याचें (जनरल मर्चंटचें) दुकान घालून त्यांत विलायती बूट विकताहेत, त्यांना ब्राह्मणांनीं जातिच्युत ठरवावें' तर ते वेदशास्त्रसंपन्न गुरुजीसुद्धां आज अगदीं ठामपणें म्हणतील, 'तें काय म्हणून? दुकानाचा वा दूध विकण्याचा ब्राह्मणपणाशीं काय संबंध? दुकान घातलें म्हणजे काय ब्राह्मणाची जात बदलते वाटतें? खुळा कुठला! धंदा हा पोटापाण्याचा प्रश्न, जातीचा नव्हे!' धंदा लोहाराचा, वैद्याचा, डॉक्टराचा, गाडीवाल्याचा, मोटारीचा, गवळ्याचा कसलाहि केला तरी शिंपी जातींत जन्मला तो जात शिंपीच लावतो. अपवाद अस्पृश्य धंद्याचा तेवढा कांहींसा आहे. पण यांत्रिक सहाय्यानें केल्यास त्याहि धंद्यानें जात जात नाही. मराठा, ब्राह्मण, वाणी जात न गमावतां बुटांचा यांत्रिक कारखानदार होअूं शकतो. चामड्याचे केलेले पदार्थ तर बेखटक शेंकडों ब्राह्मण, मराठा, वाणी दुकानदार प्रत्यहीं विकताहेत. म्हणजे प्रत्येक ब्राह्मण जरी मूळचे शूद्राचे म्हणून ठरलेले धंदे करतो असें नाहीं तरी वाटेल त्या ब्राह्मणानें त्याला वाटेल तो धंदा केला तरी त्याची जात जात नाहीं. तीच स्थिति सर्व जातींची. धंदा सुताराचा, जात गवळी; धंदा लोहाराचा, जात कऱ्हाडे ब्राम्हण;

धंदा गवळयाचा, जात शिंपी; धंदा शिंप्याचा, जात गवळी अशी नुसती खिचडी होऊन **जातींचीं नांवें म्हणजे धंद्यापुरतीं तरी नुसतीं आडनांवें झालेलीं आहेत.** धंद्यानें जात जाते ही समजूत आज ठार झाली आहे, व्यवसायबंदी या अर्थी एकंदरींत तुटली आहे.

तशी रोटीबंदीची गत झाली कीं, जातिभेद मरणाच्या दारीं बसलाच म्हणून समजा. 'धंद्याचा हो जातीशीं काय संबंध ?' असें जसें आज अगदीं भटभिक्षुकदेखील तावातावानें विचारतो आणि वाटेल तो धंदा केला तरी जात तशीच राहते म्हणून जशी ठाम समज सर्वांची झालेली आहे, तशीच जेवल्यानें जात जात नाहीं अशी ठाम समज सर्वत्र फैलावली कीं, रोटीबंदीची बेडी तुटली. अितकेंच नव्हे, तर जातिभेदाचींहि शंभर वर्षे भरत आलीं असें समजण्यास हरकत नाही. प्रत्येक **ब्राह्मणानें वा मराठ्यानें अितर जातीं-बरोबर जेवलेंच पाहिजे, सहभोजन केलेंच पाहिजे असा कांहीं रोटीबंदीची रूढि तोडण्याचा अर्थ नाहीं. तर कोणी ब्राह्मण वा मराठा वा वाणी कोणत्याहि अितर जाती-बरोबर जेवला, सहभोजनांत भाग घेता झाला, तरी त्यामुळें त्याची जात जाण्याचें कांहींएक कारण नाहीं अशी समज रूढावली कीं रोटीबंदीची बेडी तुटली.** आज जसें भिक्षुकसुद्धां विचारतो कीं, 'धंद्याचा हो जातीशीं काय संबंध ?' तसेंच, उद्यां तो विस्मयानें विचारील कीं, 'जेवण्याचा हो जातीशीं काय संबंध ? सहभोजनांत कुणी जेवला तर तो त्याच्या व्यक्तीच्या आवडीनिवडीचा प्रश्न आहे. ज्याला जो परवडेल तो धंदा त्यानें करावा, ज्याला जिथें परवडेल तिथें त्यानें जेवावें ! त्यामुळें जात हो कशी जाणार ?' असें आश्चर्य ज्याला त्याला वाटूं लागलें कीं, रोटीबंदीची बेडी तुटली !

कोणी म्हणेल, 'अहो, हे शब्द झाले, व्याख्या ठीक आहे; पण गेल्या दोनतीन हजार वर्षांची रूढि, शास्त्र, शिष्टाचार, ह्यांहीं

अत्यंत बळावलेली नी लहानपणींच रक्तमांसांत मुरत जाणारी ही रोटीबंदीची भावना अितकी साफ बोलतां बोलतां अुखडली जाणार कशी ? महा दुर्घट !'

त्यास अुत्तर असें कीं, 'बोलतां बोलतां' ही रोटीबंदीची रूढि अुखडली जाणार नाहीं हें अगदीं खरें. पण 'करतां करतां' मात्र ती रूढि नामशेष करतां येते. अगदीं मोजक्या दहा वर्षांच्या आंत रोटीबंदीची बेडी तोडून जातिभेदाचें कंबरडेंच मोडतां येतें. हा नुसता आशावाद नाहीं, तर करून दाखविलेला प्रयोग आहे. कारण रत्नागिरीस आज रोटीबंदी हा जातीपातींचा जिवंत भाग राहिलेला नसून व्यवसायबंदीसारखीच बव्हंशीं तरी पांगुळली आहे.

## सहा वर्षांत रत्नागिरीनें रोटीबंदीची बेडी तोडून टाकलीच की नाहीं ?

सन १९३० च्या गणेशोत्सवांत रत्नागिरीच्या संघटक पक्षाच्या वतीनें रोटीबंदीची बेडी तोडण्याची चळवळ हातीं घेण्याचा संकल्प आम्हीं प्रकटपणें सोडला. लगेच मतप्रसाराची धुमश्चक्री चालू झाली. परंतु मुख्य भर सहभोजनांत ती रोटीबंदी प्रत्यक्षपणें तोडून दाखविणाऱ्या कृतीवरच संघटक पक्षानें दिला. सहभोजनांची संततधार धरली. संघटक पक्षाचे शेंकडों स्त्रीपुरुष नांवें छापून छापून, बहिष्कारांना तोंड देअून देअून, प्रकटपणें 'जात्युच्छेदनार्थम् अखिल-हिंदु-सहभोजनम् करिष्ये' असे चक्क संकल्प सोडून सहभोजनांमागून सहभोजनें वर्षानुवर्षे ठोठावीत राहिले. भंगी ते भटापर्यंत कोणासहि आज असें म्हणतां येत नाही कीं, मी सहभोजनांत जेवलेल्यांबरोबर जेवलेलों नाहीं ! ब्राह्मण, मराठे, महार, भंगी स्त्रीपुरुष हजारहजार पानें सरमिसळ सहभोजनांत सारखीं जेवत राहिलीं. त्यामुळें शेवटीं जेवण्याचा जातीशीं संबंध असा रत्नागिरींत अुरला नाहीं. घरोघर बहुशः प्रत्येक हिंदु सहभोजनांत तरी जेवलेला आहे किंवा

सहभोजकावरोबर तरी जेवत आहे. **कोणच्याहि जातीनें जात म्हणून त्यांच्या जातींतील कोणाहि सहभोजकावर जातिबहिष्कार टाकलेला नाहीं. रत्नागिरीस तो प्रश्नच मिटला आहे.** धंद्यानें जात जात नाहीं तशीच जेवल्यानेंहि जात जात नाहीं, हाच आजचा रत्नागिरीचा सामाजिक दंडक, व्यवहाराचें शास्त्र, चालू रूढिहोऊन बसली आहे. म्हणूनच गेल्या १९३५ च्या गणेशोत्सवीं हिंदुसभेच्या दशवार्षिक वाढदिवसानिमित्त रोटीबंदीचा पुतळा हजारों लोकांच्या जयजयकारांत नी वाद्यांच्या निनादांत जाळून भस्म केला गेला !

## रत्नागिरीनें पांच वर्षांत जर रोटीबंदी तोडली तर अितर नगरांसहि ती तशीच तोडणें कां शक्य नसावें ?

नुसत्या बोलण्याची, नुसत्या तात्त्विक चर्वितचर्वणाची, नुसतें अमुक केलें पाहिजे हें मी तुम्हांस नी तुम्ही मला केवळ सांगत सुटण्याची खोड सोडून जो तो जात्युच्छेदक सुधारक तें जें करावयाचें तें करूं लागला पाहिजे. ज्यानें त्यानें स्वत: नांवें देऊन प्रकटपणें नी पुण्यकर्तव्य म्हणून सहभोजनांत प्रकटपणें जेवत राहिलें पाहिजे ! केली, आचरली, स्वत: करून सोडली कीं, सुधारणा होतेच होते; रूढि त्या प्रमाणांत तुटतेच तुटते. अितर बहुतेक क्रांतीस जें लागू पडतें तेंच समर्थांचें सूत्र सामाजिक क्रांतीसहि लागू पडतें, कीं–

**वन्हि तो चेतवावा रे ! चेतवीतांचि चेततो !!**
**केल्यानें होत आहेरे आधीं केलेंचि पाहिजे !!**

ह्या कारणासाठीच आम्हांस आजचा हा ‘ सहभोजनाचा घूमधडाका ’ हा लेख लिहिण्यांत विशेष आनंद वाटत आहे. कारण कीं, रोटीबंदी तोडण्याचे हे लाभ आहेत नी ते आहेत, जातिभेद असा

तोडावा नी तसा, सहभोजनें कशीं करावीं नी कां करावीं या नुसत्या काथ्याकुटीमध्यें नुसत्या शाब्दिक योजना चर्चिण्यामध्यें हा लेख दवडण्यांत येणारा नाहीं. तर रोटीबंदी ही अमुकअमुक ठिकाणीं अमक्या अमक्यांनीं तोडून दाखविली आहे. कांहींतरी काम करून दाखविलें आहें हें सांगण्याचा योग या लेखांत जुळून येत आहे.

नुसत्या योजनांचा आणि शद्बांचा आम्हांस आतां अगदीं तिटकारा आला आहे. त्याच त्या योजना खलीत नी तेच ते शास्त्रार्थ चघळीत बसण्यांत तीन पिढचा गेल्या ! रानडचांनी ज्या योजना आंखल्या, टिळकांनीं ज्या प्रतिपादिल्या त्याच पुन:पुन्हा ही पिढीसुद्धां लिही-आंखीत-सांगत बसली आहे; पण त्या योजनांपैकीं शतांश कामाचासुद्धा अुरक म्हणून झाला नाहीं. जो तो दुसऱ्यानें काय करावें हें सांगतो. दर दिवशीं मासिक, साप्ताहिक, दैनिकांचे भारेच्या भारे, नुसत्या त्याच त्या शाद्बिक योजना, नुसती तीच ती तात्त्विक चर्चा, तीच ती 'अमुक करावें'ची रडकथा गात बाहेर पडत आहेत; पण काडीचें कामसुद्धां स्वत: करून दाखविणारा, ही अमुक योजना पार पाडली म्हणून सांगूं शकणारा, हजारांत एक आढळत नाहीं ! अशा स्थितींत रोटीबंदी तोडण्याच्या कार्यीं तरी 'हीं पाहा अमुक सहभोजनें घडवून आणून अितक्या लोकांनीं रोटीबंदी स्वत:पुरती तरी प्रकटपणें तोडून टाकली, त्या प्रकरणीं कांहींतरी काम करून दाखविलें' हें सांगण्याचें समा ान आम्हांस हा लेख लिहितांना लाभत आहे. यासाठीं या लेखाचें आम्हांस विशेष महत्त्व वाटतें.

रोटीबंदी कां तोडावी नी कशी तोडावी या विषयाची नुसती शाद्बिक चर्चा करणाऱ्या पांचशें लेखांपेक्षां पूर्वास्पृश्यांसुद्धां सरमिसळ पंगतींत जेवून ती प्रत्यक्ष नी प्रगटपणें तोडून टाकणारें पांचजणांचें अेक सहभोजन हें अधिक महत्त्वाचें आहे !

रोटीबंदी तोडणें शक्य आहे हें रत्नागिरीनें स्वत:च्या कृतीनें सिद्ध करून दाखविलें. ही घोषणा करण्यासाठीं जेव्हां गेल्या

सन १९३५ च्या गणेशोत्सवीं रोटीबंदीच्या पुतळ्यास समारंभपूर्वक अेका ब्राह्मण नी महार तरुणाच्या हस्तें आग लावून दिली, तेव्हां आम्हीं केलेल्या भाषणांत असें सांगितलें होतें कीं, जी आग तुम्ही आज ह्या महाराष्ट्राच्या अेका कोपऱ्यांत चेतवीत आहां,

## तिच्या ठिणग्या साऱ्या महाराष्ट्रभर उडतील !

आणि रोटीबंदीची राखरांगोळी करून टाकतील ! तें आमचें भविष्य अेका वर्षाच्या आंत अितक्या वेगानें खरें ठरूं पाहात आहे कीं, ही समाजक्रांति घडवून आणण्यासाठीं उतावीळ झालेल्या रत्नागिरीच्या जात्युच्छेदक पक्षाससुद्धां थोडेंफार साश्चर्य समाधान वाटावें ! रत्नागिरीच्या जात्युच्छेदक आंदोलनाचें लोण पर्वतापलीकडे नेअून महाराष्ट्रांत पोंचविण्याचें हें श्रेय मुख्यतः ज्यांच्याकडे आहे, रत्नागिरीच्या समाजक्रांतीच्या होमकुंडांतून अुडून

## जी पहिली ठिणगी महाराष्ट्रांत पडली, ती म्हणजे श्री. अनंतराव गद्रे !

हेच होत. हिंदुसभेच्या दशवार्षिक महोत्सवांत गणेशोत्सवीं डॉ. मुंजे महाशयादिक महाराष्ट्रांतील थोर थोर पुढारी, संपादक नी कार्यकर्ते रत्नागिरीस आमंत्रिले गेले, त्यांतच मुंबईचे श्री. अनंतराव गद्रे हे रत्नागिरीस आले होते. त्यांनीं ह्या पोथीजात जातिभेदोच्छेदक आंदोलनाचें चाललेलें रत्नागिरींतील कार्य स्वतः पाहिलें. हजारांवर स्त्रीपुरुषांचीं झडणारीं आब्राम्हणभंग्यांचीं सहभोजनें त्यांत स्वतः भाग घेऊन निरीक्षिलीं आणि तेंच कार्य महाराष्ट्रभर फैलावण्याचा यथाशक्ति यत्न करीन असें प्रतिज्ञापून त्यांनीं त्या दिवसापासून त्यांच्या 'निर्भीड' साप्ताहिकासह आंदोलनांत वाहून घेतलें. दुसऱ्यांनीं रोटीबंदी तोडण्याच्या कार्यीं यंव करावें नी त्यंव करावें

असें बोलघेवडेपणा करूनच ते थांबले नाहीत तर त्यांनीं तें कार्य प्रत्यक्षपणें व्यवहारून टाकण्यासाठीं अेक कार्यकर्ती संस्थाहि काढली-

## झुणकाभाकर सहभोजन संघ !

श्री. गद्रे यांच्या डोक्यांतून निघालेली 'झुणकाभाकर सहभोजनाची' क्लृप्ति ही त्यांच्या आजवरच्या अनेक क्लृप्त्यांप्रमाणें अेक नुसती चटकदार क्लृप्तीच काय ती राहिलेली नसून अेक दूरवर परिणाम करणारें राष्ट्रीय कार्य होऊन बसलेलें आहे. आपला नांवाचा तेवढा अेक भपकेबाज संघ पण कामाच्या नांवानें मात्र पूज्य अशी त्या संस्थेची स्थिति नाहीं. अगदीं प्रथमपासूनच अनंतराव गद्रे यांनीं त्या संघाच्या नांवाप्रमाणें कार्यहि करून दाखविण्यासाठीं अंगीं कष्ट केले आहेत. त्यांना श्री. अत्रे, श्री. खांडेकर आदिकरून अनेक अुत्साही हिंदुसंघटक गृहस्थांचा मनःपूर्वक पाठिंबा नी सहकार्य लाभलें. त्यायोगें ह्या झुणकाभाकर सहभोजन संघानें ह्या अेका वर्षाच्या आंत अितकीं मोठमोठीं सहभोजनें घडवून आणलीं आहेत कीं, रोटीबंदीची बेडी त्यांच्या घणघावाखालीं अल्पावधींतच करकरूं लागली ! कारण त्या संघाच्या वतीनें म्हणून घडलेल्या सहभोजनांच्या योगें रोटीबंदी प्रगटपणें तोडून टाकण्याची अेक प्रबळ प्रवृत्ति जिकडे तिकडे अुद्‌भवूं लागली आहे. किंबहुना तो संघ म्हणजेच ही प्रवृत्ति ! ती कांहीं संस्था नव्हे, घटना नव्हे, सभासदांची टिपणी नव्हे, विशिष्ट नांवदेखील नव्हे, तर झुणकाभाकर सहभोजन संघ ही अेक प्रवृत्ति आहे ! जो कोणीं येथें वा तेथें कोणत्याहि नांवाखालीं वा नांवावांचून पण जात्युच्छेदनार्थम् म्हणून प्रकटपणें अखिल-हिंदु सहभोजनांत भाग घेतो आणि नांव छापून रोटीबंदीची बेडी तोडून टाकतो, तो तो झुणकाभाकर सहभोजन संघाचा सभासद, हीच त्याची घटना !

# सात वर्षांपूर्वीं रत्नागिरीनें समाजक्रांतीची केलेली उठावणी आज महाराष्ट्र व्यापीत चालली आहे !

झुणकाभाकर सहभोजन संघाप्रमाणेंच अनेक मंडळ्या, संघ, हिंदुसभा सहभोजनांची झोड कशी उडवीत आहेत, हजारों प्रामाणिक स्वयंसेवक नी स्वयंसेविका प्रकटपणें रोटीबंदीची बेडी तोडून टाकून जातिभेदाचें कंबरडेंच मोडून टाकण्यास पुढें सरसावत आहेत ह्याची जाणीव अेकअेकट्या सहभोजनाची यत्रतत्र छापलेली स्फुट बातमी केव्हांतरी वाचून जितकी व्हावी तशी होत नाहीं. पण त्या सर्वांची संकलित टिपणी पुढें ठेवतांच जो सहज परिणाम मनावर होतो, त्यामुळे मात्र ह्या चळवळीचें खरें बळ नीट रीतीनें मापतां येतें. यासाठीं आम्हीं गेल्या सहा महिन्यांत रत्नागिरीनें केलेल्या अुठावणीचा फैलाव महाराष्ट्रभर कसा होत चालला आहे हें ठिकठिकाणीं झालेल्या सहभोजनांतील कांहीं प्रमुख सहभोजनांची अेकेक टिपणी या लेखांत खालीं देत आहोंत. ती दिग्दर्शनापुरतीच असल्यानें कांहीं सहभोजनांचीं नांवें त्यांत गळलीं तरी कोणीं विषाद मानूं नये. आठवतात त्यांतून थोडींफार अुदाहरणें देणेंच काय तें अशा संक्षिप्त प्रतिवृत्तांत स्थलाभावीं शक्य असतें.

गेल्या डिसेंबर १९३५ पासून—

(१) झुणकाभाकर सहभोजन संघाचें पुणें येथें श्री. राजभोज यांच्या घरीं झालेलें प्रकट सहभोजनः— श्री. बापूराव राजभोज हे चांभार पुढारी. हें सहभोजन चांभारवाड्यांत झालें. चांभार भगिनींनी स्वैंपाक करून त्यांत वाढलें आणि अध्यक्ष केशवराव जेधे हे होते. सहभोजनांत श्री. काकासाहेब गाडगीळ, श्री. वैशंपायन, श्री. अ. ह. गद्रे प्रभृति प्रमुख गृहस्थ आणि ब्राम्हण, मराठे प्रभृति 'अुच्च'

जातींची अनेक मंडळी होती. त्यांतहि विशेष कीं, चांभाराहून खालचे समजल्या जाणाऱ्या मांग अस्पृश्य बंधूंचे पुढारी श्री. सकट हेहि राजभोजांच्या पंगतीस जेवले. नांवें छापलीं होतीं. सर्व दृष्टींनीं हें सहभोजन रोटीबंदीचा पुरता खुर्दा अुडविणारें होतें.

( डिसेंबर १९३५ ).

( २ ) भेलसा, ग्वाल्हेर येथें सहभोजनः— हरिजनसेवक संघाचे श्री. दाते, सुरेंद्रजी मास्तर, मन्नुलालजी, पंडित काशीनाथ प्रभृति अनेक स्पृश्यास्पृश्य मंडळींनीं भाग घेतला. स्वैंपाक करणाऱ्यांत नी वाढणाऱ्यांत चांभार मंडळीहि होती. नांवें छापलीं.

तारीख २४।१२।१९३५ ( 'स्वराज्य', खांडवा )

( ३ ) राष्ट्रसभा सुवर्ण-महोत्सव सहभोजनः– मुंबईस झालें. श्री. नरीमन प्रभृति थोर थोर पुढारी पंक्तीस होते. सोळाशेंवर पान झालें. त्यांत पांचसहाशें पूर्वास्पृश्य मंडळी होती. पण अुणीव अेवढीच अेक राहून गेली कीं, समग्र नांवें छापलीं गेलीं नाहींत. **नांवें छापल्यावांचून सहभोजनाचा मुख्य उद्देश जो रूढि प्रकटपणें तोडणें तो साधत नाहीं.**

(४) नायगांव (वसअी)– येथें शुद्धीकृत कोळ्यांशीं आजवर रोटीव्यवहार बंद असे. तो करावा या मताच्या कांहीं जुन्या कोळी मंडळींनीं त्या शुद्धीकृतांशीं सहभोजन केलें. अितकेंच नव्हे, तर शरीरसंबंधहि घडवून आणले. जोंवर आपण शुद्धीकृतांशीं रोटीबंदी नी बेटीबंदीची बेडी तोडून सुव्यवहार करीत नाहीं तोंवर शुद्धि कधींहि प्रबळ होणार नाहीं. **शुद्धि हवी तर रोटीबंदीची बेडी तोडलीच पाहिजे !** पुण्याच्या शुद्धिसभेंत श्री. मसूरकर महाराज, श्रीमत् शंकराचार्य कुर्तकोटी, पाचलेगांवकर महाराज यांच्या अनुमतीनें शुद्धीकृतांशीं पूर्ववत् रोटीव्यवहार करावा हा ठराव झाला. ह्या थोर पुढाऱ्यांनाहि ही सुधारणा शेवटीं पटली हें चांगलें झालें.

(५) राजपुताना, 'प्रगत हिंदुबंधु' यांचें सहभोजनः– जात्युच्छेदक संकल्पपूर्वक चारशेंवर स्पृश्यास्पृश्य मंडळींनीं भाग घेतला. परंतु सर्व नांवें तिकडच्या पत्रांतून छापलीं कीं नाहीं तें कळलें नाहीं.

(६) झुणका भाकर संघाचें मुंबअीचें पहिलें दांडगें सहभोजनः– तिकिटें विकत घेऊन सहाशे वर मंडळी जेवलीं. रोटीबंदी तोडण्याचा **जात्युच्छेदक संकल्प स्पष्टपणें सोडून हेतुतः हिंदुसंघटनार्थ घडलेलें अशा प्रकारचें मुंबअीचें हेंच पहिलें सहभोजन होय.** पूर्वीं प्रार्थनासमाजाचीं सहभोजनें कै. चंदावरकरादिकांच्या खटपटीनें कांहीं झालीं. त्या काळीं आपल्या हातीं होता तो तो यत्न त्या त्या आद्य सुधारक मंडळींनीं केला हें त्यांना विशेषच भूषणास्पद होतें हेंहि खरेंच. त्यांनीं पेरलेलीं बीजें व्यर्थहि गेलीं नाहींत हेंहि खरें. पण सहभोजनांची जात्युच्छेदक सतत नी संघटित चळवळ अशी, अुठावणी, अशी जी रत्नागिरीनें केली, तिच्या हिंदुसंघटनाच्या व्यापक तत्त्वांवर अधिष्ठलेलें असें स्पृश्यास्पृश्यांचें अितकें मोठें सहभोजन म्हटलें म्हणजे मुंबईला हेंच पहिलें होय! प्रो. गजेंद्रगडकर, डॉ. वेलकर प्रभृति अनेक पुढारी आणि ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य, शूद्र, महार, चांभार, भंगी प्रभृति सर्व जातींचे स्त्रीपुरुष पंगतींत सरमिसळ बसले होते. 'निर्भीड' मध्यें नांवें प्रसिद्धिलीं होतीं. हें सहभोजन सर्व दृष्टींनीं महत्त्वाचें होतें.

(७) अिदूर साहित्यसंमेलनांत सहभोजनें:– तेथें जमलेल्या मंडळींत त्या मराठी साहित्यसंमेलनाचे अध्यक्ष श्रीमंत पंतप्रतिनिधि (औंधकर) हेहि होते. सभासदादिक सर्वांचा सैंपाक ज्या पाकशालेंत होअी तींत 'शारदाराजे होळकर वसतिगृहां'तील पूर्वास्पृश्य मुली अितर स्वयंसेविकांसहच सरमिसळपणें सैंपाक, वाढणें, चहापाणी अित्यादि कामें करीत होत्या. साहित्यिकांनीं जातिनिर्विशेषपणें सरमिसळ पंगतींत बसून सहभोजनें झोडलीं. त्या सैंपाकादि अन्नपाणीपर्यंत खपणाच्या पूर्वास्पृश्य कुमारिकांचीं नांवें मंजुळा, चंद्रभागा,

लक्ष्मी, सौ. नगिना राजा. पण या सहभोजनांत अेक व्यंग राहिलेंच. तें म्हणजे त्यांतील नांवें छापलीं नाहींत ! कारण कीं, नांवें गुप्त राहिल्यामुळें तिथें चापून स्पृश्यास्पृश्यांसह पक्कान्नांवर हात मारलेले 'सुवर्णमध्यमी' अनेक साहित्यिक परत पुण्यामुंबईस आपापल्या घरीं येतांच सहभोजन केल्याचें साफ नाकारूं शकतात ! नांव छापीत नसाल तर सहभोजनांत बसतों. 'नांव छापून जें सहभोजन होतें तेवढेंच काय तें चुकीचें !' हीच अेका सोनेरी टोळीची सुवर्ण-मध्यमाची व्याख्या आजकाल ठरली आहे ! त्या सोनेरी टोळीचा हा मिथ्याचार अुघडकीस आणणें अवश्य असल्यामुळें कोणच्याहि सहभोजनांत ते भाग घेतातसें दिसलें कीं, त्यांचीं नांवें चापून छापीत चलावें ! (डिसेंबर १९३५).

(८) पुण्याच्या हिंदुमहासभेच्या स्वा. म. च्या वतीनें दिलेलें सहभोजन:– यांत शेंकडों मोठमोठीं स्पृश्यास्पृश्य मंडळी, निरनिराळ्या प्रांतांतली, सरमिसळ पंगतींत जेवली. पण व्यंग जें राहून गेलें तें हेंच कीं, त्यांचीं नांवें छापलीं गेलीं नाहींत. त्यांतल्या त्यांत 'निर्भीड'कारांनीं श्री. माटे, श्री. शिखरे, श्री. तात्याराव केळकर प्रभृति कांहींचीं नांवें पूर्वास्पृश्यांसह सरमिसळ सहभोजन करणारांत छापलीं हें बरें झालें. तशींच जर का सर्वांचीं छापलीं जातीं तर सुवर्णमाध्यमिकांची अेक मोठी सोनेरी टोळीची टोळी पाडाव होअून सहभोजक संप्रदायाच्या छावणींत आणतां आली असती. पण तसें न झाल्यामुळें त्या सहभोजनांत पुख्खा झोडलेले कित्येकजण अजूनहि सहभोजनास अेक अतिरेकी चळवळ म्हणून म्हणायची साळसूद लबाडी करण्यास मोकळे राहिले आहेत. ( डिसेंबर १९३५ ).

(९) भावसार मंडळीचें शहाबाद येथील सहभोजन:–भावसार मंडळी श्री. हंचाटे यांच्या कन्येच्या लग्नानिमित्त आली असतां शहाबादचे श्री. सुलाखे यांनीं पूर्वास्पृश्य मंडळींस जेवणास बोलावलें. सर्व मंडळींच्या अनुमतीनें मुख्य पंगतीच्या समोरच त्या पूर्वास्पृश्यांसह

बसणाऱ्यांची सहभोजक पंगत बसली. दावणगिरीचे नरसिंगराव आंबेकर, शहाबादचे हंचाटे, श्री. सुलाखे प्रभृति मंडळींनीं त्या सहभोजनांत भाग घेतला. अितर लग्नमंडपी मंडळींनीहि तें सहभोजनकृत्य जातिबहिष्कार्य मानलें नाहीं. भावसार मंडळीचीं ही प्रगतिप्रियता विशेषतः अुल्लेखनीय आहे. तारीख १५–२–३६.
(' भावसार क्षत्रिय ').

(१०) चिंचोली (जि. पुणें) येथील सहभोजनः– ह्या सहभोजनाचा विशेष हा कीं, यांत निमगांव, देहू, भोसूरी, केंपूर, जांभूळ प्रभृति वीसअेक खेड्यांतील पूर्वास्पृश्य मंडळी आली होती. महार, मांग, चांभार अित्यादि अस्पृश्यांतील रोटीबंदी जातींनीं-सुद्धां रोटीबंदी तोडली. पांचशेंवर पान झालें. (ता. १-३-३६). या सहभोजनास १८ ते २० रुपये खर्च आला ! कारण श्री. गायकवाड यांनीं बाजरी आणली आणि ती अनेक घरांत वांटून दिली. त्या प्रत्येकानें ती घरीं दळून, भाकरी भाजून त्यांच्या राशी भोजनस्थळीं पोंचविल्या. त्यामुळे कोणालाच त्रास न पडतां थोड्या खर्चांत भागलें ! ही सांगण्यासारखी युक्ति खरीच ! (निर्भीड).

(११) कराचीचें 'मित्रमंडळ' सहभोजन :— रावबहादुर मुजुमदार यांच्या यत्नें पार पडलें. तीनशें पानें झालीं. स्पृश्यास्पृश्य सरमिसळ पंक्तींत जेवले. प्रोफेसर जुन्नरकर, डॉ. तांबे, बाबूराव गद्रे, अणावकर, 'सिंधमराठा'कर्ते, डॉ. मुजुमदार, रावबहादुर ज. बा. मुजुमदार, व्हाअिसरॉय कपच्या अुड्डाणस्पर्धेत दुसरा क्रमांक पटवणारे प्रसिद्ध वैमानिक गाडगीळ अित्यादि थोरथोर मंडळी होती. नांवें छापलीं. हें अेक महत्त्वाचें सहभोजन होतें. (२५–२–३६).

(१२) मुंबईचें झुणकाभाकर संघाचें दुसरें दांडगें सहभोजनः– अनंतराव गद्रे, श्रीमती वागळे, कोल्हापुरचे 'सत्यवादीकार' पाटील अित्यादि मंडळींच्या परिश्रमें तिकिटें लावून घडवून आणलेलें हें मुंबअीचें दुसरें सहभोजन पहिल्याहूनहि दांडगें झालें. अेक हजार

पानें अुठलीं ! महार, मांग, ब्राम्हण, मराठा, चांभार, वाणी, भंगी, प्रभु, भांडारी प्रभृति अनेक जातींचे स्त्रीपुरुष सरमिसळ पंगतींत जवले. 'जन्मजात जात्युच्छेदनार्थम् अखिल हिंदु सहभोजनम् करिष्ये' हा संकल्प !! शेंकडों नांवें स्तंभचे स्तंभ भरून छापलीं. प्रोफेसर, वकील, डॉक्टर, संपादक अित्यादि सुशिक्षित पुढाऱ्यांची अशी दाटी अुडाली होती कीं कोणास अिथें दिग्दशनार्थ अुल्लेखावें हेंच आम्हांस कळत नाही !!

( १३ ) शांताक्रूझचें 'हिंदुसंघ' सहभोजनः— अध्यक्ष डॉ. अुदगांवकर हे हिंदुसंघटणाचे प्रसिद्ध पुढारी होते. श्री. वर्दे (विहार-कर्ते) मानकर, (वसुंधराकर्ते), श्री. नानाराव चाफेकर महाशय, श्रीमती वागळे, अिंदिराबाअी शिर्के, नाझीबाअी सावंत, लक्ष्मीबाअी साने, श्री. काळे, मोहिते, माने अित्यादि लिंगायत, मराठा, ब्राम्हण, महार, चांभार, प्रभु, भंगी, वैश्यादि जातींची मंडळी सरमिसळ होती. तीन मोठ्या पंक्ती अुठल्या. नांवें छापलीं. (१५-मार्च-१९३६)

(१४) अिदूरचें 'चटणीरोटी' सहभोजनः— पूर्वास्पृश्य महिला सैंपाकांतहि होत्या. जात्युच्छेदक संकल्प प्रकटपणें सोडून पंगती बसल्या. रावबहाद्दुर भांडारकर, प्रो. पाटील, सौ. भांडारकर, कर्णिक अित्यादि प्रमुख मंडळी जेवली. नांवें छापलीं. ( ता. २४–३–३६)

(१५) सांगली मांगवाडा सहभोजनः— मांगांनी सैंपाक केला. महारप्रभृति रोटीबंद अस्पृश्यांनी जातीभेद पायांखालीं तुडवून सह-भोजन केलें. नांवें छापलीं. (२४–३–३६).

(१६) पुणें लष्कर पूर्वास्पृश्य सहभोजनः— महारांच्या लग्न-समारंभांत महार, मांग, मोची अेकत्र जेवले. (१७–३–३६).

(१७ ) पुण्याचें टोलेबाज झुणकाभाकर संघ सहभोजनः—
**पुण्याच्या या अत्यंत यशस्वी सहभोजनानें तर सहभोजनांचा**

**उच्चांकच पटकावला** ! अेक हजारावर पानें अुठलीं. तिकिटें होतीं. जन्मजात जात्युच्छेदनाचा चक्क संकल्प सोडून सहभोजन झालें. प्रो. अण्णाराव कर्वे, प्रिन्सिपॉल आठवले, सर गोविंदराव माडगांवकर, रा. ब. सहस्रबुद्धे, बालगंधर्व प्रभृति सर्व जातींचे अनेक सुप्रसिद्ध पुढारी, विद्यार्थी, महिला, शेंकडों स्पृश्यास्पृश्य मंडळींच्या पंगती-मागून पंगती अुठल्या. ज्ञानप्रकाश, निर्भीड पत्रांतून शेंकडों नांवें छापलीं गेलीं. कोल्हापुरच्या सत्यवादीचे संपादक पाटील, निर्भीडचे गद्रे होतेच. श्री. प्रि. अत्रे, खांडेकर साहित्यिक नी काकाराव लिमये ह्यांनी आटोकाट मेहनत करून हें आजवरच्या संमेलनांतील अगदी अुच्चांक पटकावणारें सहभोजन घडवून आणलें ! (२२–३–३६).

(१८) अमरावतीचें झुणकाभाकर सहभोजनः— संघटनपुढारी शेठ पन्नालाल सिंघअी, श्री. वऱ्हाडदेशपांडे, श्री. कुऱ्हाडे या सर्वांनीं मेहनत केली. रोटीबंदी तोडण्यासाठीं म्हणूनच स्पृश्यास्पृश्यांचीं चारशेंवर मंडळी सरमिसळ जेवली. वाढणें, सैंपाकसुद्धां स्पृश्यास्पृश्य मंडळींनीं सरमिसळपणें केला. ( ७–४–३६ ).

(१९–२०) कोल्हापुरचीं दोन झुणकाभाकर सहभोजनें:– सत्यवादीचे संपादक पाटील ह्यांच्या मेहनतीने अल्पावधींत कोल्हापुरला दोन मोठमोठीं सहभोजनें जात्युच्छेदनाचा संकल्प सोडून झडलीं. महारवाड्यांत मध्येंच दुसरें दांडगें सहभोजन झालें. पांचशें-वर स्त्रीपुरुषांनीं भाग घेतला. मुंबईचे गद्रे, प्रभातचे संपादक विजयकर, डॉ. कांबळे, सत्तूर, लालनाथजी अित्यादि अनेक ब्राम्हण_ ब्राम्हणेतर मंडळींनीं भाग घेतला. स्थलाभावास्तव अिथें प्रमुख नांवेंसुद्धां देतां येत नाहींत. ( ता. १०–४–३६ ) सत्यवादी.

(२१) कऱ्हाड येथील झुणकाभाकर संघाचें सहभोजनः– जात्युच्छेदनाच्या चक्क संकल्पानें अनेक अस्पृश्यास्पृश्य मंडळींनीं सह-भोजनांत भाग घेतला. श्री. सत्तूर, श्री. खानोलकर, श्री. गद्रे, बुध्या गेले होते. पवार महाशयांनीं फार कष्ट घेतले. (अेप्रिल).

(२२) कल्याणचें क्षुणकाभाकर संघाचें सहभोजनः– पेठे बंधु यांनीं मेहनतीचा पुढाकार घेतला. अॅ. खंडेराव मुळे, भाअी गडबोले, अ. ह. गद्रे, डॉ. फडके, भिवंडीचे भागवत, अुकिडवे, डॉ. सबनीस, करंदीकर, भोसेकर, श्री. म. वर्दे, डॉ. भालेराव, जगताप, डेव्हिड (ख्रिश्चन), गांगल, बी. अेस्.सी., डॉ. कुळकर्णी इत्यादि शंभर अेक मंडळी स्पृश्यास्पृश्यांसह सरमिसळ जेवलीं. तिकिटें होतीं. नांवें छापलीं. (२५–४–३६).

(२३) सावंतवाडीचें सहभोजनः– हरिजनसेवक संघ रत्नागिरी यांच्या विद्यमानें अेक मोठें सहभोजन सावंतवाडीस झालें. सावंतवाडीचे कारभारी महाशय हे स्वतः शंभरसव्वाशें महार-चांभारादिक पूर्वास्पृश्यांसह सरमिसळ पंगतींत बसले होते. अनेक ब्राह्मण, मराठा, वाणी प्रभृति मंडळींनीं त्यांत भाग घेतला. रोटीबंदी प्रकटपणें तोडण्याचाच संकल्प सुटला. नांवें प्रसिद्धिलीं होतीं.

या मुख्य मुख्य सहभोजनांवरून ही रोटीबंदीची बेडी तोडून टाकण्याची सक्रिय चळवळ गेल्या सहा महिन्यांत कशी झपाट्यानें महाराष्ट्रभर फैलावत चालली आहे हें निर्विवादपणें कळून येईल. तरी या सहभोजनांमध्यें रत्नागिरींतील गेल्या सहा महिन्यांतील सहभोजनें आम्हीं मोजलीं नाहींत. गंधर्व नाटक मंडळीचे श्री. बापूराव राजहंस यांनीं दिलेलें सहभोजन, भंगी मंडळींनीं स्पृश्यास्पृश्य मंडळींस दिलेलें सहभोजन, संमेलनांतील सहभोजनें, लग्नकार्यांतील सहभोजनें–रत्नागिरीस दर पंधरवड्यास अेक तरी सहभोजन नांवें छापून, जन्मजात जातिभेदोच्छेदनार्थ घडतच आलें आहे ! पण स्थलाभावास्तव त्यांची टिपणी अिथें देतां येत नाहीं.

पण हा नुसता आरंभ आहे. ह्याच्या शतपटीनें बळशाली असा सहभोजनांचा भडिमार चालू झाला पाहिजे. आणखी पांच वर्षें तरी तींच तीं सहभोजनें त्याच त्या ठिकाणीं पुनःपुन्हा झडत राहिलीं पाहिजेत आणि तो संप्रदाय फैलावत प्रत्येक खेडेगांवांत सुद्धा सहभोजनें हीं प्रत्यहींची अेक घटना होअून बसली पाहिजे.

## शाळा-कॉलेज-संमेलनें यांच्यांतील सहभोजकांचीं नांवें छापा !

या कामीं आतां विद्यार्थ्यांना सहजासहजीं अेक महत्त्वाचें सहाय्य देतां येण्यासारखें आहे. शाळांतून नगरोनगरीं विद्यार्थ्यांचीं संमेलनें प्रतिवर्षी होतात. त्यांमध्यें बहुतेक विद्यार्थी सहभोजनी पंगतींतच सरमिसळ बसतात. पण नांवें छापलीं जात नसल्यामुळे तेच विद्यार्थी घरीं गेले कीं पुन्हा सोंवळे ओंवळे होतात ! सहभोजनांत अुघडपणें बसत नाहीत आणि शाळा-कॉलेजें सोडून ते अुद्योगास लागले कीं, सनातनी पुढारी, अमुक वकील वा अमुक डॉक्टर वा अमुक संपादक म्हणूनहि मिरवूं लागतात. सहभोजनें हा अतिरेक आहे म्हणून लोकांची तोंडदेखली पाटिलकी करूं लागतात. या मिथ्याचारी लोकांना असें दुटप्पी वर्तन करूं देतां कामा नये. यासाठीं शाळा-कॉलेजांतील प्रत्येक संमेलनामध्यें जो जो **विद्यार्थी सहभोजनाच्या सरमिसळ पंगतीस जेवील त्याचें त्याचें नांव छापून टाकलें जावें.**

संमेलनांतील व्याख्यानें, नकला, पारितोषकें प्रभृति सारी माहिती जर वृत्तपत्रीं ते संमेलनकर्ते छापतात, तर तेथें अुघड पंगतींत जेवणारांत सरमिसळ कोण कोण बसले हेंहि छापण्याचा वृत्तपत्रांना अधिकार पोंचतो. हीं संमेलनें घरगुती गृह्यसंस्कार नव्हत–ते जनिक ( Public ) नी प्रगट ( जाहीर ) समारंभ होत. तेव्हां जात्युच्छेदक पक्षाचे अभिमानी असणाऱ्या शेंकडों सहभोजक विद्यार्थ्यांनीं यापुढें त्यांच्या समक्ष सरमिसळ पंक्तींत जे जे जेवतील त्यांचीं त्यांचीं नांवें चापून प्रसिद्धीसाठीं ‘ निर्भीड ’ कडे वा अितरत्र धाडावीं. अशीं नांवें छापत जातील तर हीं शेंकडों शाळा–कॉलेजांतील संमेलनें म्हणजे रोटीबंदीची बेडी तोडून टाकणारे बिनखर्ची झुणकाभाकर सहभोजन संघच होअून बसतील. पण नांवें छापलीं पाहिजेत. तरी यापुढें प्रत्येक संमेलनांत विद्यार्थ्यांनीं सहभोजनें थाटून नांवें छापून द्यावींत आणि या समाजक्रांतीस अेक महत्त्वाचें सहाय्य देण्याची संधि गमावूं नये !

● ● ●

# रत्नागिरीनें अस्पृश्यतेची आणि रोटीबंदीची बेडी कशी तोडली ?

हिंदु राष्ट्राच्या अुद्धारासाठीं आणि जगांतील प्रबळांत प्रबळ राष्ट्रांच्या मालिकेंत त्याची गणना व्हावी अितकें सामर्थ्य त्यांत आणण्यासाठीं काय काय कार्यें केलीं पाहिजेत ह्यांचें टिपण करणें, ही गोष्ट कितीहि आवश्यक असली तरी त्या कार्यांपैकीं लहानांतील लहान कार्यहि पार पाडण्यापेक्षां तें कितीतरी सोपें असतें ! हिंदुस्थान हें पहिल्या प्रतीचें राष्ट्र कसें होअील असा प्रश्न अेखाद्या परिक्षेंत घातला तर मराठी पांचवींतील मुलेंहि एका अर्ध्या तासांत अेकेक फक्कड योजना कागदाच्या चिठोऱ्यावर भराभर लिहून देतील; पण त्या योजनेपैकीं अगदीं सोप्यांतील सोपी गोष्टहि करण्याची धमक नी चिकाटी अंगीं बाणण्यास नी तें कार्य करून दाखविण्यास शतकें लोटलीं तरी अपुरींच पडतात. कारण योजना आंखणें हें नेहमींच

सापेक्षतः सोपें असतें. ती पार पाडणें, योजनेंतील कृत्य करून दाखविणें, हें शतपटीनें अवघड असतें. भक्कम घर कसें बांधावें याची फक्कड रूपरेखा कोणाहि शिल्पज्ञास दसरुपडी देतांच आंखून घेतां येते; पण त्या रूपरेखेप्रमाणें तें भवन बांधून पुरें करण्यास लागणारी हजारों रुपयांची रक्कम, श्रम नी नेट यांची जुळवाजुळव करून तें भवन अुभारण्याचें कार्य पार पाडणें हें त्या कागदी योजनेपेक्षां किती दुर्घट असतें ! पण खरा उपयोग त्या घर बांधून पुरें करण्याचाच असतो– घराची नुसती रूपरेखा कितीहि परिपूर्ण नी सोयिस्कर भासली तरी त्या घराच्या रूपरेखेंत कांहीं कोणास राहतां येत नाहीं, थडीवाऱ्यापासून स्वतःचें रक्षण करतां येत नाहीं !

असें असतांहि आज जो तो आपल्या हिंदु राष्ट्राच्या उत्थापनाच्या नुसत्या रूपरेखा आंखीत बसलेला आहे. योजना आंखणेंहि अवश्य असतें, पण योजना म्हणजे पूर्ति नव्हे. खरें काम म्हणजे काय काम करावें हें नुसतें सांगत बसणें नसून तें काम करून दाखविणें, निदान तें काम करूं लागणें हें होय ! पण तें दुर्घट ! यास्तव काम करून दाखवण्यापेक्षां हें केलें पाहिजे, तें केलें पाहिजे याच्या सोप्या चर्चेंतच माणसें आपला वेळ घालवितात. अशीं टिपणें करण्यांनच आपण जें करावयाचें तें देशकार्य करीत आहों अशा खोटच्या समाधानानें आम्हीं बहुतेकजण स्वतःची फसवणूक करून घेत आहों. जर हें आपलें राष्ट्र अुद्धारावयाचें असेल तर येंव केलें पाहिजे नी त्यंव केलें पाहिजे, असें आम्हीं तुम्हांस सांगावें नी तुम्हीं आम्हांस सांगावें यांत सारा काळ नी शक्ति सध्यां खर्चिली जात आहे. वृत्तपत्रें, मासिकें, परिषदा, अुत्सव ह्यांच्यांतील सारें लिखाण नी चर्चा पहा. योजना, मनोरथ, परोपदेशे पांडित्यम् यांनीं भरलेल्या ! काय काय केलें पाहिजे याचीं टिपणवार टिपणें लाखावारी ! पुनःपुन्हा तेंच तेंच दळलेलें दळताहेत ! हें अमुक केलें असें सांगणारा लेख, केलेल्या कामाचें प्रतिवृत्त ( Report ) अगदीं विरळा !

नं. दि.

अमुक अमुक केलें पाहिजे हें जें रानड्यांच्या पिढीनें सांगितलें, तेंच टिळकांच्या, तेंच आमच्या पिढ्या सांगत आहेत. योजना लाखों लोकांच्या आतां तोंडपाठ झाल्या आहेत.

पण अमुक केलें, त्या योजनेंपैकीं अमुक काम झालें, हें सांगणारा लाखांत अेक आढळणेंहि दुर्घट ! **काम करण्याचें साहस नी नेट नी उरक हीच आजची मुख्य उणीव ! शेंकडों कामें ज्याचीं त्यानें आपल्यापुरतीं केलीं तरी होणारीं आहेत; पण जो तो दुसऱ्यानें काय करावें हेंच सांगण्यांत आपलें काम संपलेंसें मानतो !**

तोच दोष अस्पृश्यतानिवारणाच्या कामींहि आढळून येतो. अस्पृश्यतानिवारण करावें या मताचे हजारों लोकहि त्या प्रश्नाचा शास्त्रार्थ, मथितार्थ, अर्थ ह्याचाच काथ्याकूट करीत बसले आहेत. तेंहि अवश्यच आहे; पण मुख्य काम म्हणजे ज्यानें त्यानें निदान आपल्यापुरती तरी अस्पृश्यता प्रकटपणें झिडकारून आपल्या घरींदारीं सर्व व्यवहारांत अस्पृश्यांना स्पृश्यांसमान वागविणें हेंच असतां त्या तत्त्वाच्या व्यवहाराचा प्रश्न आला कीं स्वतःच मागें मागें घेतो ! अपवाद असा लाखांत अेखाद्याचाच ! व्यक्तींची ही गोष्ट, मग अेखादें मोठें नगरच्या नगर अस्पृश्यता तोडून मोकळें झालेलें सांपडण्याचा योग सबंध हिंदुस्थानांत दहापांच ठिकाणींहि आढळणें कठीण ! तीच गोष्ट रोटीबंदी तोडण्याची.

यास्तवच रत्नागिरी नी पुष्कळ अंशीं मालवण या दोन नगरांनी अस्पृश्यतेचा आणि रोटीबंदीचा नायनाट करून जें अेक राष्ट्रकार्य तरी आपापल्या कक्षेंत जें पार पाडलें आहे, त्याचें प्रतिवृत्त (Report) त्या नगरांना भूषणावह नी अितरांस जसें उत्तेजक तसेंच अनुकरणीयहि होणारें आहे. अेतदर्थ या लेखांत मुख्यतः रत्नागिरी, नगरी अशी (as a city) त्या स्पर्शबंदी, रोटीबंदीच्या

ब्यादीपासून किती मुक्त झाली आहे आणि कशा कशा साधनांनी नी पायऱ्यांनी तशी मुक्त होऊं शकली तें थोडक्यांत आम्ही या लेखांत दाखवूं इच्छितों.

किर्लोस्कर मासिकांत 'अमुक केलें पाहिजे' अशा नुसत्या योजनांचे आमचे प्रसिद्ध झालेले अनेक लेख पंजाबपर्यंत हजारों वाचकांना फार आवडले असें वारंवार स्पष्ट झालें आहे. तें आमच्या कार्याच्या दृष्टीनें आम्हांला समाधानकारक वाटणारच परंतु 'अमुक अेक काम, लहान म्हणा मोठें म्हणा, पण नुसतें करावयास हव्या त्या कामाच्या टिपणींतच न ठेवतां करून टाकलें,' असें सांगणारा आणि तें कसें करतां येतें याचा यशस्वी झालेला प्रयोग लोकांपुढें मांडणारा हा लेख नुसत्या तात्त्विक वा टीकात्मक लेखापेक्षां कमी मनोरंजक वाटला तरी अधिक अुपयुक्त नी हितावह आहे असें जाणून जर वाचकांनी लक्षपूर्वक वाचला आणि त्याप्रमाणें स्वतःच्या नगरांतून किंवा निदान स्वतःच्या व्यवहारांतून तरी अस्पृश्यतेचा नायनाट केला तर आम्हांस शतपटीनें अधिक समाधान आणि आपल्या हिंदुराष्ट्राची शतपटीनें अधिक सेवा होणारी आहे.

## रत्नागिरींत दहा वर्षांपूर्वीं

महाराच्या सांवलीचा विटाळ खरोखरीच मानीत. महार शिवला तर सचैल म्हणजे कपड्यांसुद्धा स्नान करणारे हजारों लोक असत. कर्मठ ब्राम्हणांच्या घरीं 'महार' हा शब्दसुद्धां उच्चारणें अशुभ समजून 'बाहेरचा' म्हणत. मग शाळांतून त्यांचीं मुलें सरमिसळ बसवणें केव्हांहि अशक्यच ! जिल्ह्यांत तर अस्पृश्यता याहूनहि कडक. चांभार, महार, भंगी यांची आपसांतहि तशीच कडक अस्पृश्यता. कोणी कोणास शिवणार नाही, जवळ घेणार नाही, घरीं जाणार नाही. महार, चांभार, भंगी हीं नांवें स्पृश्य लोकांमध्ये शिवी

म्हणूनच वापरलीं जात. महारहि 'भंगी कुठला!' म्हणून दुसऱ्या महारांस शिवी देत.

अशा स्थितींत सन १९२५ च्या गणेशोत्सवांत आम्हीं अस्पृश्यतेच्या घातुक रूढीस अुच्चाटण्यासाठीं चळवळ आरंभिली. तिच्यापासून हिंदु राष्ट्राच्या संघटनेस केवढा अडथळा होत आहे, ती किती अन्याय्य नी अधर्म्यहि आहे, प्रभृति विषयांवर व्याख्यानांची, लेखांची, संवादांची झोड अुडवून दिली. अितर कांही मोठें कार्य होत नाही तर निदान हें अेवढें अेकतरी राष्ट्रकार्य तुमच्यापुरतें करून टाका. हें कार्य करणें सर्वस्वीं तुमच्या ज्याच्या त्याच्या हातीं आहे अित्यादि प्रकारें बुद्धिवाद करून लोकमत बऱ्याच मोठ्या प्रमाणावर अनुकूल करून घेतलें; पण तें केवळ तत्त्वापुरतें. प्रत्यक्ष कार्य करण्यास, तें तत्त्व स्वत: आचरून दाखविण्यास मूठभर माणसेंहि पुढें येअीनात. तरीहि जीं कांहीं माणसें अस्पृश्यता स्वत: पाळणार नाही असें म्हणालीं, त्यांसच घेअून सोप्यांतली सोपी गोष्ट म्हणून महारवाड्यांत भजनें करण्यास जाअूं लागलों.

## (१) महारवाड्यांत भजनें व पाहाणी

करण्याच्या कामास आरंभिलें. महारांस गांवांत आणून भजनास मंडळींत बसविणें त्या काळीं अितकें कठीण होतें कीं, ही पुढें आलेली स्वयंसेवक मंडळीहि तें करूं धजेनात. यास्तव स्पृश्यांनीच महारवाड्यांत जाण्याचा कार्यक्रम आंखला. पण प्रथम प्रथम महारवाड्यांत वा चांभारवाड्यांत आम्ही पांढरवेशी लोक गेलों की महारचांभारच घराबाहेर येअीनात. हांका मारल्या तर 'घरांत नाय' म्हणून आंतूनच कोणींतरी सांगावें. आम्हीं स्वत: सतरंजी बरोबर नेअून अंथरली नी बसलों तरी ते बैठकीवर बसेनात. त्यांनाहि तें संकट वाटे. कधी सात जन्मीं न घडलेली गोष्ट. कित्येक महारचांभारांना 'बामणावाण्यांनीं' त्यांच्या वाड्यांत यावें याचा तितकाच तिटकारा वाटे, अधर्म घडलासें वाटे, कीं जितका भटाभिक्षकादि स्पृश्यांना

वाटत असे. बळेंबळें भजन करून मंडळी घरीं परतत तेव्हां घरोघर अेकच गम्मत अुडे. कोणाची आजी कोणास घरांतच घेअीना, कपडे बदलण्याच्या अटीवरच काय ते कुणी घरांत जाअू शके. भजनाला येणाऱ्या मंडळींतच कांहींजण ती गोष्ट आपद्धर्म म्हणून करीत, सद्-धर्म म्हणून नव्हे, यास्तव ते घरीं जातां स्वतःच होअून स्नान करीत, मग घरांत शिवत. अितक्यावरच गोष्ट थांबली नाही. दहापांच वेळां महारवाड्यांत रात्रीं भजनास आणि नंतर दसरा, संक्रांत प्रभृति प्रसंगीं सोनें वा तिळगूळ वांटण्यास अस्पृश्य वस्तींत जाअून परत येअून आम्ही मंडळी गांवभर तशीच शिवाशिव पद्धतशीरपणें काल-वितों हें पाहून त्यास संघटित विरोध होअूं लागला. महारवाड्यांत जाअून स्नान न करतां घरांत येणाऱ्या आम्हां मंडळीवर त्या पापा-साठी बहिष्कार टाकण्याच्या भयानें प्रायश्चित्त घेणें भाग पाडण्याची धमकी मिळाली. श्री. आप्पाराव पटवर्धन यांना त्यांच्या गांवीं बहिष्कारहि पडला होता तें प्रसिद्धच आहे. पण या विरोधास न जुमानतां हिंदुसभेची बरीच मंडळी वारंवार महारचांभारवाड्यांत जाऊन त्यांचे पाणवठे निरीक्षीत, औषधें टाकून निरोगी करीत, झाडझूड करीत, तुळशीफुलझाडें लावींत, भजनें करीत, साबण वांटून कपडे धुववीत आणि घरोघरः परत जात. होतां होतां केवळ संवयी-मुळें लोकांस तें मानवलें. तेवढा विटाळ ढिलावला.

पण तिथेंच जर चळवळ थांबती तर तिथेंच ती खुरटून जाती. **पुढची पायरी घेतल्यावांचून मागचीं मागें पडत नाहीं.** यासाठीं महारवाड्यांत जाऊन भजनें करणें समाजाच्या संवयीचें होतें न होतें तोंच महारचांभारांना गांवांत आणून संमिश्र भजनें करण्यास आरंभिलें.

## (२) अस्पृश्यांसच गांवांत आणून संमिश्र भजनें, व्याख्यानें अित्यादि समारंभ–

यांतहि प्रथम तीच अडचण, तींच खळबळ. भरवस्तींत स्पृश्य मंडळी चांभारमहारांस भजनांत वा सभेंत सरमिसळ घेण्यास जितका तिटकारा करीत, तितकाच ते महार-चांभारहि तिथें बसण्याचा तिटकारा करीत, त्यांसहि तें आवडेना. ज्यांस आवडे ते भीत. मोठ्या कष्टानें, पैसे देऊन देखील दहापांच मंडळींना गांवांत प्रकटपणें आमच्या संघटक स्पृश्य मंडळींसह अेका बैठकीवर बसून भजन करण्यास वा एखाद्या सभेंत अेकाच टोळक्यांत उभें राहण्यास मान्य करून आणावें. गांवांत चालतांना सर्वांसमक्ष त्यांच्या खांद्यावर हात टाकावा, हातांतली वस्तु अुघड अुघड द्यावी घ्यावी, कीं ज्यायोगें अस्पृश्यांस शिवून घेण्याची नी नागरिकांना त्यांना शिवतांना वारंवार बघण्याची संवय लागावी. हळुहळु लोकांचीं मनें वळवून कांहीं पालख्यांच्या मिरवणुकींत नी दिंड्यांत अस्पृश्यांस जागा मिळूं लागली. कांहीं हिंदुसंघटनाभिमानी दुकानदारांनीं आपल्या दुकानांच्या पायऱ्यांवर त्यांस अुभें राहूं दिलें. कांहींनी नंतर अितरांप्रमाणें त्यांच्या हातांत स्वहस्तें सामान देण्याचा, दुरून न टाकण्याचा परिपाठ पाडला.

## (३) शाळांतून मुलें सरमिसळ बसविण्याचें आंदोलन

सन १९२५ पासूनच हिंदुसभेनें हातीं घेतलें. अस्पृश्यांच्या शैक्षणिक अुन्नतीस्तवच नव्हे, तर अस्पृश्यतेच्या भावनेवरच्या मुळावरच कुऱ्हाड घालण्यासाठीं शाळेंतील मुलांना सरमिसळ बसविण्याची संवय लावणें हा सर्वोत्तम उपाय होता. पण तो जितका दूरवर परिणामकारक नी मूलग्राही, तितकाच दुर्घटहि होता. साऱ्या जिल्ह्यांत शाळांशाळांतून अस्पृश्य मुलें कुठें गडग्याच्या (कुंपणाच्या) भिंतीपाशीं अुघड्यावर, तर कुठें बाहेरच्या ओट्यावर किंवा पडवीच्या कोंपऱ्यांत दडपलेलीं. त्यांच्या पाट्यापेन्सिलींस मास्तरहि शिवत नसत. कांहीं

मास्तर त्या मुलांना मारावयानें तरी छडी फेंकून मारीत ! दोनचार अपवाद सोडले तर कुठेंहि सरमिसळ मलें बसविण्याचें नांवहि काढण्याची सोय नव्हती. स्वतः रत्नागिरींत व मालवणला अेकहि शाळा सरमिसळ नसे. सरकारी अेक अर्धी-कच्ची आज्ञा – मुलांत भेदभाव न करण्याची–१९२३ सनची होती; पण तिला स्कूल–बोर्डानेंहि कुठल्या टांचणाला टांचून टाकली होती ती सांपडणेंहि कठीण गेलें. अशा स्थितींत हिंदुसभेनें तो प्रश्न सन १९२५ त हातीं घेतला. दापोली, खेड, चिपळूण, देवरूख, संगमेश्वर, खारेपाटण, देवगड, मालवण प्रभृति यच्चावत् मोठमोठ्या नगरांतून दौऱ्यावर दौरे काढून, व्याख्यानांची झोड अुठवून, लोकमत वळवून, अनेक शाळांतून मुलें सरमिसळ बसविलीं. रत्नागिरी नगरांत तर प्रत्येक शाळेचें प्रकरण स्वतंत्र लढवावें लागलें. या कामीं वाणीब्राह्मण वर्गापेक्षांहि मोठा त्रासदायक विरोध मराठा, कुळवाडी, भंडारी प्रभृति अशिक्षित नी वृत्तपत्रीय वाचनाच्या अभावीं ज्यांना हिंदु राष्ट्राच्या संघटित आकांक्षांची आंच अशी लागलेलीच नव्हती, त्या वर्गाचाच जिल्हाभर गांवोगांवीं झाला. कोतवडें, फोंडा, कणकवली, शिपोशी, कांदळगांव, आडिवरें प्रभृति साठसत्तर गांवीं संप, विरोध, मारामाऱ्या, प्रसंगीं जाळपोळ, यांची नुसती धुमश्चक्री उडाली. स्कूल-बोर्ड डगमगलें. जिल्हा-बोर्डानें तर १९२९ त सरमिसळ बसविणें अवश्य नसावें म्हणून विरुद्ध ठराव केला ! पण हिंदुसभेनें चिकाटी सोडली नाही. अिकडे लोकमत वळवीत, तिकडे वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे नी विधिमंडळापर्यंत सारखी चळवळ चालविली. त्यांतहि ज्यांच्या मुलासाठीं ही धडपड ते अस्पृश्यच मुलें धाडण्यास सिद्ध नसत. भीतीनें कांहीं, पण पुष्कळसे भीति नव्हती तिथेंहि मुलें शाळेंत धाडीनात; कारण त्यांना शिक्षणाचें महत्त्वच कळेना. आओबापांस तीनतीन रुपये पगार देऊन, पाट्यापेन्सिली फुकट देअून, कपडे देअून, महार, चांभार, भंगी मुलें शाळांतून बळेंबळें बसवावीं लागत. पावसाळ्यांत त्यांनीं

म्हणावें, 'छत्र्या द्या, शाळेंत मुलें धाडतों.' त्याप्रमाणें सभेनें छत्र्या द्याव्या; त्या हातांत पडल्या कीं, लगेच त्या अस्पृश्य मुलांनीं गुंगारा द्यावा! पण हळुहळु त्यांच्यांतहि शिक्षणाची बरीचशी आवड उत्पन्न झाली. मालवण, रत्नागिरी प्रभृति ठिकाणीं त्यांच्या मोठमोठ्या परिषदा, सभा भरविल्या. हजारों रुपयांचा व्यय नी सात वर्षे सारखी चळवळ करतां करतां शेवटीं रत्नागिरी नगरांतील नव्हे, तर जिल्हाभर बहुतेक शाळा सरमिसळ बसूं लागल्या. सरकारी आज्ञाहि निःशंक भाषेंत 'सरमिसळ वसवा' म्हणून कडकपणाच्या निघाल्या. स्कूल-बोर्डहि धीटपणें त्या वर्तवूं लागलें. हिंदुसभेनें प्रत्येक गांव टिप्पून टिप्पून वरचेवर पाहाण्या केल्या. चोरूनमारून अनेक शाळांतून मुलें निराळीच बसत; पण प्रतिवृत्त तेवढें वर खोटेंच धाडीत कीं, सरमिसळ मुलें बसतात! ते सर्व प्रकार अघडकीस आणून आणून कांहीं मास्तरांना दंड करवले, दोनचार शाळा बंद झाल्या. अशा अनेक अुपायांनीं शेवटीं शाळांतून आज अस्पृश्यता अुखडली गेली आहे. मुलें जिल्हाभर सरमिसळ वसता आहेत. पुढील पिढीची अस्पृश्यतेची भावना लहानपणाच्या संवयीनेंच नष्टल्यामुळें शाळांतून मुलें सरमिसळ बसविण्यांत अस्पृश्यतेच्या मुळावरच कुऱ्हाड पडली आहे! शाळांतून मुलें सरमिसळ वसविल्यानें अेका बाजूस अस्पृश्यांचें शिक्षण नी राहणी सुधारून तीं अुन्नत होतात नी दुसऱ्या बाजूस अस्पृश्यांतील अनेक विद्यार्थी आपल्या बरोबरीनें व प्रसंगीं अधिकहि बुद्धिमान नी चलाख असूं शकतात, या अनुभवानें स्पृश्यांचा खोटा अहंकार नाहींसा होतो. लहानपणच्या समतेच्या सोबतीनें शिवा-शिवीची नी विटाळाची जाणीवच अुखडली जाते. यासाठीं अस्पृश्यता-निवारणाच्या सर्व साधनांत शाळांतून मुलें सरमिसळ बसविण्याचें साधन हें फार परिणामकारक आहे, असा हिंदुसभेचा ठाम सिद्धान्त होता. तिनें सहासात वर्षे यापायीं किती कष्ट सोसले ते तिच्या

पंचवार्षिक प्रतिवृत्ताच्या दोन भागांत प्रत्येक कार्यकर्त्यानें अवश्य वाचावें असा आमचा अनुरोध (शिफारस) आहे.

## (४) गृहप्रवेश

शाळांतून मुलें सरमिसळ बसण्याची चळवळ जिल्हाभर चालूंच असतां रत्नागिरी नगरांत अस्पृश्यतेची हकालपट्टी घरांतूनहि व्हावी म्हणून सन १९२७ पासूनच हिंदुसभेनें गृहप्रवेशाचा अुपक्रम केला. दसरा नी संक्रान्त हृया दोन दिवशीं सोनें नी तिळगूळ वांटावयासाठीं ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य प्रभृति जातींच्या मंडळीसहच महार, चांभार भंगी हृयांचेहि दोनदोन लोक घेऊन हिंदुसभेच्या वतीनें घरोघर जावें व अंगणांतूनच विनवावें कीं, 'आम्ही सोनें द्यावयास आलों आहों; आपण आपल्या घरीं ख्रिश्चन-मुसलमानादिक अहिंदूंस जिथपर्यंत येअूं देतां तिथपर्यंत तरी आम्हां हिंदूंस येअूं द्यावें! अहिंदूहूनदेखील तुमच्या हिंदुधर्मबंधूंस अस्पृश्य लेखणें म्हणजे हिंदुधर्मासच अपमानिणें नी उपमर्दिणें नव्हे काय?' या विनंतीसरशी कांहीं हिंदूंचें हृदय कळवळावें. त्यांनीं महारादिकांसह सर्वांस ओटीवर, कुणीं तर बंगल्यांतहि नेअून तिळगूळ व सोनें द्यावें-घ्यावें. 'हिंदुधर्मकी जय'च्या जयजयकारांत मंडळींनीं परतावें. परंतु पहिलीं दोन वर्षें अनेकांना अंगणांतच येअून तिळगूळ व सोनें द्यावें-घ्यावें, घरांत येअूं नये! कांहींनीं तर रागावून, अपशब्द बोलून, अंगणांतून देखील बाहेर चालते व्हा म्हणून सांगावें! पण तरीहि न रागावतां सभेच्या स्वयंसेवकांनीं त्यांस समजावीत परतावें. दोनचार वर्षें हा अुपक्रम सारखा चालू ठेवला. तीच रूढि होत गेली. शेवटीं सन १९३० वर्षीच्या दसऱ्यास गांवभर सरसकट सोनें वांटल्यानंतर घरीं येणाऱ्यांची वर्तमानपत्रांत नांवें छापलीं जातात हें माहीत असतांहि, शेंकडा ९० टक्के घरांनीं अस्पृश्यांसह सर्वांस घरांघरांमध्यें अहिंदु येतात तेथवर नेलें, कोणीं पानसुपाऱ्या बंगल्यांत केल्या, तर कोणीं पेढे वांटले! अंगणां-

तून परतवून देणारा अेकहि निघाला नाहीं. बाजारांतील बहुतेक दुकानांतून ( अुपहारगृहें सोडून ) सरसकट प्रवेश अस्पृश्यांना मिळूं लागला. तेव्हां तो अुपक्रम पुढें अनवश्यक म्हणून संपविला.

## ( ५ ) स्त्रियांचे हळदकुंकू-समारंभ

सुधारणेचें नी स्त्रीचें विशेषच वांकडें अशी समज आहे. त्यांतहि त्यांना अेखादी सुधारणा पटली वा आवडली तरी ती आचरण्याची किंवा बोलून दाखविण्याचीहि स्वतंत्रता नसावयाची. अशाहि स्थितींत त्यांच्यांतून ही अस्पृश्यतेची भावना काढून टाकण्यासाठीं व्याख्यानादि बुद्धिवादांनीं मनोभूमिका साधारणपणें अनुकूल करून घेतल्यानंतर संमिश्र हळदीकुंकवाचे समारंभ चालू केले. सन १९२५ मध्यें पहिल्या हळदकुंकवांत अस्पृश्य स्त्रियासुद्धा कांहीं केल्या स्पृश्य स्त्रियांत मिसळेनात आणि अुलटपक्षी त्या **महारचांभारणीस स्वहस्तें कुंकू लावण्यास साऱ्या रत्नागिरीमध्यें मोठ्या प्रयासाने अवघ्या पांच स्पृश्य स्त्रिया सिद्ध झाल्या** ! पुढें अुसाच्या गाड्या लुटण्याचें किंवा पेढे वांटण्याचें आमिष अशा वेळीं दाखवावें. अस्पृश्य स्त्रिया त्यामुळें पुष्कळ येत चालल्या आणि बुद्धिवादाच्या बळें स्पृश्य स्त्रियांचीं मनेंहि निवळत जाअून ह्या हळदी-कुंकू समारंभांतून शेंकडों स्त्रिया कर्तव्य म्हणून मनमोकळेपणें परस्पर हळदकुंकू देअू-घेअू लागल्या. पुढें यात्रा, सभा, संमेलनांतून गांवांत प्रतिप्रसंगीं स्त्रिया वा पुरुष स्पृश्यास्पृश्य भेदभाव विसरून सरमिसळ बसण्याफिरण्याची रीतच पडली नी पुरुषांच्याप्रमाणें स्त्रियांतहि अस्पृश्य स्त्रियांचा सार्वजनिक प्रसंगीं तरी विशेष विटाळ वाटेनासा झाला.

## ( ६ ) गाड्या, सभा, नाटकगृहें

पूर्वीं नाटकगृहांतूनहि अस्पृश्य स्त्रिया नी पुरुष निराळे बसत.

सभेनें ती रूढि मोडण्यासाठीं प्रयत्न करूं लागतांच प्रथम प्रथम मोठी बाचाबाची होओी. अेकदां बॅ. सावरकरांच्या ‘उःशाप’ नाटकाच्या प्रयोगाच्या वेळीं फुकट खुर्चीचीं तिकिटें देअून अस्पृश्य मंडळींस बुद्धया सरमिसळ असें प्रमुख स्थानीं बसविलें आणि स्त्रियांसहि तिकिटाप्रमाणें सरमिसळ बसविलें. तेव्हां खुर्चीवर महारांना पाहून अेवढा गोंधळ झाला कीं, मॅजिस्ट्रेटलादेखील शांतताभंगाची भीति वाटून मध्यें पडावें लागलें. पण बॅ. सावरकरांनीं स्वतःची हमी देअून, सर्वांची समजूत घालून महारांचा सरमिसळ बसण्याचा हक्क प्रस्थापिला. हळुहळु ती रीतहि समाजाच्या अंगवळणीं पडली. तसेंच गांवांतील गाडीवाले पूर्वीं अस्पृश्यांस आंत घेत नसत. यासाठीं त्यांच्याशीं अनेक वेळां चर्चा करून ‘मुसलमानास घेतां, अस्पृश्य आपले हिंदु ! त्यांना कसे टाकतां ?’ अशी समज पाडण्यांत आली. कांहीं वळले पण कांहींनीं ‘नोकरी सोडूं पण महार-चांभारांना गाडींत बसविणार नाहीं’ असाहि त्रागा केला ! जे वळले त्यांच्या गाड्यांतून महारांना स्वखर्चानें घेअून हिंदुसभेची मंडळी कांहीं दिवस अुगीच गांवांत बंदरावर फिरावयास जात. हेतु हा कीं, लोकांच्या दृष्टीस तें दृश्य पाहण्याची संवय व्हावी ! हळुहळु तीहि रीत अंगवळणीं पडून गाड्यांतून अस्पृश्यतेची हकालपट्टी झाली.

## (७) हिंदु बँड

पूर्वास्पृश्यांची आर्थिक स्थिति सुधारण्यास्तव त्यांना भांडवल देअून बँड घेतला नी शिकविला. पूर्वीं बँडवाले मुसलमान असत. ते हिंदूंची अिच्छा नसली तरी मशिदीवरून हिंदूंच्या मिरवणुकी जातांना वाद्यें बंद ठेवीत, ती रूढि पाडीत. यास्तव सर्व हिंदूंनीं हाच पूर्वास्पृश्यांचा बँड लावावा असा प्रसार केला नीं रत्नागिरीच्या हिंदुत्वाभिमानी समाजानें कसोशीनें तो नियम पाळला. त्यामुळें दुसरा महत्त्वाचा लाभ अस्पृश्यता संस्कारांतहि नष्टली हा झाला.

लग्नामुंजींतून सनअीवाल्यासारखेंच हे अस्पृश्य बँडवाले ब्राह्मणादिकांच्या व्याहींविहिणींच्या दाटींत सरमिसळ मिरवूं लागले, वावरूं लागले. अस्पृश्यांचे पूर्वास्पृश्य झाले ! आर्थिक स्थिति सुधारण्यासाठीं कोर्ट-कचेऱ्यांतून अनेक पूर्वास्पृश्यांना नोकऱ्या लावून दिल्या.

## (८) पूर्वास्पृश्य मेळा नी देवालयप्रवेश

सन १९२६ पासूनच देवालयप्रवेशाचा प्रश्नहि हातीं धरला होता. गणपत्युत्सवासाठीं अेक महार-चांभार-भंग्यांचा मेळा काढला. पण तीं अस्पृश्य मुलेंहि आपसांत शिवेनात, येअीनात. चणे, खाअू वांटला तर येत, पण महार हा चांभाराचे चणे खाअीना, तो भंग्याचे ! तें सारें जमविलें तर त्या मेळयास शिकविण्यास जागा मिळेना, अंगण मिळेना ! पुढें त्यास शिकवून सार्वजनिक गणपति विठ्ठलमंदिरांत असे, तिथें मोठ्या सायासानें बाहेर अंगणांत दूर अुभें राहण्याच्या करारावर अनुज्ञा मिळवून नेलें. तेथें मेळयानें अेकच खळबळ उडाली ! शेंकडों लोक तें अद्भुत बघावयास भोंवतीं दाटले — पण दहा दहा हात अंतरावर ! दुसऱ्या वर्षापर्यंत अेकंदरींतच अस्पृश्यता वरील नाना बाजूंनीं केलेल्या आघातांमुळें इतकी घायाळ झाली होती कीं, तो पूर्वास्पृश्य मेळा देवळाच्या अंगणांतून पायरीवर लोकांनींच आपल्या आग्रहानें नेला आणि शेंकडों लोक त्याला शिवून तसेंच देवळांतल्या सभेंत जाअून बसले. हें कृत्यदेखील अनेक जुन्या लोकांस भ्रष्टाकारी वाटलें. पण आणखी दोन वर्षांच्या आंत, सन १९२९ ला त्या पूर्वास्पृश्य मेळयाचाच अखिल हिंदुमेळा झाला. मॅट्रिक वा कॉलेजपर्यंत शिकलेल्या विद्यार्थ्यांपासून तों स्वतंत्र धंदे करणाऱ्यांपर्यंत शंभर निवडक स्पृश्य तरुण त्या पूर्वास्पृश्य मेळयांत मिसळले आणि हजारों लोकांसमक्ष नी त्यांच्या टाळयांच्या अनुमोदनांत त्या विठ्ठलमंदिराच्या भर सभामंडपांत प्रवेश केला. पूर्वास्पृश्यांसह अर्धा तास टोलेजंग अखिल हिंदु मेळयाचा कार्यक्रम सभामंडपांत झाला ! त्या दिवशी-

पासून म्हणजे १९२९ पासून विठ्ठलमंदिरांत गोकुळअष्टमी प्रभृति अुत्सवांत, अधुनमधून कीर्तनांत, सभांत, देवालयप्रवेशास अनुकूल असलेल्या शेंकडों लोकांच्या सहाय्यानें पूर्वास्पृश्य मंडळी आजवर प्रगटपणें जात आहेत. देवालयप्रवेशास असंमत असणारा वर्ग त्या कृत्यास निषेधीत आहे. देवळांत पुढें पूर्वास्पृश्यांसह अेका अेकादशीस दोनशें तीनशें हिंदु तरुणांनीं सभामंडपांत प्रगटपणें अेक तासभर भजन करून याचें छायाचित्रहि घेतलें. सारांश, विठ्ठलाचें मंदिर पूर्वास्पृश्यांस तरुणवर्गानें सरसहा अुघडें केलें. समाजाच्या दुसऱ्या जुन्या मताच्या वर्गानें तें सरसहा सम्मतिलें नाहीं. अशा समाजस्थितींतच पतितपावनाच्या अखिल हिंदु-मंदिराची स्थापना होअून देवालयप्रवेशाचा प्रश्न निराळयाच रीतीनें, पण अत्यंत यशस्वीपणें निकालांत निघाला.

## (९) पतितपावनाची स्थापना

जुन्या देवळास यच्चयावत् हिंदूंस अुघडण्याची खरी किल्ली जुन्या देवळांच्या पंचांपाशीं सांपडणारी नसून नव्या अखिलहिंदु देवालयांच्या पंचांपाशींच मिळूं शकते, हें तत्त्व ओळखून हिंदुसभेनें अेक अखिलहिंदु हिंदु देवालय बांधण्याचें ठरविलें. जुन्या देवळास अुघडण्याचें समाजाच्या मनांत आलें तरी नैर्बंधिक ( Legal ) अडचणीहि मार्गांत आडव्या येतात. परंतु अखिल हिंदु नव्या देवळांत स्पृश्यास्पृश्य समाज बेखटक अेकत्र पूजाप्रार्थना करण्यास शिकला. ती संवय लागली कीं जुन्या देवळांचें अेक तर महत्त्वच कमी होतें, किंवा तिथें स्पृश्यास्पृश्य हिंदु जाअूंयेअूं लागण्यांत अनिष्ट असें कांहींच वाटेनासें होतें. यास्तव हिंदुसभेच्या विनंतीवरून दानशूर श्रीमंत भागोजीशेठ कीर यांनीं आजवर दोनअडीच लक्ष रुपये खर्चून पतितपावनाचें अखिल हिंदु मंदिर नी संस्था स्थापून आजवर चालविली आहे. ह्या अखिलहिंदु मंदिराची कीर्ति भरतखंडभर अितकी दुमदुमली आहे कीं, तिचें वर्णन अिथे देणें अनवश्यक व्हावें. रत्नागिरीस अस्पृश्यतेच्या दुष्ट रूढींत वरील सर्व कारच्या आघातांतूनहि

ग्रं. दि.

जो थोडा दम अुरला होता तो ह्या श्रीपतितपावन संस्थेच्या स्थापनेसरशीं अुखडून गेला. हजारों स्पृश्यास्पृश्य स्त्रीपुरुष आज चार वर्षे सरमिसळ दाटता आहेत. पोथीजात जातिभेदाच्या मानीव अुच्चनीचतेस थारा न देतां हिंदुमात्र तितका जिथें अेकमुखानें सांघिक पूजापार्थना करूं शकतो आणि करतो असें हिंदु जातीचें हें एक राष्ट्रीय केन्द्र होअून बसलें आहे. तेथें चाळींतून ब्राह्मण-क्षत्रियादि कुटुंबांसहच पूर्वास्पृश्य कुटुंबेंहि समानतेनें शेजारीं शेजारीं राहतात. विहिरी, बाग, मंडप सर्व हिंदुमात्रास समतेनें वापरतां येतात. स्वच्छता प्रभृति प्रत्यक्ष गुणांचा तेवढाच भेद मानला जातो. अमक्याच जातींत जन्मला येवढ्याचसाठीं कोणी जन्माचा अुच्च वा नीच, स्पृश्य वा अस्पृश्य मानला जात नाहीं. रत्नागिरीच्या हिंदु समाजानेंहि ह्या नियमांनीं ह्या संस्थेस **आत्मसात्** करून तिला राष्ट्रीय स्वरूप आणून दिलें. किल्यावरील शेठजीचें भागेश्वराचें मंदिरहि पूर्वास्पृश्यांस उघडें झालें.

## ( १० ) अखिलहिंदु उपहारगृह

दहा वर्षांपूर्वी रत्नागिरीस अुपहारगृहादि जागीं अस्पृश्यास चहा प्रभृति पदार्थ मार्गावर अुभे राहून स्वतःच्या कपांत वा नरोटींत दुरून ओतले जात. मुसलमानादिकांस बांकें, कप देअून स्वागतिलें जाअी !! अस्पृश्यतानिवारणाची चळवळ बळावतां बळावतां जेव्हां रोटीबंदीच तोडण्यापर्यंत समाजिक क्रांतीच्या चळवळीची भ्रमश्चक्री पोंचली, तेव्हां अखिलहिंदु अुपहारगृहाची संस्था स्थापून तींत यच्चावत् पोथीजात भेदभावास तिलांजलि देण्यांत आली. महार, मराठे, ब्राह्मण, भंगी सार्‍या जातींचे शेंकडों लोक प्रकटपणें तींत सरमिसळ चहापाणी व अुपहार करीत आहेत. महार वाढपीच आहेत. अुपहार करणार्‍यांचीं अुघडपणें नांवें टिपून प्रसिद्धिण्यांत येतील असा स्पष्ट नियम आहे. तरीहि शेंकडों स्पृश्यास्पृश्य तत्त्व म्हणून तिथें

अुपहार घेतात आणि कोणत्याहि जातीनें कोणासहि जातिबहिष्कार्य मानलें नाहीं.

## (११) साऱ्या जिल्ह्याभर प्रचार नी मालवणलाहि अस्पृश्यतेस मूठमाती !

रत्नागिरीच्या ह्या सामाजिक सुधारणेच्या आंदोलनाचे धक्के साऱ्या जिल्ह्याभर देअून व्याख्यानें, दौरे, परिषदा, सहभोजनें यांचा धुमाकूळ चहूंकडे घालून जिल्ह्यांतहि अस्पृश्यतेचीं नी पुढें रोटीबंदीचीं पाळेंमुळें ढिलीं करून सोडलीं गेलीं. त्यांतहि सभेच्या प्रचारास अनुकूल अशी भूमि मालवणच्या प्रगत समाजांत सांपडली. तिकडच्या आप्पाराव पटवर्धन प्रभृति कार्यकर्त्यांच्या सहकार्यानें नी समाजाच्या प्रगत पाठिंब्यानें आज मालवणला अस्पृश्यतेचा नायनाट झाला आहे. तीनचार मोठीं देवळेंहि निर्विवादपणें पूर्वास्पृश्यांस अुघडीं आहेत.

## अस्पृश्यतेचा मृत्युदिन ! स्पर्शबंदीचा पुतळा जाळून रोटीबंदीवर चढाअी !

अस्पृश्यतानिवारणाचा हा अेक राष्ट्रीय प्रश्न तरी रत्नागिरीनें नी मालवणनें आपल्या कक्षेपुरता असा पूर्णपणें सोडवून अस्पृश्यांचे पूर्वास्पृश्य करून सोडले ! ह्या नगरांच्या सीमेंत पाअूल टाकतांच पांच हजार वर्षांची जन्मजात अस्पृश्यतेची बेडी अस्पृश्य बंधूंच्या पायांतून खळ्कन् तुटून पडते ! व्यक्तिव्यक्तींचा मतभेद कितीहि असला, तरी हीं नगरें– नगरें अशीं (as cities) सामुदायिक नात्यानें अस्पृश्यतेच्या पापापासून मुक्त झालेलीं आहेत आणि तींहि केवळ बुद्धिवादाच्या बळें, सामाजिक मनःक्रांतीच्याच आधारें ! ही सुधारणा प्रकटपणें उद्‌घोषविण्यास्तव तारीख २२ फेब्रुवारी सन १९३३ ला रत्नागिरीस मोठा समारंभ होअून स्पर्शबंदीचा

राक्षसी पुतळा मोठ्या गाजावाजांत हजारों अब्राह्मण-भंगी हिंदू-बंधूंच्यां समक्ष नी अनुमतीनें जाळण्यांत आला. तो दिवस अस्पृश्यतेचा मृत्युदिन म्हणून साजरा करण्यांत आला !

या दिवसापासून स्पर्शबंदीच्या पुढची पायरी चढून रत्नागिरीनें रोटीबंदीच्याच ठाण्यावर हल्ले चढविले. हजारों स्त्रीपुरुषांनीं जातपातींचे खुळचट भेदभाव झिडकारून सहभोजनांची धुमश्चक्री उडवून दिली. सकाळीं दहा वाजतां भंग्याच्या — मैला साफ करण्याच्या अुपयुक्त कार्यांत गढलेली भंगीण स्नान करून स्वच्छ वेषांत बारा वाजतां सुवासिनी म्हणून पतितपावनांत जेवावयास येते नी नगरांतील मोठ-मोठ्या प्रतिष्ठित ब्राह्मणादिक घराण्यांतील शेंकडों महिला तिच्यासह पगतींत प्रकटपणें नांवें छापून सहभोजनें करतात ! रोटीबंदीची बेडीहि अशी तोडून टाकल्यामुळें गेल्या गणेशोत्सवांत तारीख ११ सप्टेंबर १९३५ ला रत्नागिरीनें

## रोटीबंदीचा राक्षसी पुतळाहि जाळून टाकला !

आज रत्नागिरींत बहुशः प्रत्येक हिंदु नागरिक अेकतर सह-भोजनांत तरी जेवलेला आहे नाहींतर संपर्कित सहभोजकाबरोबर तरी जेवलेला आहे, म्हणजे सहभोजन हें जातिबहिष्कार्य कृत्य मानलें जात नाहीं. याचाच अर्थ असा कीं, रत्नागिरीनें स्पर्शबंदीचीच नव्हे, तर रोटीबंदीचीहि बेडी तोडून टाकली आहे ! अवघ्या दहा वर्षांच्या आंत घडलेली

## ही सामाजिक क्रांति अेका अर्थी आश्चर्यकारक नी भूषणावह

आहे खरी. पण ती 'अकरणान्मंदकरणं श्रेयः' याच नात्यानें काय ती होय, हें मात्र विसरतां कामा नये ! या दहा वर्षांत जग किती

पुढारलें – तो झारशाहींतला रशिया वैमानिक वेगानें लेनिनशाही झाला ! आणि आम्ही पांगुळगाड्यावर चालूं शकलों ! पण तरीहि मृतवत् होतों ते चालूं लागलों, अेवढेंच विशेष ! हें न विसरतां केलें याहून सहस्रपट करून दाखवूं तर खरे !

**समाप्त**

अनुक्रम 9.6.3.73
ग्रंथालय शाखा
REFBK-0008192
दा. क्र. 6902

अखिल महाराष्ट्रास ललाम-
भून झालेलीं तीन सर्वांग-
सुंदर मासिकें

# किर्लोस्कर

वार्षिक वर्गणी ३ रु.

# स्त्री

वार्षिक वर्गणी ३ रु.

# मनोहर

वार्षिक वर्गणी ३ रु.

तिन्ही एकत्र ८। रु.
कोणतींहि दोन ५॥ रु.

किर्लोस्कर प्रेस : किर्लोस्करवाडी.